# घटक १
# प्रारंभ

## अ. शिकारी आणि अन्नसंकलकः पुराश्मयुग आणि मध्याश्मयुग, ब. आद्य शेतकरीः नवाश्मयुग आणि ताम्रपाषाणयुग, क. पहिले नागरीकरणः हडप्पा संस्कृती, ड. महाशिलायुगीन भटके

मानवी इतिहासाचा अगदी सुरुवातीचा काळ म्हणजे प्रागैतिहासिक (Prehistory) काळ होय. या काळातील मानव हा मुख्यत्वे दगडी हत्यारांच्या सहाय्याने, प्रकृतीशी झुंझत होता. तसेच तिच्याशी जुळवून घेत, तिला आपल्या उपयोगी आणीत होता. म्हणून या काळास 'अश्मयुग' (Stone Age) असेही म्हंटले जाते. या युगामध्ये पुराश्मयुग (Paleolithic), मध्याश्मयुग (Mesolithic) आणि नवाश्मयुग (Neolithic) असे त्याच्या विकासाचे तीन टप्पे दिसतात. यातील पहिल्या दोन टप्प्यावर तो शिकारी आणि अन्न–संकलक असतो. तो भटका असतो. पुढे नवाश्मयुग (Neolithic), या विकासाच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये मात्र त्याच्या जीवनामध्ये क्रांती होते. त्याला शेती, पशुपालन असे शोध लागतात. त्याची कुटुंबसंस्था अस्तित्वात येते. तो स्थिर होऊ लागतो.

पुढे त्याला तांबे या धातूचा शोध लागतो. या काळाला 'ताम्रपाषाणयुग' (Chalcolithic) असे म्हटले जाते. आता तो व्यवस्थित शेती करु लागतो; त्यात प्रयोग करु लागतो. त्याचे अन्य संस्कृतींशी संबंध तयार होतात. त्याची छोटी–छोटी खेडी तयार होतात. जवळपास याच काळात, भारताच्या वायव्य भागात, तो विकासाच्या पुढच्या टप्प्यावर मोठी झेप घेतो. या भागात, तो भारतातील पहिल्यावाहिल्या नगरांची निर्मिती करतो. या काळात उपजीविकेची साधने, नगररचना–राहणीमान, सामाजिक–आर्थिक परिस्थिती इ. विविध क्षेत्रात उत्तम दर्जाचा विकास घडून येतो. या काळालाच 'हडप्पा संस्कृतीचा काळ' असे म्हंटले जाते. पुढे, विविध नैसर्गिक कारणांमुळे, या संस्कृतीचा ऱ्हास होतो. यानंतर, दक्षिणेकडे आपल्याला एक आगळीवेगळी संस्कृती दिसून येते. यांच्या वैशिष्ट्यपूर्ण दफनपध्दतीमुळे यांना 'महाशिलायुगीन संस्कृती' (Megalithic) असे म्हटले जाते.

थोडक्यात; साध्या, भटक्या शिकारी–अन्न संकलकापासून, शहरी मानवापर्यंत, मानवाचा कसा विकास झाला हे आपल्याला याठिकाणी पहायचे आहे.

या काळाचा अभ्यास करताना, लिखित साधने मिळत नसल्याने तसेच जी मिळतील ती अद्याप वाचता न आल्याने, आपल्याला पुरातत्वीय साधनांचा आधार घ्यावा लागतो.

## अ. शिकारी आणि अन्नसंकलकः पुराश्मयुग आणि मध्याश्मयुग

**प्रागैतिहासिक संस्कृतीचा कालक्रम**

पर्यावरणातील बदल, मानवाचे प्रयोग, त्याच्या हत्यारातील-बनविण्याच्या तंत्रातील-लागणाऱ्या कच्च्या मालातील बदल इ. निकषांवर भारतीय प्रागैतिहासाचे अथवा अश्मयुगाचे साधारणत: तीन मुख्य कालखंड पडतात. जसे, पुराश्मयुग (इसपू ६ लाख ते १०,०००); मध्याश्मयुग (इसपू १०,००० ते ८,०००) आणि नवाश्मयुग (इसपू ८,००० ते ४,०००).

त्याचबरोबर, वरील निकषांवरुन, पुराश्मयुगाचेही तीन उपकालखंड पडतात, जसे, पूर्व (इ.स.पू. ६ लाख ते १ लाख), मध्य (इसपू १ लाख ते ४००००) आणि उत्तर (इसपू ४०,००० ते १०,०००).

**पुराश्मयुग** (इसपू ६ लाख ते १०,०००)

पुराश्मयुग हा मानवाच्या इतिहासातील अगदी सुरुवातीचा काळ होय. या काळातील मानव हा पूर्णपणे भटका असून, मुख्यत्वे शिकार व अन्न-संकलन-मासेमारी हेच त्यांचे उपजिविकेचे साधन होते. सर्वसाधारणतः हे भटकेच असत. उघड्यावर थांबत असत. तरी अल्पकाळासाठी, ते काही ठिकाणी आश्रय घेताना दिसतात. साधारणतः अन्न, पाणी आणि त्याच्या हत्यारासाठी आवश्यक असणाऱ्या दगडांचे साठे जिथे असतील त्याजवळ रहात असत. जसे, कर्नाटकातील हुंसगी याठिकाणी ते फांद्या-गवतांचा वापर करुन, तात्पुरत्या झोपड्या उभारताना दिसतात. तर भीमबेटका याठिकाणी ते गुहा-कपारींच्या आश्रयाने काही काळ रहात असत. काही जागांचा वापर हा विशिष्ठ कारणांसाठी होताना दिसतो. जसे, 'फॅक्टरी साईट' म्हणजे याठिकाणी हा मानव फक्त हत्यारेच तयार करीत असे, तर 'बूचरिंग साईट' याठिकाणी शिकार केलेल्या प्राण्यांवर तो विविध प्रक्रिया करीत असे, जसे, मांस वाळवणे, कातडे साफ करणे इ.

या काळात घनदाट जंगलं होती. त्यामुळे गेंडा, हत्ती असे मोठे प्राणी वावरत असत. स्वाभाविकतः यांची शिकार करण्यासाठी मानवाला, समुहाची गरज भासू लागली. त्यामुळे, मानवाचा पहिलावाहिला समाज या काळात निर्माण झाला. टोळीच्या स्वरुपात हे लोक एकत्र येत असत. साधारणतः प्रत्येक टोळीमध्ये १०० भर माणसं असावीत. हे सर्व, एकमेकांशी नात्यांनी सबंधीत असावीत. मात्र, या टोळ्या जे काही मिळवत त्यांवर यांचा समान हक्क असे. साधारणतः पुरुष शिकार करीत तर स्त्रिया अन्नसंकलनाचे काम करताना दिसतात. शतकानुशतके त्यांचे अनुभव साठत गेले. यातून, पुरुषांना वन्य पशुंचे तर स्त्रियांना वनस्पतींचे जीवनचक्र समजत गेले. प्रत्येक टोळीचे एक भटकण्याचे क्षेत्र असे. त्या-त्या भागातील वनस्पती आणि प्राण्यांचा वापर ते काळजीपूर्वक करीत असत. विविध टोळ्यांमध्ये देवाणघेवाणचे व्यवहारही होत असावेत. तसाच संघर्षही होत असावा.

या मानवाच्या श्रध्देचे क्वचित काही पुरावे मिळालेले आहेत. मध्य प्रदेशातील बाघोर याठिकाणी त्यांनी एक गोलाकार जमीन तयार केलेली होती. या वर्तुळाच्या मध्यभागी एक त्रिकोणी दगड सापडलेला आहे. आजही या भागातील आदिवासी समाजात अशी परंपरा दिसून येते. तसेच, काही पुरावे, या मानवाच्या

अलंकारांच्या आवडीकडेही बोट दाखवतात. जसे, आंध्र प्रदेशातील कर्नुल गुहामध्ये एक प्राण्याचा दात सापडलेला आहे. या दातावर छिद्रं आहेत. म्हणजेच, ताईतप्रमाणे याचा वापर होत असावा. तसेच, पाटणे येथे शहामृगाच्या अंड्याचा एक तुकडा सापडलेला आहे. त्यावर चौकटीची आकृती कोरलेली आहे. इथूनच, छिद्र असलेले काही मणीही मिळालेले आहेत.

या काळातील मानवाने हत्यारांसाठी मुख्यत्वे दगडांचाच वापर केला. त्यामुळे, त्यांचा विकास, आपल्याला, त्याच्या हत्यारांमध्ये झालेल्या विकासावरुन लक्षात येतो. अगदी सुरुवातीला, पूर्व-पुराश्मयुगीन मानव, सहज उपलब्ध होऊ शकतील अशा ठिकाणातून हत्यारांसाठी दगड मिळवित असे. यातून विविध प्रकारची हत्यारे बनवत असे. जसे हातकुऱ्हाड, तोडहत्यारे, रापी इ. हातकुऱ्हाड, रापी वगैरे बनवताना तो दगडांच्या छिलक्यांचा वापर करीत असे. तर तोडहत्यारे बनवताना तो गोट्यांचा वापर करीत असे. राजस्थानातील मोगरा टेकड्या मध्ये यांची 'फॅक्टरी साईट' होती. याठिकाणी, हे लोक एका जागी थांबून अवजारे तयार करताना दिसतात. महाराष्ट्रामधील नेवासा, गंगवाडी- नाशिक याठिकाणी या काळाचे पुरावे मिळालेले आहेत.

**पुराश्मयुगीन हातकुऱ्हाड, इसांपूर**



पुढे, मध्य-पुराश्मयुगात, मानवाला 'क्रिप्टो क्रिस्टलाईन सिलिसियस' दगडाचा शोध लागला. यातून उत्तम हत्यारे तयार करता येतात हे त्यांच्या लक्षात आले. आता, ते, छिलक्यांपासून, पूर्वीपेक्षा छोटी हत्यारे बनवू लागले. यातून टोचे, वेधण्या, स्क्रॅपर्सचे विविध प्रकार निर्माण झाले. यातील काही हत्यारे ही 'लेवलॉईस' या तंत्राने बनवली गेली. मागील काळात, एका गोट्यापासून प्रथम एक मोठा छिलका वेगळा केला जायचा. मग या स्वतंत्र छिलक्यापासून, हत्यार बनवले जायचे. आता या नव्या 'लेवलॉईस' या तंत्रानुसार, गोट्याच्या एका बाजूलाच हत्यार तयार केले जाते. आणि एकदा हे हत्यार असे पूर्ण तयार झाले की मग ते गोट्यापासून वेगळे केले जाते.

ह. धी. सांकलिया यांनी महाराष्ट्रातील चिकरी-नेवासा याठिकाणी मध्य-पुराश्मयुग या काळाचा पहिला पुरावा शोधला. पुढे, राजस्थानमधील बूढा पुष्कर, लूनी नदीचे खोरे याठिकाणी या काळाचे पुरावे सापडत गेले.

पुढे उत्तर-पुराश्मयुगात त्यांनी आणखीन प्रगती केली. आता, ते दगडी पात्यांचा (Blade) वापर करु लागले. दगडांमधून पाती वेगळी काढून, त्या पात्यांपासून हत्यारे बनवणे सुरु झाले. यामध्ये स्क्रू ड्रायव्हरसारखी हत्यारे मोठ्या प्रमाणावर मिळू लागतात. तर, आंध्र प्रदेशातील कर्नूल येथे प्राण्यांच्या हाडांचा वापर करुन, हत्यारे बनवलेली दिसून येतात. उत्तर-पुराश्मयुगचा विचार करता राजस्थानमधील बूढा पुष्कर, मध्य प्रदेशातील बाघोर, उत्तर प्रदेशातील चोपनी मंडो याठिकाणी या काळाचे पुरावे मोठ्या प्रमाणावर मिळतात.

**अश्मयुगीन हत्यारे कशी बनवतात?**

२. अश्म घण तंत्र-एका हातात कच्चा माल घेऊन, दुसऱ्या हातातील दगडाने त्यावर मारले जाते. ३. दंड घण तंत्रः काठीने मारले जाते, ४. संयत दाब तंत्र-काठीने फक्त दाब दिला जातो. ३ आणि ४ था टप्पा हे 'फिनिशिंग'साठी असतात.




**मध्याश्मयुग** (इसपू १०,००० ते ८,०००)

या काळातील मानव हा मुख्यत्वे भटकाच राहिला. पण काही काळासांठी का असेना ते एका जागी थांबू लागले. मध्य प्रदेशातील भीमबेटका याठिकाणी ते गुहा-कपारींच्या आश्रयाने राहताना दिसतात. काही सपाटीवर राहताना दिसतात. त्यांच्या वसतीजवळ, दफनं दिसून येतात. जसे सराई नहर राय (उत्तर प्रदेश), बीरभाणपूर (प. बंगाल). महादहा (उ.प्र.) येथे तर अशी २८ दफनं मिळालेली आहेत. अशा दफनांमध्ये, मृतांबरोबर दफनवस्तूही दिसून येतात. म्हणजेच या काळातील मानवाची, मरणोत्तर जीवनावर श्रध्दा होती असे दिसून येते. तर राजस्थानमधील बागोर याठिकाणी वाळूच्या टेकड्यांमध्ये ते राहताना दिसतात. या काळातील मानव, आता साठपासाठी, मडकी बनवताना दिसू लागतात. अर्थात, ही मडकी अगदी ओबडधोबड, हाताने बनवलेली, उन्हात वाळवलेली अशी प्राथमिक स्वरुपाची दिसून येतात. गुजरामधील लांघणाज याठिकाणी अशी मडकी सापडलेली आहेत.

या काळामधील सगळ्यात महत्वाची प्रगती म्हणजे, एक सूक्ष्मास्त्रांचा शोध आणि दुसरी म्हणजे त्यांची गुहा-चित्रे.

**सूक्ष्मास्त्रे**

या काळात पर्यावरणात बदल झाला. तुलनेने पाऊस कमी झाला. त्यामुळे घनदाट जंगलांचे प्रमाण कमी होत गेले. तर गवताळ पट्ट्यांचे प्रमाण वाढले. स्वाभाविकतः या काळात, गवतांच्या आधाराने राहणारे छोटे आणि वेगवान प्राणी दिसू लागले. पूर्वीच्याच हत्याराने, या प्राण्यांची शिकार करणे आता अवघड झाले होते. नव्या शोधाची गरज होती.

या गरजेतूनच, मध्याश्मयुगीन मानवाने छोट्या-छोट्या हत्यारांची, संयुक्त हत्यारे वापरण्यास सुरुवात केली. म्हणजे या छोट्या हत्यारांना 'स्वतंत्रपणे' काही अर्थ नसतो. मात्र, ती ज्यावेळी कशात तरी जोडली जातात त्यावेळी त्यांचे हत्यार तयार होते, उदा. बाण. हा मानव आता पूर्वीपेक्षा अधिक विकसित झालेला होता. त्याने पूर्वजांच्या पाते संस्कृतीतून, सूक्ष्मास्त्रांचा (Microliths) शोध लावला. ही सूक्ष्मास्त्रे साधारणत: टोकदार आणि विविध भौमितिक आकारांची असून, संयुक्त हत्यारे म्हणूनच यांचा उपयोग होत असे. पूर्वीप्रमाणेच त्याने यासाठी क्रिप्टो क्रिस्टलाईन दगड व संयत स्वरुपाने दाब तंत्राचा (Pressure technique) वापर करुन हत्यारे निर्माण केली. अर्थातच अशा प्रकारच्या हत्यारांचा त्याला फार फायदा झाला. जसे, ही हत्यारे मुख्यत्वे संयुक्त स्वरुपाची असल्याने, कोणताही विशिष्ट आकार गृहीत धरुन हत्यारे करणे आता फारसे गरजेचे राहिलेले नाही. फक्त ही सूक्ष्मास्त्रं ज्या लाकडात/हाडांत जोडायची आहे ते हव्या त्या आकारांचे असले की झाले! तसेच, या काळातील हत्यारे ही पूर्वीपेक्षा वजनाने हलकी असल्याने सोबत बाळगणे हे आता अधिक सोयीचे झाले. शिवाय ही हत्यारे तुटली अथवा हरवली तरी जागच्या जागी तयार करणेही सोपे होते. विशेषत: अशा सूक्ष्मास्त्रांचा वापर करुन त्याने आपले धनुर्धारी कौशल्य विकसित केले.

त्याच्या या शोधामुळे, आता त्याला, एका जागेवरुन, दूरचे धावणारे, छोटे प्राणी टिपणे शक्य झाले. जंगली वराह, चिंकारा, नीलगाय, हरणांसारख्या वेगवान आणि छोट्या प्राण्यांची तो शिकार करु लागलेला दिसतो. त्याच्या आहारात कासव, मासे यांचाही समावेश दिसून येतो. शिकारीबरोबरच मध, फळे, मूळं, बीया इ. चा तो खाण्यासाठी संग्रह करीत असे. त्याची ही अवस्था अश्मयुगाच्या सर्व टपटप्प्यातून विकसित होताना दिसते. त्याचे आता शिकारीवर-आणि बदललेल्या पर्यावरणावर नियंत्रण निर्माण झाले. तो आता अनोळखी प्रदेशामध्ये भटकण्याचे धाडस करु लागला. पूर्वीच्या तुलनेने, तो आता स्थैर्याकडे वाटचाल करु लागला. त्याची लोकसंख्या वाढू लागली. शिकारीवरील नियंत्रणामुळे, तो आता पूर्वीपेक्षा निवांत झाला. यामुळेच, त्याचे कलेतले प्रयोग सुरू झाले.

**मध्याश्मयुगीन गुहा चित्रे (Rock Art)**



मध्याश्मयुगीन मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील एक महत्वाचा भाग म्हणजे गुहाचित्रे होय. साधारणत: १८६७-६८ मध्ये भारतीय पुरातत्व खात्याच्या ए. सी. एल कार्लाइल यांनी सोहागीघाट (जि. मीर्झापूर, उप्र) याठिकाणी गुहाचित्रांचा शोध लावला. त्यापासून आतापर्यंत एकूण १५० गुहांचा शोध लागलेला असून त्याची १९ गटांत विभागणी होते. यातील बहुतेक गुहा (३/४) या मध्य प्रदेशातील विंध्य-सातपुडा पर्वतरांगामध्येच वसलेल्या आहेत.

यामध्ये, भीमबेटकाची (भोपाळपासून ४५ किमीवर) गुहाचित्रं ही प्रातिनिधिक व प्रसिध्द अशी आहेत. याठिकाणी जवळपास दहा किमीच्या वर्तुळात आणि सात डोंगररांगात एकूण ६४२ गुहा आहेत. यातील ४०० गुहांमध्ये, गुहाचित्रे आहेत. चांगले पर्यावरण, बारमाही वाहणारे तीन ओढे, हत्यारांसाठी उपयुक्त अशा वालुकाश्म आणि क्वार्टझाईट या दगडांचे प्रचंड साठे, ३० प्रकारच्या खाण्यायोग्य वनस्पती, विविध लहानमोठे प्राणी वसत असलेली घनदाट जंगले यामुळे या गुहांमध्ये मानवाने अगदी पूर्वपुराश्मयुगापासून याठिकाणी आश्रय घेतलेला दिसून येतो. १९५७ मध्ये, व्हि.एस.वाकणकर यांनी या गुहाचित्रांचा सर्वप्रथम अभ्यास केलेला दिसून येतो.

ही चित्रे गुहांच्या छतावर व भिंतीवर काढलेली आहेत. यासाठी या मानवाने रंगासाठी नैसर्गिक (स्थानिक खनिजे आणि वनस्पती) रंगांचा वापर केलेला दिसून येतो. या रंगांमध्ये लाल (गेरुपासून), पांढरा (चूनखडीपासून), हिरवा (हिरव्या चॅल्सिडोनी दगडापासून) यांचा विविध छटांमध्ये समावेश होतो. अभ्यासकांना याठिकाणी १६ रंगांच्या छटांचा शोध लागलेला आहे. तरी पांढरा आणि लाल रंग हे त्या काळातील मानवाच्या विशेष आवडीचे आहेत. रंग टिकावा म्हणून हे रंग, चरबी आणि डिंकामध्ये कालवून

वापरलेले दिसतात. तर, प्राण्यांच्या शेपटांपासून ब्रश तयार केलेले आहेत. अर्थात, ही मुख्यत्वे रेखाचित्रे असून यामध्ये नंतर रंग भरला जाई. अभ्यासकांनी या चित्रांवरुन चित्रकलेच्या एकूण १२ शैली ओळखलेल्या आहेत. तसेच, तीन टप्पे लक्षात घेतलेले आहेत-प्रागैतिहासिक गुहाचित्रे, ऐतिहासिक गुहाचित्रे आणि दोघांतील संक्रमणावस्था.

चित्रविषयांमध्ये मुख्यत्वे प्राणी व शिकारीचे प्रसंग प्रधान दिसतात. प्राण्यांचा विचार करता इथे एकूण २९ प्रकार दिसतात. यामध्ये चितळ, बिबट्या, वाघ, पँथर, हत्ती, गेंडा, काळविट, हरिण, खार दिसून येतात. तसेच, विविध पक्षी, मासे, पाल, बेडूक, खेकडे, विंचू दिसून येतात. साप मात्र दिसून येत नाही. या चित्रांत विविध प्राण्यांचा, त्यांच्या हालचालीसह समावेश करता येईल. या मानवाने, विविध भौमितिक आकारांनी प्राण्यांचे शरीर सुशोभित केलेले दिसते. विशेष म्हणजे काही प्राण्यांची चित्रे पारदर्शी आहेत; जसे, एका चित्रांत मादी प्राण्याच्या पोटातले बाळही चितारलेले आहे. काही प्राणी साधारण हालचाली करताना सुध्दा आढळतात, जसे, बछड्यांसह फिरणारी वाघीण, चरणाऱ्या म्हशी, उड्या मारत धावणारे ससे. जवळजवळ दहा हजार वर्षापूर्वीची अशी नैसर्गिक आणि वास्तववादी चित्रे पाहून आपण आश्चर्यचकित होतो!

तर शिकारीच्या दृश्यात सामुहिक तसेच एकेकट्याने केलेल्या शिकारींची तसेच प्राण्यांना सापळ्यांद्वारे पकडण्याची चित्रं आहेत. शिकारी विविध अलंकाराने सजत. तसेच, मुखवटे घालून शिकार करीत असत. त्यांच्या शस्त्रांमध्ये सूक्ष्मास्त्रं जोडलेली भाले, धनुष्य-बाण, काठी, गोफण इ. हत्यारेही दिसून येतात. तसेच, मधासारखी वन्यत्पादनं गोळा करणारी आणि मासेमारी करणारी माणसेही या चित्रांत आहेत. त्याचबरोबर, बाळाचा जन्म, त्याचे पालन-पोषण, मुखवटे घालून नृत्य करणारे, दफनविधी अशी जीवनचक्रं दाखविणारीही चित्रं आहेत. या चित्रांतील पुरुष कातडे/सालीचे पंचे घातलेले दिसतात. त्यांचे केस मोकळे सोडलले आहेत; तर स्त्रियांनी वेण्या घातलेल्या आहेत.

काही अभ्यासकांना असे वाटते की ही चित्रे मानवाने निव्वळ गुहा सजवण्यासाठी काढलेली नव्हती. तर ही चित्रे काढण्यामागे त्याचा धार्मिक दृष्टिकोन असावा. कारण ही चित्रे अशा गुहांत काढलेली असत की यांचा वापर मानव नियमितपणे रहाण्यासाठी करत नसे. शिवाय, बरीचशी चित्रेही अगोदरच्या चित्रांवर जणूकाही गिरवल्यासारखी काढलेली आहेत. जसे, एखादा प्राणी, वारंवार गिरवल्यावर तो मोठ्या प्रमाणावर आपल्याला मिळेल ही त्याची श्रध्दा असावी.


भीमबेटकाप्रमाणेच; अशी ओरिसा मध्ये ५५ गुहाचित्रे मिळालेली आहेत. केरळमध्येही सापडतात.

मध्य प्रदेशातील जाओरा याठिकाणी तर एका गुहाचित्रांमध्ये 'विश्वदर्शन' दिसून येते!

थोडक्यात, मध्याश्मयुगीन मानवाच्या या एकंदर प्रगतीवरुन असे दिसते की  हा मानव, पूर्वीपेक्षा सामाजिकदृष्ट्या अधिक व्यवस्थित आणि संगठित झालेला आहे. तसेच, त्यांनी विविध प्रकारच्या उपजीविकेची माध्यमं हाताळलेली आहेत. अशा गोष्टींमुळेच ते कोणत्याही पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्यात यश

मिळवू शकले असावेत. पूर्वीपेक्षा एकंदर अधिक सुलभतेमुळे श्रध्दा, कला इ. गोष्टींचाही विकास झालेला असावा.

**अश्मयुगीन मानवी जीवन (काल्पनिक चित्र)**




**ब. आद्य शेतकरीः नवाश्मयुग आणि ताम्रपाषाणयुग**

**नवाश्मयुग** (इसपू ८,००० ते ४,०००)

नवाश्मयुग म्हणजेच निओलिथिक हा शब्दप्रयोग सर्वप्रथम सर जॉन लुबॉक यांनी आपल्या ग्रंथात केला. 'घासून गुळगुळीत केलेली दगडाची हत्यारे' ही, तो या नव्या युगाचे विशेष लक्षण मानतो. नवाश्मयुग हा मानवाच्या इतिहासातील क्रांतीकारक टप्पा होय. या काळात त्याला शेती आणि पशुपालन यांचा शोध लागला. या शोधाने त्याचे जीवन पार बदलून गेले.

भारतामध्ये शेती आणि पशुपालनाचे पहिलेवहिले पुरावे नवाश्मयुगापासून मिळण्यास सुरुवात होते. ही नवाश्मयुगीन स्थळे भारतातील काही ठराविक भागात वसलेली दिसून येतात, तशीच ती आपली काही प्रादेशिक वैशिष्ट्येही घेऊन येतात. यांचे वितरण अफगाणिस्थान-बलुचिस्तान (मेहेरगढ), काश्मीर (बुर्झाहोम, गुफकराल), आग्नेय उत्तर प्रदेश (बेलन नदीचे खोरेः चौपानी मंडो, कोल्डीहवा, महागरा), उत्तर बिहार (सेनुआर, चिरांद), दक्षिण भारत (बुधिहाळ, नागार्जुनकोंडा, संगणकल्लू) असे दिसून येते. यातील मेहेरगढमध्ये तो पशुपालक तर होताच शिवाय तो आता गहू आणि जव पिकवू लागला तसेच खजूरही उगवू लागला. तसेच तो राहण्यासाठी कच्च्या विटांची आयताकार घरे बांधू लागला. हा मानव सामुहिक स्वरुपात

धान्य साठवण्यासाठी विविध कक्ष असलेल्या इमारतीही बांधू लागला. पुढील हडप्पा काळातील धान्यकोठारांची ही जणू काही नांदीच होती.

**नवाश्मयुगीन क्रांती**

'शिकार आणि अन्नसंकलक' मानवामध्ये फार मोठा बदल होऊन तो 'शेती-पशुपालन' करणारा आणि एका ठिकाणी स्थिर राहणारा मानव झाला. या बदलाला विद्वानांनी 'नवाश्मयुगीन क्रांती' असे म्हंटलेले आहे. हे याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे की, शतकानुशतके शिकार करणाऱ्या पुरुषांना, वन्यजीवांच्या जीवनचक्राची-त्यांच्या सवयींची माहिति झाली होती. त्याचप्रमाणे, स्त्रीयांना वनस्पतींच्या जीवनचक्रांची माहिति झाली होती. यातूनच, पुरुषांनी 'पशुपालनाचा' तर स्त्रियांनी 'शेतीचा' शोध लावलेला दिसून येतो.

***पुरातत्वशास्त्र (Archaeology)***

*मानवाने, हेतूपूर्वक किंवा निर्हेतूकपणे ज्या गोष्टी आपल्या मागे सोडलेल्या असतात; त्या गोष्टींचा अभ्यास करुन, त्या मानवाचा इतिहास शोधणारे शास्त्र म्हणजे पुरातत्वशास्त्र होय. मानवाला लिखाणाचे ज्ञान असल्याचा काळ अगदी लहान आहे. त्यातुलनेने मानवाचा इतिहास हा लाखो वर्षांचा आहे. या काळाचा अभ्यास करायचा असेल तर आपल्याला पुरातत्वीय साधनांवर अवलंबून रहावे लागते.*

*साधारणतः पुरातत्वीय स्थळ हे एक पांढ्या मातीचे टेकाड असते. त्या टेकाडाचे उत्खनन केले जाते. त्या स्थळांचा फक्त सांस्कृतिक कालक्रम शोधायचा असेल तर फक्त एकच खड्डा घेतला जातो. याला 'उदग्र उत्खनन' म्हणतात. तर, मानवाची पूर्ण जीवनशैली समजून घ्यायची असेल तर त्या स्थळाचे विस्तृत प्रमाणात उत्खनन केले जाते. याला 'आयत उत्खनन' असे म्हणले जाते. विविध शास्त्रांच्या सहायाने हा अभ्यास केला जातो. सध्या हे एक विकसित असे शास्त्र आहे. प्रागैतिहासिक पुरातत्व, ऐतिहासिक पुरातत्व, सागरी पुरातत्व अशा या शास्त्राच्या विविध उपशाखा आहेत.*

*भारतामध्ये या शास्त्राचा अभ्यास अलेक्झांडर कनिंगहॅमपासून सुरु झाला. त्यांनी १८६० मध्ये 'भारतीय पुरातत्वीय खाते' ची स्थापना केली. पुढे जॉन मार्शल, राखालदास बॅनर्जी, दयाराम साहनी यांनी हडप्पा संस्कृतीतील शहरांची उत्खननं केली. स्वातंत्र्यानंतर पुण्याच्या डेक्कन कॉलेजसारख्या महत्वाच्या विद्यापीठांनीही उत्खननं करण्यास सुरुवात केली. ह.धी.सांकलिया हे स्वातंत्र्योत्तर भारतातील एक महत्वाचे पुरातत्वशास्त्रज्ञ. डेक्कन कॉलेजचे इनामगावचे उत्खनन हा भारतीय पुरातत्वशास्त्राच्या इतिहासातील एक महत्वाचा टप्पा आहे.*

अशा या नवाश्मयुगाची ठळक लक्षणे खालीलप्रमाणे मांडता येतील.

- **शेतीचा शोध :** या काळात विविध जंगली बियांचे नियंत्रितपणे पिकवणे अथवा त्यांची लागवड करणे सुरू झाले. जसे जंगली तांदळाची, नियंत्रित स्वरुपात तांदळाची शेती सुरू झाली. हा मानव आता गहू, ज्वारी, तांदूळ, वाटाणा, मूग, मसूर, कुळीथ, रागी पुढे कापूस, द्राक्षे इ. महत्वाची पीके घेताना दिसतो. थोडक्यात, या काळात शेतीचा शोध लागला. हा शेतीचा शोध पुढे खाजगी मालमत्तेच्या संकल्पनेला जन्म देणारा ठरला.

- **पशुपालन :** तसेच, आहार आणि इतर कष्टाच्या कामासाठी योग्य अशा प्राण्यांची निवड करुन, त्यांचे नियंत्रितपणे पालन सुरु झाले. यात शेळ्या-मेंढ्यांबरोबर, गुरांचाही समावेश होतो.
- **स्थिर स्वरुपाची वसाहत :** वरील दोही बाबींसाठी अथवा दोही बाबींमुळे त्याला एका ठिकाणी स्थिर रहावे लागले. त्याने कुटुंब निर्माण केले. ही त्याची खाजगी मालमत्ता बनली. आता आपल्या कुटुंबासाठी तो घरे बांधू लागला. यावेळी प्रथम तो जमिनीखाली राहत असे पुढे तो जमिनीवर आयताकार मातीची, कुडाची, कच्च्या विटांची घरे बांधून राहू लागला.
- **खेड्यांचा उदय :** या घरांतून आणि कुटुंबव्यवस्थेतून, सामाजिक संबंध अधिक घट्ट विणले गेले. यातूनच पहिल्यावहिल्या खेड्यांचा उदय झाला. तसेच धान्यकोठारे, तटबंदी, शेणाचे ढिगारे पेटवण्यासारख्या नियमित अशा रिवाजासारख्या सामूहिक वास्तू आणि रीतीही उदयास आल्या. अर्थात यावेळी काही प्रमाणात सामाजिक स्तरीकरणाबरोबरच, अन्य संस्कृती संबंधांचे संकेतही मिळू लागतात.

वरील काही सांस्कृतिक प्रक्रियांबरोबरच चाकावर बनवलेली मडकी, घासून गुळगुळीत केलेली हत्यारे, हाडांची हत्यारे आणि अवजारे, मौल्यवान खड्यांचे मणी इ. या युगाची ठळक लक्षणे होती.

आता, ही नवाश्मयुगीन क्रांती नेमकी झाली कुठे? आणि तिचा प्रसार कसा झाला? याबाबत विविध अभ्यासकांची, विविध मते दिसतात. असे एक मत आहे की, शेती/पशुपालनाचा शोध हा मुख्यत्वे नाईल नदीच्या प्रदेशात झाला. तिथून, तो पश्चिम आशियाद्वारे, भारताच्या वायव्य भागात आला. तिथून, तो भारतभर पसरला. पण अलिकडे असे मानले जाऊ लागलेले आहे की हा शोध असा 'आयात/प्रवास' करीत आलेला नाही. तर, हा शोध, वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या ठिकाणी लागलेला आहे. मागील काळामध्ये प्रगती करत, पुढे विकसित झालेला आहे. जसे, (१) पश्चिम आशियाई प्रदेश (जेरिकोःजॉर्डन, अली कोशःइराण, चटाल हुयुकःतुर्कस्थान) (२) दक्षिण आशियाई प्रदेश (मेहेरगढःपाकिस्तान, भारत), (३) आग्नेय आशियाई प्रदेशः स्पिरीट केव्हःथायलंड.

थोडक्यात, भारतातील नवाश्मयुग हे भारतातीलच आधीच्या काळातून-म्हणजे पूराश्मयुग आणि मध्याश्मयुगातून विकसित झालेले आहे.

**नवाश्मयुगीन हत्यारे**

या काळातील मानव, पूर्वजांच्या हत्यारासोबत, आता घासून गुळगुळीत केलेल्या दगडांचा वापर करु लागला. यामध्ये, कुऱ्हाडी, कुदळ, रापी, छिन्नी, रिंग स्टोन, खलबत्ता, वरवंटा यांचा समावेश होतो. या दगडांच्या हत्यारांबरोबरच तो लाकडांची व हाडांची हत्यारे वापरु लागलेला दिसतो. त्याचे हे हत्यारांचे भांडार एकंदरीतच त्याच्या शेती आणि स्थिर राहणीकडे निर्देश करते.

**वसाहती**

नवाश्मयुगीन मानवाच्या वसाहती वैविध्यपूर्ण दिसून येतात. काश्मीरसारख्या प्रदेशात तो जमिनीमध्ये खड्डे करुन राहतो, उर्वरित ईशान्य आणि उत्तर भारतामध्ये तो कच्च्या विटांच्या झोपड्यांमध्ये राहतो, तर दक्षिणेकडे-कर्नाटकामध्ये त्याची घरेच मिळत नाहीत. उलट, तेथे 'राखेचे मोठमोठे ढिगारे' दिसून येतात.

**वायव्य भागातील** मेहेरगढ (सध्या पाकिस्तान) याठिकाणी सुरुवातील कच्च्या विटांच्या घरांमध्ये लोक रहात असत. यांच्या खोल्या आयताकृती असत. दोन घरांच्या मध्ये दफनं दिसून येतात. या काळात लोकांना मडकी माहिती नव्हती. पुढे, याठिकाणी विकास झाला. लोकसंख्या वाढली. आता पक्क्या विटांच्या घरात लोक राहू लागले. खोल्यांची संख्या वाढली. गहू, बोर, कापूस, खजूर इत्यादी पीकं ते घेऊ लागले. बांध वगैरे घालून, त्यांनी कृत्रिम जलसिंचनाच्या योजना राबवल्या. मडकी बनवू लागले. तर बलुचिस्तान (सध्या पाकिस्तान) येथील 'नाल' याठिकाणी बहुरंगी मडकी बनवू लागले. 'कुल्ली' येथे खूप सुंदर नक्षीकाम असलेली मडकी दिसून येतात. तर हरीयाणामधील कुणाल येथील मडक्यांवर पिंपळाचे पान, वळणदार शिंगांचे बैल अशा आकृती दिसून येतात. पुढे, पूर्व हडप्पा काळामध्ये अशा प्रकारची चित्रित मडकी मोठ्या प्रमाणावर मिळू लागतात.

उत्तर प्रदेशचा विचार करता येथे ४० ठिकाणी नवाश्मयुगीन पुरावे मिळालेले आहेत. याठिकाणी जंगली आणि पाळीव अशा दोन्ही प्रकारच्या तांदळाच्या जाती दिसतात. म्हणजेच, शेतीचा शोध हा याठिकाणीच लागलेला आहे. तो बाहेरुन आयात केला गेलेला नाही. येथे बेलन नदीच्या खोऱ्यात 'कोल्डिवा' आणि 'महागरा' ही दोन महत्वाची ठिकाणं आहेत. येथे लोक कुडाच्या घरात रहात. प्रत्येकाच्या घराजवळच शेळ्या, बकरी पाळल्या जात. तर गावच्या मध्यभागी सामुहिक गोठा होता. तर आग्नेय उत्तर प्रदेशातील 'चौपानी मंडो' येथे मध्याश्मयुगाच्या शेवटी शेवटी मानव निमभटका असला तरी तो काही काळासाठी स्थिर रहात असून, शेती करीत होता. असे कळते की, शेती आणि पशुपालनाअगोदरच येथील मानवाने मृदूभांड्याचा शोध लावलेला होता. हे लक्षात ठेवले पाहिजे की येथील मृदूभांडी ही जगातील सर्वात पहिली मृदूभांडी आहेत (इसपू ९०००-८०००). म्हणजेच, मृदूभांडी व काही प्रमाणात दगडी जातीही त्याच्या अन्नसंग्राहक व्यवस्थेशी जोडलेली आहेत. असे दिसते की हा मानव अन्नसंग्रहणाबरोबरच, पशुपालन आणि थोडीफार शेती करुन स्थिर झालेला होता. या दोन्ही ठिकाणी मानव तांदूळ पिकवित होता, शेळ्या-मेंढ्या आणि गुरे पाळत होता व स्थिर झालेला होता असे दिसते. हे दगडांची अवजारे वापरीत मात्र ही पूर्वीपेक्षा अधिक सुधारीत व पॉलिश केलेली असत. तसेच, मडक्यांच्या कारागिरीत एक प्रमाणबध्दता येऊ लागलेली होती. अशा या वसाहतींत कुटुंबव्यवस्था आणि समाजव्यवस्था उदयास आलेली होती.

बिहार याठिकाणी पर्यावरणीय अनुकुलता असूनही, येथे तुलनेने फार पुढे (इसपू २०००-१६००) नवाश्मयुगीन वसाहती निर्माण झाल्या. येथे 'सेनुआर', 'चिरांद' याठिकाणी नवाश्मयुगीन अवशेष मिळालेले आहेत. हे लोक गोलाकार, कुडांच्या घरात रहात असत. हे गहू, तांदूळ, जव, वटाणे आणि मसूर शिवाय हरभरा आणि मूग यांची लागवड करीत असे. शिवाय या ठिकाणी मडकी, घासून गुळगुळीत केलेली हत्यारे, हाडांची हत्यारे, मौल्यवान खड्यांचे मणी, टेराकोटाचे पुतळे इ. मिळालेले आहेत. दोन्हीही ठिकाणी हाडांची उल्लेखनीय अशी हत्यारे मिळालेली आहेत. म्हणजेच येथील मानव शेतीबरोबरच, पशुपालन तर करीत होताच तसेच आता तो आपली सौदंर्य अभिरुची ही जपू लागलेला दिसून येतो.

काश्मीरमध्ये बुर्झाहोम हे एक महत्वाचे नवाश्मयुगीन स्थळ होय. १९६०-७१ मध्ये, भारतीय पुरातत्वीय खात्याचे टी. एन. खजांची यांनी बूर्झाहोमचे उत्खनन केले. या ठिकाणचे वैशिष्ट्य म्हणजे, सुरुवातीच्या

काळात, येथील लोक गर्तावासात म्हणजे जमिनीत खड्डे/घरे करुन रहात असत. अशावेळी जमिनीवर, या खड्ड्याच्या भोवती शंखाकृती गवताची झोपडी असावी. पुढे मात्र ते आयताकृती, कुडांच्या झोपड्यात-आणि पुढे, मातीच्या विटांनी बनवलेल्या घरांत राहू लागले. यांनी बैल, घोडा, शेळी समुहातील प्राणी माणसाळवले-पाळलेले होते. यातील रेडा व गाढवाचा वापर ते ओझी वाहण्यासाठी करीत असत. तसेच ते धान्यांचीही, किमान पोटापुरती प्राथमिक स्वरुपातील पैदास करु लागले. यामध्ये, गहू, बार्ली, जवस यांचा समावेश होतो. हे धान्य साठविण्यासाठी तसेच इतर कामांसाठी ते आता चाकावरील मृद्भांडी बनवू लागले. तर गुफकराल या ठिकाणी दगडी मात्र अधिक लांब व सुधारीत अशा कुऱ्हाडी, हाडांची सुधारीत अवजारे (बाणाग्रे) तसेच हार्वेस्टर चा समावेश होतो.

असे दिसते की हा मानव आपल्या पूर्वजांप्रमाणेच विविध संस्कृत्यांशी संबंध ठेवून होता. हा त्यांच्याशी शंख, हार यामध्ये विनिमय करताना दिसतो. बुर्झाहोम येथील गर्तावास, तर गुफकराल येथील हार्वेस्टर आणि कुत्र्याची दफने त्याचा चीनी नवाश्मयुगीन लोकांशी संपर्क दाखवितात. तर येथे सापडलेली मृद्भांडी त्याचा पूर्व-हडप्पा काळाशी संपर्क दाखवतात. त्यांच्या दफनामध्ये, प्रेतासोबत मिळालेल्या विविध वस्तूवरुन असे दिसते की यांच्या मरणोत्तर जीवनाबद्दलही काही श्रध्दा होत्या. थोडक्यात, काश्मीर खोऱ्यात घर, त्याच्याजवळ गोठा व सभोवती पसरलेले शेत आणि कुरण अशा पध्दतीचे एक खेडेच या काळात निर्माण झाले. याबरोबरच आता, शेती-पशुपालन करणारा, काही श्रध्दा बाळगणाऱ्या आणि समूहात राहणाऱ्या अशा कुटुंबवत्सल सामाजिक मानवाचा ही उदय होऊ लागला. या उदयाला वायव्य भारत, मध्य आशिया, चीन यांच्याशी असणाऱ्या संपर्कांचीही जोड होती.

**नवाश्मयुगीन गर्तावास**



आसाम आणि नजीकचा हिमालय पर्वत हा प्रचंड पर्जन्यमानाचा प्रदेश असून आसाम आणि गारो, नागा या पर्वतरांगामध्ये नवाश्मयुगीन अवशेष मिळालेले आहेत (जवळपासू इसपू २०००). येथील देवजाली हाडिंग याठिकाणी स्कंधयुक्त कुऱ्हाडी, घासून गुळगुळीत केलेल्या कुऱ्हाडी, दोऱ्याची नक्षी असणारी मृद्भांडी मिळालेली आहेत.

**दक्षिण भारत आणि उत्तर कर्नाटकातील राखेचे ढिगारे**

दक्षिण भारतामध्ये विशेष पर्यावरणीय अनुकुलता नसतानाही (पावसाचे प्रमाण २५ सेमीपेक्षा कमी) उल्लेखनीय अशा नवाश्मयुगीन वसाहती दिसून येतात.

या वसाहती ग्रॅनॅईटच्या डोंगराळ भागात तसेच दख्खनच्या कोरड्या पठारावर मिळालेल्या आहेत. येथील नागार्जुनकोंडा, संगणकल्लू या महत्वाच्या वसाहती होत. यातील नागार्जुनकोंडा (इसपू २६००-१०००) येथे सुरुवातीला (इसपू २५००) शेतीचे अल्प-ज्ञान होते आणि पशुपालन तर जवळजवळ माहितच नव्हते. मात्र पुढील काळात मानव लाल रंगाची मडकी बनवू लागला. तो गुरे, शेळ्या-मेंढ्या, गाढव, वराह, घोडे आदि पशु पाळू लागला. तसेच, तो, सांबर, बारशिंग्या, चिंकारा अशा हरीण समुहातील प्राण्यांची शिकार करताना दिसू लागला. तसेच, मणीही बनवू लागला. पुढे तर विकासाच्या पुढील टप्प्यात तो धूसर अशी मृद्भांडी आणि गुळगुळीत हत्यारंही मोठ्या प्रमाणावर तयार करु लागलेला दिसतो. तसेच तो आता गर्तावासात राहू लागलेला आहे. म्हणजेच ते आता पूर्वीचे अन्नसंकलन बाजूला ठेवून, शेतीसह पशुपालनही करु लागलेले दिसून येतात. 'वटगळ' याठिकाणी हे लोक सुपारीची लागवड करु लागलेले दिसतात. तसेच किनारपट्टीशी यांचा संपर्कही दिसून येतो. इथेच, दफनांमध्ये, दफनवस्तू म्हणून मडकी ठेवली जात. शेती-पशुपालनाबरोबरच; शिकार आणि मासेमारी हे पर्याय सोबत होतेच. याठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की या ठिकाणी शेतीचा शोध हा पशुपालनाच्या अगोदर लागलेला आहे.

पशुपालनाचा विचार करता, उत्तर कर्नाटकामध्ये, नवाश्मयुगाचे आणखीन एक वैशिष्ट्य आपल्यासमोर येते. ते म्हणजे *'राखेचे ढिगारे'* (Ashmounds).

या प्रदेशातील मानव हा मुख्यत्वे पशुपालक होता. 'उटनूर' यठिकाणी जवळजवळ ८०० गुरं राहतील असा प्रचंड मोठा गोठा दिसून येतो. गोलाकार घरांचे गाव आणि सामुहिक गोठा हे येथील गावांचे वैशिष्ट्य दिसून येते. या प्रदेशामध्येच 'राखेचे ढिगारे' हा एक विशेष दिसून येतो.

कित्येक ठिकाणी, मानवी वसाहतीपासून दूर राखेचे मोठमोठे ढिगारे दिसून येतात, जसे, बुधिहाळ, उटनूर, कोडेकल आणि कुपगल इ. ठिकाणी. असे दिसते की हे लोक, वसतीबाहेर, एका विशिष्ठ ठिकाणी, मोठ्या प्रमाणावर शेण साठवून ठेवत असे. इथे शेतीचा शोध लागलेला नसल्याने, या शेणाचा तसा काही उपयोग नव्हता. म्हणून, रोगराईपासून वाचण्यासाठी, कालांतराने, हे शेणाचे ढिगारे पेटवून देत असावेत. काही अभ्यासकांच्या मते या 'शेणाचे ढिगारे जाळणे' या कृतीला काही धार्मिक आशय असू शकतो व म्हणून, आजच्या होळीच्या सणाची पूर्वपरंपरा ही असावी. काहीही असो, यातून आपल्याला या समाजजीवनातील पशुपालनाचे महत्व (आणि शेतीचे अज्ञान) कळते. असे दिसते की हे पशुपालक वर्षातील काही ठरावीक

महिने आपली जनावरं घेऊन वसतीपासून दूर चरण्यासाठी घेऊन जात असावेत. आजही सातारा भागातील पशुपालक पावसाळ्याव्यतिरिक्त उरलेले महिने आपली जनावरं घेऊन कोकणात जाताना दिसतात.

**नवाश्मयुगीन राखेचे ढिगारे, तोरंगल्लू**



उर्वरित दक्षिण भारताचे एकंदर नवाश्मयुगीन जीवना पाहता असे दिसते की हा मानव पायऱ्यांची शेती करुन; गहू, कुळीथ, मूग आणि रागी पिकवित होता. तसेच, मुख्यत्वे आहारासाठी आणि पुढे वजन वाहण्यासाठी तसेच नांगर चालवण्यासाठी पशुंचे पालन करीत होता. याशिवाय शिकार आणि मासेमारी हे त्याच्या अन्नवैविध्यातील महत्वाचे घटक होते. एकंदरीत असे दिसते की या मानवाच्या उपजीविकेमध्ये शेती आणि पशुपालन हे मुख्य घटक असून हा आता स्थिर झालेला होता.

**ताम्रपाषाणयुग** (इसपू ४०००-८००)

ढोबळपणे ज्या काळातील मानव तांब्यासह अश्महत्यारेही वापरत होता त्या काळास ताम्रपाषाणयुग असे म्हणतात. भारतीय ताम्रपाषाणयुगाला 'आद्य शेतकऱ्यांचे'युग असे म्हटले जाते. हा काळ साधारणत: इसवी सन पूर्व ४००० ते इसवी सन पूर्व ८०० असा ढोबळमानने सांगता येईल. साधारणत: नवाश्मयुगानंतर भारतामध्ये ताम्रपाषाणयुग अवतरले. या काळात सर्वत्र आद्य शेतकऱ्यांची खेडी निर्माण झालेली होती. यातील वायव्य भारतातील सिंधु-सरस्वती खोऱ्यातील खेड्यांनी तुलनेने अधिक विकास केला. यातून त्या खोऱ्यांत एक नागरी स्वरुपाची 'हडप्पा संस्कृती' निर्माण झाली. अर्थात, हडप्पा संस्कृतीच्या अगोदर, तिच्या काळामध्ये आणि तिच्यानंतरही भारतातील ताम्रपाषाणयुगीन खेडी ही अस्तित्वात होतीच.

अशा या ताम्रपाषाणयुगीन खेड्यातील संस्कृतींची काही ठळक लक्षणे आहेत.

- हे आयताकृती किंवा गोल अशा कुडाच्या आणि मातीच्या विटांनी बनवलेल्या घरांमध्ये रहात. या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्याही असत. व्यवस्थित चोपलेली जमिन आणि शाकारलेले छत हे मुख्य

लक्षण. तर स्वयंपाकघरामध्ये चूल, जमिनीत पुरलेले साठपाचे भांडे व धान्यासाठी मोठ्या कणग्या हे दिसतेच.

● हे लोक शेती, पशुपालन, शिकार आणि मासेमारी असे उपजीविकेचे वेगवेगळे पर्याय हाताळत. शेती ही हाडांच्या /लाकडाचा नांगर वापरुन, जलसिंचनाच्या वेगवेगळ्या योजना राबवून केली जात असे. यांच्या पशुपालनामध्ये गुरांचा समावेश हा प्रामुख्याने होता. मात्र ज्यावेळी हवामान प्रतिकूल झाले त्यावेळी त्यांनी शेळया-मेंढ्यांना पाळायला मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली. यांनी तांब्याच्या कारागीरीत विकासावस्था गाठलेली होती. ते तांब्याची तसेच तांब्याच्या मिश्र धातूची हत्यारे/साधने वापरीत. अर्थात राजस्थान वगळता, इतर प्रांतात तांबे दुर्मिळ असल्याने, मागील काळातील दगडी पात्यांपासून बनविलेली हत्यारे अधिक प्रचारात होती. ही अश्महत्यारे चॅल्सिडोनी, चर्ट सारख्या दगडांच्या पात्यांपासून बनवलेली असत. काही ठिकाणी सूक्ष्मास्त्रेही वापरली जात. तसेच हाडांची हत्यारेही वापरत असत. मातीच्या भांड्यांना दैनंदिन जीवनामध्ये महत्वाचे स्थान असल्याने, प्रचंड प्रमाणावर गुणवत्ता आणि विविधता दिसून येते. साधारणतः हे 'काळ्या रंगाने चित्रित लाल भांडी' वापरत असत. अर्थात यांच्यामध्ये संस्कृतीनिहाय वैविध्य जाणवते. हे काही वस्तूंमध्ये विनिमयही करीत असत. यांचा एकमेकांशी, विशेषतः शेजाऱ्यांशी सहसंबंध असे. त्यांच्यात देवाणघेवाण चालत असे. हे पशू आणि मातृदेवतेचे पूजक होते. तसेच यांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता. त्यामुळे मृतांचे शक्यतो घरांमध्येच किंवा घराजवळ, विविध वस्तूंसह दफन केले जाई.

भारताच्या भौगोलिक विविधतेमुळे, येथे ताम्रपाषाणयुगाच्या विविध उपसंस्कृतीही निर्माण होत गेल्या, जसे, उत्तर भारतातील ओसिपी/कॉपर होर्ड संस्कृती, राजस्थानमधील आहाड/बनास संस्कृती, माळवा (पश्चिम मध्यप्रदेश) येथील प्रथम कायथा, पुढे आहाड नंतर माळवा संस्कृती; महाराष्ट्रातील सावळदा, जोर्वे संस्कृती इ. तर उत्तर कर्नाटकामध्ये नवाश्मयुग हे ताम्रपाषाणाबरोबर नांदताना दिसते. तसेच पश्चिमेला गुजरात आणि पूर्वेला बंगालपर्यंत या संस्कृतीचा विस्तार दिसून येतो. या सर्व संस्कृती देवाणघेवाणीच्या संबंधाने एकमेकांशी जोडलेल्या होत्या. विशेषतः भौगोलिकदृष्ट्या जवळच्या संस्कृतींमध्ये हे अधिक आढळून येते.

उत्तर भारतामध्ये ओसिपी/कॉपर होर्ड संस्कृती दिसू लागते. याठिकाणी पिवळ्या गेरुच्या रंगातील मडकी दिसून येतात. तसेच, एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर तांब्याच्या अवजारे/शस्त्रांचे साठे मिळालेले आहेत. अशी ९० स्थळं याठिकाणी सापडलेली आहेत.

याच ठिकाणी अलिकडेच सनौली हे एक महत्वाचे स्थळ उजेडात आलेले आहे. ज्यावेळी हडप्पा संस्कृती विकसित होत होती त्याचवेळी सनौली हे एक स्थळ स्वतंत्रपणे विकसित होत होते. याठिकाणी जी दफने मिळालेली आहेत ती अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशी आहेत. याठिकाणी घोड्यांच्या रथाचे पुरावे मिळालेले आहेत. तसेच, चिलखत, तांब्याचे शिरस्त्राण, तलवारी इ. शस्त्रेही मिळालेली आहेत. असे दिसते की ही योध्दांची दफने होती. आणि मरणोत्तर जीवनावर श्रध्दा असल्याने या योध्द्यांच्याबरोबर त्यांची शस्त्रे, शिरस्त्राण, रथ वगैरे पुरलेले होते. विशेष म्हणजे या लढवय्या समाजात स्त्री लढवय्यांचे प्रमाणही मोठे होते.

अद्याप यांची दफनंच उजेडात आलेली आहेत. यांच्या वसाहतींचा अधिक अभ्यास झाल्यास अधिक माहिती मिळू शकेल.

हडप्पा संस्कृतीच्या समकालीन मात्र स्वतंत्र ओळख असणारी म्हणजे राजस्थानमधील आहाड संस्कृती (इसवी सन पूर्व २१००-१५००). ही बनास नदीच्या खोऱ्यातील, मेवाड भागात निर्माण झाली. आहाड, गिलूंड, बालाथल ही या संस्कृतीची महत्वाची स्थळं होत. ही संस्कृती तांब्याच्या खाणींच्या प्रदेशामध्ये निर्माण झाल्याने, यांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला. यांची लोकसंख्याही अधिक होती. त्यामुळे यांच्या वसाहती खूप मोठ्या झाल्या. तांब्याच्या उत्कृष्ठ कारागीरीबरोबरच, हे लोक मुख्यत्वे शेतकरी होते. त्याचबरोबर मेवाडच्या डोंगराळ भागामुळे पशुपालनही शक्य होते. शिवाय शिकार आणि मासेमारी हे जोडउद्योग होतेच. येथील लोक मातीच्या विटांनी बनवलेल्या, कुडाच्या किंवा दगडी घरांमध्ये रहात असत. स्वयंपाकघरात चूल, भट्टी आणि जमिनीतील साठपाचे राजंण या महत्वाच्या गोष्टी असत. हे पांढऱ्या रंगाने चितारलेली काळी-तांबडी भांडी वापरत असत. विविध मौल्यवान दगडांनी बनवलेल्या मणींवरुन येथील मणीकारीचे कौशल्य समजतेच शिवाय यांची आभूषणांची आवडही कळते. या संस्कृतीने अगदी माळव्यापर्यंतचा प्रदेश प्रभावित केलेला होता.

हडप्पा संस्कृतीच्या समकालीन, माळव्यामध्ये आपल्याला प्रथम कायथा संस्कृती दिसून येते. हिच्यावर हडप्पा संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. येथे पुढे राजस्थानमधून आहाड संस्कृतीचे लोक आले. पुढे याठिकाणी माळवा संस्कृती विकसित झाली. कायथा, महेश्वर, नावडाटोली, ऐरण ही येथील संस्कृतीची महत्वाची पुरातत्वीय स्थळे होत. कापसाची उत्तम काळी जमिन आणि बारमाही वाहणाऱ्या नद्यांतून होणारा पाण्याचा पुरवठा यामुळे याठिकाणी शेती प्रचंड विकसित झालेली दिसून येते. कायथा संस्कृतीच्या काळामध्ये याठिकाणी लोक कुडांच्या घरांमध्ये रहात असत. हे लोक शेती करीत असत. तसेच पशुपालन, शिकार, मासेमारी हे ही पर्याय स्विकारत. ते कारागीरी आणि विनिमयात ही गुंतलेले होते. त्यांनी तांब्याच्या कारागिरीत कौशल्य मिळवलेले होते. हे आपल्याला बाणाग्रं, तलवारी, छिन्नी, कुऱ्हाडी; तसेच मणी, अंगठ्या, बांगड्यावरुन कळून येते. पूर्वीप्रमाणे दगडाचीही हत्यारे ते बनवत असत, जसे, रिंग स्टोन, पाती, सुरे, वेधण्या इ. हे उत्तम मणीकार ही होते. १५० च्या वर मौल्यवान दगडांचे मणी गुंफलेला कंठहार याठिकाणी सापडलेला आहे. यावरुन दिसते की यांना अलंकार आणि आभूषणांचा छंद होता. पुढे आहाड संस्कृतीने यांना भाजीव मातीचे पुतळे आणि खेळण्या बनवण्याची तसेच बैलपूजनाची देणगी दिली. वास्तविक आहाड लोक हे तांब्यामध्ये हत्यारे बनवणारे. मात्र, याठिकाणी तांबे मिळत नसल्याने, दगडी पात्यांची हत्यारे ते बनवू लागले. पुढे माळवा संस्कृतीच्या काळामध्ये या प्रदेशात विकासावस्था निर्माण झाली. आता ऐरणसारखी मोठी स्थळं मातीच्या तटबंदीने सुरक्षित करण्यात आली. येथील लोक आयताकृती आणि गोलाकार घरांमध्ये रहात असत. घरं कुडाची असून, जमिन व्यवस्थित चोपलेली आणि छत गवताने शाकारलेले असे. या काळानंतर हे लोक पुढे महाराष्ट्रात गेल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगाचे अवशेष हे तापी, गोदावरी, भीमा नदींच्या खोऱ्यात मिळालेले आहेत. यामध्ये प्रकाश, दायमाबाद, इनामगाव ही मोठी स्थळं तर जोर्वे, नाशिक, नेवासा, कवठे, वाळकी,

सोनगाव, चांदोली अशी छोटी स्थळं आपल्याला दिसून येतात. अलीकडे सांगली जिल्ह्यात सिध्देवाडी येथेही या काळाचे अवशेष मिळालेले आहेत. १९८० च्या दशकात, ढवळीकरांच्या नेतृत्वाखाली, डेक्कन कॉलेजने इनामगाव (जि. अहमदनगर) याठिकाणी एक महत्वाचे उत्खनन केले. यातून महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगावर सविस्तर प्रकाश पडलेला दिसून येतो.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगाचे एकूण पाच उपकालखंड पडतात, सावळदा संस्कृती, उत्तर हडप्पा संस्कृती, माळवा संस्कृती, जोर्वे संस्कृती आणि उत्तर जोर्वे संस्कृती.

**सावळदा संस्कृती** (इसवी सन पूर्व २५००-२२००) ही मुख्यत्वे तापी-गोदावरी नदीच्या खोऱ्यात उदयास आली आणि विकसित झाली. दायमाबाद हे याकाळातील एक विकसित खेडे होय. येथील लोक मातीच्या विटांनी बनवलेल्या चतुष्कोनी घरात रहात. उत्तम चोपलेली जमिन आणि गवताने शाकारलेले छत अशा स्वरुपाची ही घरं असत. एकत्र कुटुंबपध्दती असल्याने, या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्या आढळून येतात. या काळातील तुलनेने साध्या वसाहतीतील लोक मात्र खड्ड्यातील छोट्या झोपड्यांमध्ये रहात अस. अर्थात अशा झोपड्या या फक्त साठवणूकीसाठी असून, खरा वावर हा अंगणातच असे. या काळातील लोक स्थिर शेतकरी असून; गहू, बार्ली, वाटाणा, विविध डाळी पिकवत असत. हे लोक उत्तम कारागीरही होते. काळ्या रंगाने चितारलेली लाल मडकी हे बनवत असत. या मडक्यावर विविध चित्रे, नक्षी काढलेली असे. हे दगडाचे पाटा-वरंवटा बावत. तांबे/कास्याच्या अंगठ्या, कार्नेलियन, अगेटच्या मण्या इ. आभूषणं ते बनवत. मात्र हरणांची हाडं वापरुन, त्यांनी मोठ्या प्रमाणावर हाडांच्या हत्यारांचा वापर केलेला दिसून येतो. हे लोक, हाडांची बाणाग्र असलेले बाण वापरुन शिकारही करीत असत. तसेच मासेमारीही करीत असत. यांच्या मडक्यांवर, मासे आणि मत्स्यबाणांची चित्रं आढळतात.

पुढे उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक (इसवी सन पूर्व २२००-२०००), गुजरातमार्गे याठिकाणी आले. यांनी नियोजनबध्द वसाहतीची सुरुवात केली. आपल्या वसाहतींना मातीची तटबंदी बांधून सुरक्षित केले. तसेच पुराच्या पाण्यापासून वाचण्यासाठी नदीला बांधही घातला. हे विविध खोल्या असलेली, मोठी घरे बांधून रहात असत. यातील काही खोल्या फक्त धान्य साठविण्यासाठी, काही जनावरांचा गोठा म्हणून उपयोगी आणली जात असत. यातील काही मोठ्या कुटुंबांनी आपल्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र तटबंदीही बांधलेली होती. हे उत्तम शेतकरी होतेच. हे लाकडी नांगराच्या मदतीने गहू, बार्ली, मसूर, वाटाणे, तीळ, भाजीपाला, फळे पिकवीत असत. शेतीबरोबरच पशुपालन, शिकार, मासेमारी हे विविध पर्यायही हाताळले जात. हे गुरांबरोबरच शेळया-मेंढ्यांचेही पालन करीत. तर शिकारीसाठी हरीण, नीलगाय, ससे हे विशेष आवडीचे प्राणी होत. शिवाय यांना कारागीरीचेही उत्तम ज्ञान होते. त्यामुळेच, या काळातील दायमाबाद येथून कांस्याची सारथ्यासह बैलांचा रथ, हत्ती, रानगवा, गेंडा अशी उत्कृष्ट शिल्पं मिळालेली आहेत. या लोकांची दफनं वसतीपासून दूर असत. यांची वसाहत ही मुख्यत्वे तापी नदीच्या खोऱ्यातच राहिली.

**दायमाबाद येथील कांस्याच्या वस्तू**









त्यानंतर, *माळवा संस्कृतीचे* लोक या खोऱ्यांमध्ये आले (इसवी सा पूर्व १७००-१४००). हे अगदी भीमा नदीच्या खोऱ्यापर्यंत महाराष्ट्रात पसरलेले होते. या संस्कृतीमध्ये महाराष्ट्राने समृध्दी पाहिली. येथील शेतकरी मातीच्या विटांनी बनवलेल्या मोठ्या आयताकृती घरांमध्ये रहात असत. यांची घरं ही नियोजनबध्द होती. शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन. त्यामध्ये गहू, बार्ली, वाटाणा, तीळ इ. वैविध्यपूर्ण पीक पिकवित. शेतीबरोबरच यांची कारागिरीही वैशिष्ट्यपूर्ण अशी होती. हे विविध प्रकारची लाल मडकी बनवत. त्यांवर काळ्या रंगात विविध चित्रे काढीत असत. यांच्या चित्रांमध्ये भौमितिक आकृत्यांबरोबरच, विविध प्राण्यांचीही चित्रं आढळतात. जसे, हरीण, बैल, कुत्रा, सुसर, सरडे इ. मांसाहारासाठी हरणाचे मांस हे अधिक पसंतीचे त्यात त्याची हाडंही टणक. यांचा वापर शस्त्रं तयार करण्यासाठी होतो. त्यामुळे याच्या मडक्यांवर हरणांची चित्रे मोठ्या प्रमाणावर आढळतात. एका मडक्यावर, एका पुरुषासमोर विविध प्राणी नम्रपणे उभे आहेत असे एक चित्र आहे. यावरुन, यांच्या धार्मिक जीवनात 'पशुपती'चे पूजन होत असावे असा एक संकेत मिळतो. यांच्या मुख्य वसाहतींमध्ये प्रकाश, दायमाबाद आणि इनामगाव या स्थळांचा समावेश होतो.

पुढे, मागील माळवा संस्कृती आणि उत्तर कर्नाटकातील नवाश्मयुगीन-ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींच्या सहसंबंधातून, जोर्वे संस्कृतीचा उदय झाला (इसवी सा पूर्व १४००-१२००). या संस्कृतीतील लोक एकत्र कुटुंबपध्दतीत रहात असत. यांची नियोजनबध्द अशी मोठमोठी आयताकृती घरे होती. याबरोबरच चौकोनी आणि गोलाकार अशी घरंही बांधली जात. यांच्या घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्या दिसून येतात. यातील स्वयंपाकघरामध्ये चुलीबरोबरच, जमिनीमध्ये धान्याचे बळद असे तर साठपासाठी कणगीही असे. घराच्या जमिनीबरोबरच, अंगणसुध्दा अगदी चोपून तयार केलेले असे. या अंगणामध्येही बळद असे तसेच मोठे चुलाणे असे. अशा घरांच्या ओळी असत आणि या ओळींमधून जाणारी वाटही होती.

साधारणत: वसाहतीचा मुख्य हा मध्यभागी रहात असे. या मुख्याचे घरही मोठे आणि नियोजनबध्द असे होते. याच्या घराजवळच एक धान्याचे कोठारही होते. म्हणजेच या मुख्याचे सर्व वसाहतीच्या अर्थकारणावर एकप्रकारे नियंत्रण होते. म्हणूनच याचे दफनही, इतरांच्या दफनापेक्षा वेगळे केलेले दिसून येते. या मुख्याच्या घराजवळच सुखवस्तू लोक रहाताना दिसतात. हे लोक उत्तम प्रथिनयुक्त आहार घेत असत. यांच्यापासून काही दूर, बाकींच्या लोकांची घरं, तुलनेने निकृष्ठ स्वरुपाची दिसून येतात. यामध्ये कुंभाराचे, मणीकाराची, खाटकाची अशी घरं दिसून येतात.

या काळातील लोक मुख्यत्वे शेती करीत. जलसिंचनासाठी, इनामगावमधील लोकांनी; घोडनदीचे अतिरिक्त पाणी, कालव्याद्वारे एका तलावात साठवून ठेवलेले होते. त्याला समांतर असा दगडमातीचा बांधही घातलेला होता. पाण्याच्या या बारमाही सोयीमुळे, हे लोक रब्बी आणि खरिफ अशा दोन्ही हंगामात शेती करीत असत. येथे गहू, ज्वारी, बाजरी, सातू, वटाणे, कुळीथ इ.पीके घेतली जात. काही वेळा, मुख्य वसाहतीपासून सुपीक जमिन फार दूर असेल तर अशावेळी या लोकांनी, त्याठिकाणी हंगामी वसत्याही उभ्या केलेल्या आहेत. जसे इनामगावचे लोक संगमावरील वाळकीला येत असत. बैलाच्या हाडाचा नांगर वापरुन हे शेती करीत असत. थोडक्यात या काळात शेतीतून भरघोस उत्पादन काढले जाऊ लागले.

शेतीबरोबरच गुरे, शेळ्या-मेंढ्या, डुकरं, कोंबड्यांचे पालन केले जाई. तसेच शिकार आणि मासेमारी हे पर्यायही होतेच. शेतीच्या विकासामुळे, कारागीरी आणि विनिमयही विकसित झालेला दिसतो. मुख्यत्वे साधने/हत्यारे ही गारेच्या दगडांची केली जात. 'मडकी' जीवनशैलीतील महत्वाचे साधन असल्याने, कुंभारकला अतिशय विकसित झालेली दिसते. दायमाबादमध्ये कुंभाराच्या मोठ्या भट्ट्या मिळालेल्या आहेत. लहान वाटग्यापासून, साठपाच्या मोठ्या रांजणापर्यंत, या मडक्यांमध्ये वैविध्य येते. काळ्या रंगामध्ये चितारलेल्या चित्रांमध्ये, पारंपारिक भौमितिक आकृत्यांप्रमाणे, मानवाच्या अनुभवविश्वातील वनस्पती आणि प्राण्यांचाही समावेश होतो. यांच्यात तांब्यात काम करणारे तांबट होते, सोनार होते, मणीकार होते तसेच चुना तयार करणारे ही होते. हे लोक तांब्यामध्ये कुऱ्हाडी, छिन्नी, गळ, अलंकार, मणी तयार करण्यासाठी गिरमिटे, सोनारकामाचे चिमटे तयार करीत असत. तसेच सोन्याचे मणी, कर्णफुलं अशी आभूषणंही तयार करीत. यांचे कोकण, सौराष्ट्र, कर्नाटक इ. भागांशी सहसंबंध होते. कडवे वाल, सागरी मासे कोकणातून, सौराष्ट्रातून शंख तर कर्नाटकातून सोने येत असे.

'मातृदेवतेला' यांच्या धार्मिक जीवनात महत्वाचे स्थान होते. अशा शिरोविहीन मातृदेवतेच्या मूर्ती इनामगावामध्ये मिळालेल्या आहेत. त्याचप्रमाणे 'बैला'चे ही पूजन केले जात असावे. ही परंपरा अगदी हडप्पा संस्कृतीपासून दिसते. दफनांचा विचार करता, या काळातील मानवावर कर्नाटकातील नवाश्मयुगीन-ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. यांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास असून, मृतांना घरांमध्ये अथवा घराजवळच पुरले जात असे. मृत मुलांचे ते, तोंडे जुळविलेल्या भांड्यामध्ये दफन करीत. तर प्रौढ मृतांचे, एका खड्डयात दक्षिणेकडे पाय करुन, उताणे ठेवून दफन केले जात असे. इनामगावमध्ये अशा प्रौढ मृतांचे पाय घोट्यापासून तोडलेले आहेत. मात्र येथील मुखियाच्या दफनात वेगळेपणा दिसून येतो. याला एका मोठ्या रांजणात ध्यानस्थ स्वरुपात बसवलेले आहे. तसेच याचे पायही तोडलेले नाहीत. अशा मृतांबरोबरच, त्याचा पुढील प्रवास सुखकर व्हावा यासाठी विविध भांड्यामध्ये अन्न, पाणी, विविध वस्तूही ठेवल्या जात.

**कुंभाराची भट्टी, इनामगाव**



पुढे महाराष्ट्रातील हवामान हे शेतीसाठी प्रतिकूल झाले; पाऊस कमी झाला आणि हवामान हे अधिक कोरडे झाले. स्वाभाविकच यांची आर्थिक परिस्थती ढासळली. लोकसंख्याही कमी झाली. या काळाला उत्तर जोर्वे कालखंड असे म्हणतात (इसपू १२००-९००). इनामगावसारख्या ठिकाणी आपल्याला आता छोट्या छोट्या झोपड्या दिसून येतात. यांच्यामध्ये कोणत्याही स्वरुपाची नियोजनबध्दता दिसून येत नाही. झोपड्याही हंगामी स्वरुपाच्या असतात. यांच्या भांड्यांचा, हत्यारांचा दर्जाही खालावतो. अशा परिस्थितीत एका जागी स्थिर करुन शेती करीत राहणे या लोकांसाठी अशक्य बनले. ते पशुपालनाकडे वळले. बैल,गायी सारख्या मोठ्या जनावरांना पाणी जास्त लागत असल्याने, यांनी, शेळ्या-मेंढ्याचे पालन करुन, निमभटकी जीवनशैली स्विकारली. त्यांच्या आहारामध्ये ही शेळ्या-मेंढ्यांचे प्रमाण अधिक आले. तसेच शिकार, मासेमारीचे प्रमाणही वाढले. या काळात हरणांच्या शिकारीचे प्रमाणही वाढलेले दिसते. मात्र अशाही परिस्थितीत धार्मिक परंपराचे पालन पूर्वीप्रमाणेच केले जात असे. अर्थात, स्थैर्यासाठी आवश्यक असणाऱ्या

बाबी शिल्लक न राहिल्याने, या काळात, हे लोक अन्नाच्या शोधात भटकू लागले. यावेळी त्यांचा महाशिलायुगीन लोकांशी संपर्क येऊ लागतो.

उत्तर कर्नाटकातील ताम्रपाषाणयुगामध्ये, नवाश्मयुगाच्याही ठळक परंपरा दिसतात. या लोकांचा महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीशी जवळचा संबंध होता. मस्की, पिकलीहाळ, ब्रह्मगिरी, संगनकल्लू, हल्लूर, टेक्कलकोटा ही या काळातील काही महत्वाची स्थळे होत. हे लोक कुडाच्या गोलाकार आणि शंक्वाकृती झोपड्यांमध्ये रहात असत. येथील कुंभार वेगाने फिरणाऱ्या चाकावर उत्कृष्ठ भांडी बनवित असत. हे दगडी पात्यांची हत्यारे वापरीत. तसेच हे तांब्याची विविध हत्यारे वापरीत असत, जसे, कुऱ्हाड, छिन्नी इ. यांना अलंकार आणि आभूषणांचाही छंद होता. यांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता. हे आपल्या घरांच्या खाली किंवा जवळच मृतांचे दफन करीत असत. मृत मुलांचे मडकी जोडून तर मृत प्रौढांचे मडकी जोडून किंवा आडवे झोपवून दफन केले जात असे. मृतांबरोबर विविध वस्तू आणि अन्नही ठेवले जात असे.


**क. भारतातील पहिले नागरीकरणः हडप्पा संस्कृती**

**हडप्पा संस्कृतीचा शोध व तिला हडप्पा का म्हणतात?**

अश्मयुगाच्या शेवटच्या टप्प्यात; म्हणजे नवाश्मयुगीन क्रांतीनंतर भारताने ताम्रपाषाणयुगात प्रवेश केला. यास 'इतिहासपूर्व काळ' असेही म्हणतात. या काळात, भारतभर विविध खेड्यांचा उदय झालेला होता. मात्र, वायव्य भारतातील काही खेड्यांनी, विविध कारणांमुळे, नागरी जीवनापर्यंत प्रगती केली. यातून भारताचे पाहिले नागरीकरण घडून आले. अशा संस्कृतीस 'हडप्पा संस्कृती' असे म्हणतात.

साधारण १८५० मध्ये अलेक्झांडर कनिंगहॅमने हडप्पा या ठिकाणी प्राथमिक उत्खनन केले. तसेच पुढे, तसेच लाहोर-मुलतान रेल्वेमार्गासाठी वीटा आणताना येथे एका नव्या सभ्यतेचा अंदाज आलेला होता. मात्र त्यांना या संस्कृतीचा कालनिर्णय करता आलेला नव्हता. पुढे सर जॉन मार्शलने, एम.एस.वत्स बरोबर पुरातत्व विभागामार्फत विस्तृत प्रमाणावर उत्खनन करुन या सभ्यतेचा व्यवस्थित शोध लावला (१९२१). तसेच, पुढे दयाराम साहनी यांनी हडप्पा येथे व राखालदास बॅनर्जी यांनी मोहेनजोदडो येथे उत्खनन करुन हडप्पा संस्कृतीस आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त करुन दिले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर मॉर्टिमर व्हिलर, ग्रेगरी पॉसेल, बी.बी.लाल, ए. घोष, राव, बीश्त इ. संशोधकासह; इतर संशोधकांनी किमान १०२२ स्थळांचा शोध लावला. यातील कालीबंगा (राजस्थान), राखीगढी (हरियाणा), लोथल (गुजरात) तसेच धोलावीरा (गुजरात) या नगरांचा शोध आणि तेथील उत्खननं महत्वाची ठरली.

## हडप्पा संस्कृतीचा विस्तार




भारताचे पहिले नागरीकरण घडवून आणणारी ही सभ्यता मुख्यत्वे सिंधू नदीच्या खोऱ्यात विकसित झालेली असल्याने हिला 'सिंधु संस्कृती' असे म्हणले जात होते. पुढे, या सभ्यतेची अनेक स्थळं सरस्वती नदीच्या खोऱ्यात मिळाली. यातूनच, स्थळांच्या वितरणावरुन हिला 'सिंधु-सरस्वती' आणि 'सरस्वती संस्कृती' असेही म्हंटले जाऊ लागले. मात्र  पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मते, *ज्या संस्कृतीच्या पहिल्यावाहिल्या खुणा हडप्पा याठिकाणी मिळालेल्या असल्याने,* यास 'हडप्पा संस्कृती' असेच म्हणावे लागते. हे नाव बरेच व्यापक आणि वर्तमाकालीन विविध वादापासून निरपेक्ष असल्याने, हेच नाव सध्या सर्वत्र स्विकारलेले आहे.

## हडप्पा संस्कृतीचा कालक्रम

अशा या हडप्पा संस्कृतीचा उदय ही काही एका रात्रीत घडून आलेली घटना नव्हती. साध्या खेड्यापासून ते विकसित प्रचंड शहरापर्यंत आणि पुन्हा ऱ्हासापर्यंत, जवळजवळ अडीच-तीन हजार वर्षे प्रवास केलेली ही एक सांस्कृतिक प्रक्रिया होती. ही प्रक्रिया खालील टप्प्यातून उलगडताना दिसतेः

(नवाश्मयुग: इसपू ८००० ते ४०००), पूर्व हडप्पा काळ- इसपू ४००० ते २६००, विकसित हडप्पा काळ-इसपू २६०० ते १९००, उत्तर-हडप्पा काळ-इसपू १९०० ते १३००.

'हडप्पा संस्कृती'ची, जी आपण वैशिष्ट्ये पाहणार आहोत ती 'विकसित हडप्पा काळामध्ये' मोडतात. अर्थात, त्यापूर्वी, 'पूर्व हडप्पा' काळाची काही लक्षणं पाहू. यातूनच, पुढे, 'विकसित हडप्पा'चा विकास घडून आला.

**पूर्व हडप्पा**

सर्वसाधारणतः भारताच्या वायव्य भागात (यामध्ये सध्याच्या पाकिस्तानचा ही भाग मोडतो) आपल्याला पूर्व हडप्पाच्या खूणा दिसून येतात.

सिंधू नदीच्या खोऱ्यात 'आम्री', 'बालाकोट', 'कोट दिजी' याठिकाणी पूर्व हडप्पाच्या खूणा दिसून येतात. याठिकाणी दुहेरी नगररचना; तटबंदीयुक्त नगर; रंगीत मडकी; मडक्यांवर शिंगांचा मुकूट असलेली देवता, पिंपळाची पाने अशा आकृत्या इ. पुरावे मिळाले. तर, भारतातील 'कालीबंगा', 'बनावली', 'राखीगढी', 'भीरराणा', 'धोलावीरा' येथेही असेच पुरावे; शिवाय, १:२:४ असा विटांचा प्रमाणबध्द आकार, अंगण आणि त्याभोवती खोल्या असलेली घरं असे पुरावे मिळाले.

पुढे, विकसित हडप्पाच्या काळात, या गोष्टी हडप्पा संस्कृतीच्या महत्वाचे लक्षण बनल्या.

**हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये (विकसित हडप्पा काळ)**

**अ. विस्तार**

आजपर्यंत, या संस्कृतीची १०२२ स्थळं उजेडात आलेली आहेत. यातील ६१६ भारतात असून, ४०६ सध्याच्या पाकिस्तानमध्ये आहेत. या स्थळांतील एकूण ९७ ठिकाणांमध्ये उत्खनन झाले आहे. वायव्य भारतामधील, मुख्यत्वे सिंधु व सरस्वती नद्यांच्या खोऱ्यात ही संस्कृती विकसित झालेली असून, सर्वसाधारणत: तिचा विस्तार उत्तरेस सरायखोला (इशान्य पाकिस्तान) पासून ते दक्षिणेस दायमाबाद (महाराष्ट्र) पर्यंत तर पश्चिमेस मुंडिगाक, शोर्तुघाई (अफगाणिस्तान) पासून अथवा सुत्काजेनदोरपासून (मकरान किनारा, नैऋत्य पाकिस्तान) पूर्वेस आलमगीरपूर (वायव्य प्रदेश) पर्यंत जवळजवळ ६-८ लाख चौ. किमी इतके क्षेत्र या सभ्यतेने व्यापलेले आहे. तर विशेषकरुन भारताचा विचार करता, काश्मीर (मांडा), पंजाब (रुपर), हरीयाणा (बनावली, राखीगढी), उत्तर प्रदेश (आलमगीरपूर), राजस्थान (कालीबंगा), गुजरात (लोथल, धोलावीरा, भगतराव), महाराष्ट्र (दायमाबाद) इ. प्रदेशात हिचा विस्तार आढळून येतो. सर्वसाधारणत: ही संस्कृती पूर्व अफगाणिस्तान, पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम/वायव्य भारत या विस्तृत क्षेत्रात पसरलेली असून; डोंगराळ भाग, मैदानी भाग, नद्यांची खोरी, वाळवंट, समुद्रकिनारा इ. सर्व प्राकृतिक वैशिष्ट्यांत वसलेली आहेत.

या संस्कृतीचा विस्तार हा प्रचंड जरी असला तरी तिचा मुख्य गाभा हा भारताच्या वायव्य/पश्चिम भागात प्रामुख्याने दिसून येतो. बऱ्याच वेळा व्यापारी संबंधातून आणि कच्चा माल मिळविण्याच्या उद्देशाने दूरवर वसाहती निर्माण झालेल्या दिसून येतात.

**ब. नगररचना**

हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्यापूर्ण नगरे आपल्याला मिळतात. हजारो वर्षांपूर्वीची, अतिशय अत्याधुनिक अशी ही नगरे पाहून आपण आश्चर्यचकित होतो.

ही नगरे एकतर नदींच्या काठावर आहेत. किंवा, खनिजसंपत्तीच्या जवळ वसवलेली आहेत. या नगरांची अतिशय शिस्तबध्द आणि व्यवस्थित अशी नगररचना असे. त्याचप्रमाणे त्या नगरांमध्ये लक्षणीय असे सार्वजनिक स्थापत्य सुध्दा आपल्याला आढळते.

या नगरांचे बालेकिल्ल्याचा भाग (Citadel) व लोकवस्तीचा भाग (Lower Town) असे दोन भाग असत. कालिबंगा या ठिकाणी मात्र काही घरे नगरांबाहेरही आढळून आलेली आहेत. तर, धोलावीरामध्ये लोकवस्तीचा आणखीन एक भाग, क्रिडांगण आणि प्रशासकीय-निवासी संकुलही दिसून येते.

**तटबंदी :** ही नगरे व्यवस्थित तटबंदीने संरक्षितही केलेली असत. काही ठिकाणी सर्व वसाहतीला एक सामायिक स्वरुपाची तटबंदी आहे. तर काही ठिकाणी, या सामायिक तटबंदीसह, प्रत्येक विभागाला स्वतंत्र तटबंदी आहे. तर काही ठिकाणी फक्त बालेकिल्ल्याला तटबंदी आहे. ही तटबंदी मातीच्या विटांनी बनवलेली असे. तसेच अधिक मजबूतीसाठी; तटबंदीस, बाहेरुन भाजक्या विटांच्या दुय्यम तटाने आधार दिलेला आहे. या तटबंदीच्या कोपऱ्यांवर तसेच विविध ठिकाणी बुरुजही (भाजीव विटांचे) बांधलेले आहेत, या बालेकिल्ल्यात प्रवेश करण्यासाठी प्रवेशद्वारं असत.

**घरे :** ही घरे साधारणत: लोकवस्तीच्या भागात दिसून येतात. ही घरे भाजीव वीटांची बांधलेली असत. ४:२:१ असे विटांचे प्रमाण असे. या घरांची 'एक चौकोनी अंगण आणि त्याच्या चारही बाजूला खोल्या' अशी रचना दिसून येते. अगदी अलीकडेपर्यंत भारतात या रचनेचे वाडे बांधले गेलेले दिसून येतात. या घरांची जमिन मातीच्या विटांनी तयार केलेली असे. तर काही ठिकाणी फरश्याही बसवलेल्या होत्या. तसेच गुरांना चारा खाण्यासाठी व पाणी पिण्यासाठी अंगणात मातीच्या विटांचे एक मोठे भांडे व जमिनीत एक मडके पुरलेले असे.

सर्वसाधारणत: ही घरं एकमजली आहेत. काही दुमजली घरंसुध्दा दिसून येतात. काही घरांमध्ये तर जवळजवळ १२ खोल्या दिसून येतात. याहीपेक्षा मोठी घरे आढळलेली असून, यामध्ये स्वयंपाकघर तसेच शौचालयांची सोय करण्यात आलेली होती. काही धनाढ्यांच्या घरांमध्ये स्वतंत्र जलतरण तलावाचीही सोय होती असे दिसते. पाणीपुरवठ्यासाठी घरांमध्ये विहिरीची सोय केलेली दिसते. येथे सांडपाणी वाहून जाण्यासाठी उत्तम व्यवस्था असून, गटारे विटांनी बांधलेली असत. या घरांचे दरवाजे अरुंद गल्ल्यांमध्ये

उघडत असत. काही मोठ्या घरांचा अंगणात घडणारा दरवाजा हा बैलगाडी जाण्याइतका मोठा केलेला दिसून येतो.

**रस्ते :** या भागातील रस्ते उत्तर-दक्षिण जाणारे असून, एकमेकांना व्यवस्थित काटकोनात छेदत असत. मोहेनजोदडो येथील मोठा रस्ता हा कमीतकमी १० फूट रुंद आहे. या घरांबरोबरच, लोकवस्तीच्या भागात; घरांबरोबरच, कारागीरांच्या कार्यशाळा आणि दुकाने ही होती, जसे, कुंभारांच्या भट्टया, रंगाऱ्यांचे कुंड, धातुमध्ये काम करणाऱ्यांची, शंख-शिंपल्यांचे अलंकार करणाऱ्यांची तसेच मणीकारांची.

नगररचनेचा विचार करता **धोलावीरा**चा विशेष करुन आपल्याला विचार करणे आवश्यक आहे. धोलावीरा (ता. बछाऊ, जि. कच्छ) हे गुजरातमधील कच्छच्या वाळवंटातील 'खादिर' नावाच्या बेटावर बसलेले आहे. येथील नगररचना मात्र अतिशय विकसित अशा स्वरुपाची दिसून येते. याठिकाणी, बालेकिल्ला आणि लोकवस्तीचा भाग आहेच. शिवाय, वाढीव लोकसंख्येमुळे येथे लोकवस्तीचा आणखीा एक भाग निर्माण केलेला आहे. तसेच बालेकिल्ल्याजवळ एक स्वतंत्र तटबंदीचे 'निवासी-कार्यालयीन संकुल' उभारण्यात आलेले होते. येथे मुख्यत्वे व्यापारी प्रशासनाचे कार्यालय असावे. त्याचबरोबर या ठिकाणी एक 'खुले सभागृह' निर्माण करण्यात आलेले होते. या नगराला एक सामायिक तटबंदी होतीच, शिवाय, प्रत्येक विभागाला, त्याची त्याची स्वतंत्र तटबंदी होती. हे नगर आयताकृती आहे. या नगराच्या तटबंदीचा पाया जवळजवळ ११ मीटरचा होता. अधिक मजबूतीसाठी तटाला ५ मीटर रुंद मातीच्या विटांचा आधारही दिलेला होता. या तटाला चुन्याचा गिलावा देण्यात आला. मातीच्या विटा टिकून रहाव्यात तसेच कच्छचा उन्हाळा सुसह्य व्हावा यासाठी येथील घरांनाही चुन्याचा गिलावा देण्यात आलेला होता. या नगराच्या प्रवेशद्वारासमोर, बहुधा नगराच्या नावाचे लाकडी फलकही बसवण्यात आलेले होते. या फलकावर खाचा पाडून त्यामध्ये स्टेटाईटची १० अक्षरे (३३ सेमी ंच    २७ सेमी रुंद) बसवण्यात आलेली होती.

***सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था:*** सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था असणे हे कोणत्याही नगराचे प्रधान वैशिष्ट्य असते. आजसुध्दा अनेक शहरं या समस्येनी त्रस्त आहेत. असे असताना, हजारो वर्षापूर्वी हडप्पा संस्कृतीतील नगरांमध्ये ही एक अद्‌भूत व्यवस्था होती असे दिसून येते.

या नगरांमध्ये घरटी स्नानगृह दिसून येते. यातील सांडपाणी गटारांद्वारे बाहेर काढले जात असे. अशी प्रत्येक घरांतून निघणारी गटारे पुढे रुंद अशा एका सामाईक गटारीला जोडलेली होती. पुढे हे सामाईक गटार नगराबाहेर जात असे. तेथे हे सांडपाणी डंप केले जाई.

अशी ही व्यवस्था पूर्णपणे भूमिगत होती. भाजीव विटांनी ती बांधून घेतलेली होती. तसेच, या गटारींवर टप्प्याटप्प्यावर चेंबर्स असत. ही पुरुषभर मोठी असून, गटारींची नियमित स्वच्छता करण्यासाठी यांचा उपयोग होत असे.

**हडप्पाकालीन सांडपाण्याची व्यवस्था**




**सार्वजनिक स्थापत्य:** कोणत्याही नगराचे सार्वजनिक स्थापत्य हे एक महत्वाचे वैशिष्ट्य असते. यामध्ये, सार्वजनिक उपयोगाच्या विविध इमारतींचा समावेश होतो. खालीलप्रमाणे:

***महास्नानगृह:*** मोहेनजोदडोच्या बालेकिल्ल्यातील महास्नानगृह हे ६० x ३६ मी. असून, मध्यभागी पोहण्यासाठी १२ x ७ मीटरचा चा तलाव (तीन मीटर खोली) होता. हे भाजीव विटांनी बांधलेले आहे. याचा तळ २ ते ३ मी. रुंद असून, पाणी झिरपू नये यासाठी आतील बाजूने चुन्याचा गिलावा केलेला होता. या तलावात उतरण्यासाठी पायऱ्या असून, कपडे बदलण्यासाठी तसेच पूजाविधी करण्यासाठी भोवताली खोल्याही आहेत. यात सतत पाणीपुरवठा व्हावा यासाठी जवळच एक तळे आहे तर सांडपाण्यासाठी भूमिगत व्यवस्था आहे.

**हडप्पाकालीन महास्नानगृह, मोहेनजोदडो**




***धान्याचे कोठार:*** हडप्पा येथे रावी नदीच्या दक्षिणेस व खळ्याजवळ धान्यकोठार आहे. हे कोठार एकूण ५५ x ३० मीटरच्या क्षेत्रात तयार केलेले आहे. यामध्ये कोठारांच्या एकूण दोन रांगा असून, प्रत्येक रांगात

सहा कोठारे (प्रत्येकी १५ x ६ मी.) आहेत. या कोठारांचा पाया भाजीव वीटांचा असून, कोंदट हवा जाण्यासाठी छिद्रं तयार केलेली आहेत. जवळच ***कामगारांच्या चाळी*** आहेत. आणि त्याजवळ खळे आहे. हे खळे म्हणजे धान्य कुटण्यासाठी ***उंचवटे*** तयार केलेले आहेत. एकूण पाच पूर्वपश्चिम रांगात हे उंचवटे असून, प्रत्येक रांगात सहा उंचवटे आहेत. हे उंचवटे (३.५ मी व्यासाचे) भाजीव विटांच्या वेटोळयांनी वेढलेले असून, त्यामुळे मध्यभागी खोलगट भाग तयार झालेला आहे. थोडक्यात, धान्य हे खळ्यावर साफ केले जात असावे. पुढे, असे साफ केलेले धान्य कोठारात ठेवले जात असावे. आणि, पुढे रावी नदीतून व्यापाराला जात असावे. आणि हे काम करणारे कामगार चाळीत रहात असावेत.

तसेच, मोहेनजोदडो येथे पश्चिमेस धान्याचे कोठार (५५ x ३७ मी) एका जोत्यावर, भाजीव विटांनी बांधलेले आहे. यावर बहुधा लाकडाचे बांधकाम असावे. यामध्ये, तीन रांगात, प्रत्येकी नऊ अशा प्रकारे २७ कोठ्या आहेत. प्रत्येक कोठ्यांच्या मधून १ मी. रुंद अशी हवा खेळती राहण्यासाठी मोकळी जागा आहे. या कोठाराच्या त्तरेस धान्य उतरवण्यासाठी एक उंचवटाही तयार केलेला आहे.

तसेच, लोथल येथे बालेकिल्ल्याच्या भागात, धक्क्याजवळच एक मालाचे कोठार आहे. याठिकाणी एका विटांच्या उंचवट्यावर (४ फूट उंच) चार रांगात, प्रत्येकी तीन अशा १२ आयताकृती मातींच्या विटांच्या कोठ्या आहेत (क्षेत्र: १७ x १४ मी.) तर हवा खेळती राहण्यासाठी प्रत्येक कोठ्यांच्यामध्ये मोकळी जागाही ठेवलेली आहे.

***राजमहाल:*** मोहेनजोदडो येथे, महास्नानगृहाजवळ राजमहालाची एक लांब (२३० x ७८ फूट) इमारत आहे. या इमारतीला तीन व्हरांडे असून, समोरच ३३ चौरस फुटाचे अंगण पसरलेले आहे. तर मुंडिगाक येथे एक खांबांची रांग असलेला मोठा महालही सापडलेला आहे. हे अवशेष राजमहालासारख्या इमारतीकडे निर्देश करतात.

***सभागृह:*** मोहेनजोदडो येथील सभागृह आठ मीटर लांबी रुंदीचे असून, हे चार रांगात, प्रत्येकी पाच अशा २० खांबांनी बांधलेले आहे. हे सभागृह एकूण ७५० चौ.मी. इतक्या जागेत बांधलेले आहे. असेच एक धोलावीरा येथे, बालेकिल्ल्याला जोडूनच 'खुले सभागृह' आढळते.

***कामगारांच्या चाळी:*** हडप्पा येथे बालेकिल्याच्या वायव्येस कामगारांच्या चाळी असून त्याभोवती छोटी तटबंदी आहे. या चाळी पूर्वपश्चिम अशा दोन रांगात वसलेल्या आहेत. यामध्ये प्रत्येक घरास (१७ x ७ मी) एक खोली व अंगणाची सोय केलेली आहे.

***पाण्याची सोय:*** सर्वसाधारणतः या संस्कृतीची बरीच शहरे ही नदीकाठी वसलेली आहेत. तसेच, या नगरांमध्ये घरटी विहिरीही आढळतात. या बांधीव विहिरी असून, रहाटाद्वारे पाणी उपसले जात असे.

कच्छच्या वाळवंटातील धोलावीरा या शहरामध्ये एक अभूतपूर्व अशी पाण्याची व्यवस्था दिसून येते. याठिकाणी पाण्याची सदैव चिंता होती; आणि आजही आहे. मात्र, येथील स्टेज ३ अ या टप्प्यातील हडप्पावासियांनी याठिकाणी एक अभिनव कल्पना वास्तवात आणली. धोलावीराच्या दक्षिण व उत्तर बाजूंनी

फक्त पावसातच वाहणारे नाले होते. त्यांनी या नाल्यांना बांध घालून यातील पाणी शहरात वळविले. तर, त्यांनी शहरातील तटबंदीला जोडून आतल्या बाजूस, चारी बाजूंनी, थोड्या थोड्या अंतराने तलाव बांधले. अशाप्रकारे त्यांनी नाल्याचे वळविलेले पाणी या **तलावांच्या मालिकेत** साठवून ठेवले व धोलावीरासमोरील पाण्याचा प्रश्न सोडविला.

**हडप्पाकालीन तलावांची मालिका, धोलावीरा**



थोडक्यात, या लोकांना एकंदर शिस्तप्रियता, नियमबध्दता व स्वच्छतेची आवड दिसते. प्रमाणबध्द वीटा, सरळ-रुंद रस्ते, उभ्या आडव्या छेदणाऱ्या रस्त्यांनी शहराची बुध्दिबळाच्या पटासारखी केलेली मांडणी, सुखवस्तू सधन घरे, विहिरी, सांडपाणी व्यवस्थित वाहून नेण्यासाठी बांधीव भुयारी गटारे व सामूहिक मोठे गटार, धान्यकोठारं, कामगारांच्या चाळी, सभागृह, राजमहाल, इ. वरुन हडप्पा संस्कृती ही त्या काळी किती समृध्द होती आणि तसेच, त्यांची नागरी जाणीव किती सजग होती हे दिसून येते.

अर्थात, एकंदर नगररचनेवरुन हडप्पा संस्कृतीतील ज्याप्रमाणे नगररचनेची नियोजनबध्दता दिसून येतेच त्याचप्रमाणे सामाजिक भेदाकडेही निर्देश करते. यामध्ये प्रमुख किंवा पुरोहित वर्गाचे धर्मिक, आर्थिक (धान्यपुरवठ्यावर) तसेच सामाजिक वर्चस्व दिसून येते.

ही शहरे पूर अथवा भूकंप अशा नैसर्गिक आपत्तीमुळे ऱ्हास पावली.

**क. व्यापार**

हडप्पा नगरातील धनाढ्य तसेच प्रभावशाली लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मुख्यत्वे दूरदेशी व्यापाराला प्रोत्साहन मिळालेले दिसते. येथील लिपीची समानता, व्यापारातील वस्तूंचे वैविध्य व दूरच्या प्रदेशांशी संबंध यावरुन हे निश्चित होते की हडप्पा संस्कृती ही व्यापारप्रधान होती. येथील महत्वाची शहरे हडप्पा संस्कृतीच्या इतर शहरांबरोबर, तसेच भारतातील दुसऱ्या संस्कृतींशी तसेच आशियातील संस्कृतींशी एका व्यवस्थित व्यापारी जाळ्याने/नेटवर्कने जोडली गेली होती. लोथल हे हडप्पा संस्कृतीचे अरबी समुद्राकडे उघडणारे एक महत्वाचे बंदर होते.

१. *अंतर्गत व्यापार* : हडप्पा संस्कृतीचा प्रचंड विस्तार आणि तो ही विविध स्वरुपाच्या भौगोलिक प्रदेशात झालेला होता. असे का असावे? याचे एक कारण कच्च्या मालाची गरज हे ही असू शकेल, जसे सोने (कर्नाटक), तांबे (खेत्री: राजस्थान), मौल्यवान दगडांमध्ये (मणी तयार करण्यासाठी) ॲमेथिस्ट (महाराष्ट्र), गोमेद/अगेट, चॅल्सिडोनी, अकिक (सौराष्ट्र), कार्नेलियन (कच्छ) इ. अर्थात, हा कच्चा माल मिळवण्यासाठी विविध स्वरुपाच्या प्रदेशात काही केंद्रे निर्माण झाली. तसेच, याठिकाणी पूर्वीपासूनच काम करत असणारी केंद्रे ही दळणवळणाच्या साधनांनी जोडली गेली. प्रचंड विस्ताराच्या प्रदेशात, एकाच स्वरुपाच्या अवशेषांची प्राप्ती होणे हे वरील बाबीला पुष्टी देते.

२. ***आंतरराष्ट्रीय व्यापार* :** हडप्पाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार करता मुख्यत्वे मेसोपोटेमिया (इराक-सिरिया येथील प्राचीन संस्कृती) आणि इराणशी होणारा व्यापार लक्षात घ्यावा लागतो. मेसोपोटेमिया मधील सूसा, ऊर, निप्पूर, किश, उम्मा, तेल अस्मार अशा ठिकाणी हडप्पा संस्कृतीची शिक्के, वजन-मापे, मातीच्या तसेच टेराकोटाच्या मूर्ती, अकिकाचे मणी, नक्षीदार हाडे सापडलेले आहेत. यातील काही शिक्क्यांवर एकशिंगी प्राणी तसेच हडप्पा लिपी मिळालेली आहे. तसेच, पर्शिया/इराण येथील फेलका, बहारीन इ. ठिकाणीही अशा प्रकारचे हडप्पा शिक्के मिळालेले आहेत.

तर, इकडे हडप्पा संस्कृतीच्या स्थळांमध्ये मात्र मेसोपोटेमियाच्या वस्तू कमी प्रमाणावर मिळालेल्या आहेत. कदाचित असे असावे की मेसोपोटेमिया संस्कृती ही कपडे, लोकर, वासाचे तेल, कातडी वस्तू इ. सारख्या नाशवंत मालामध्ये व्यापार करीत असल्याने या वस्तूंचे अवशेष टिकलेले नाहीत. मात्र हडप्पा संस्कृतीच्या स्थळांतील चांदीच्या वस्तू आणि काही लंबाकार शिक्के आणि तांब्याचा धातूपिंड  निश्चितच मेसोपोटेमियाकडे बोट दाखवितात.

आपल्याला असे दिसते की अक्कडचा सम्राट सारगॉनच्या (इसपू २३५०) राजधानीत दिलमून, मगान आणि मेलुहाच्या जहाजांनी पाडाव टाकलेला होता. यातील मेलुहा म्हणजे हडप्पा बंदरे होत. तसेच मेसोपोटेमियातील प्राचीन दस्तऐवज सांगतात की उर येथील व्यापारी मेलूहातून तांबे, गोमेद, हस्तीदंत, शिंपले, वैदूर्य, मोती आयात करीत होते. असे दिसते की, पूर्व हडप्पा काळापासूनच या दोन प्राचीन संस्कृतींमध्ये व्यापारी देवाणघेवाण चाललेली होती. हडप्पा संस्कृतीतील काही व्यापारी समुदाय त्याठिकाणी रहात असून, संवादासाठी एक दुभाषा ही नेमलेला दिसून येतो. यावरुनच दोहोंच्यातील धनिष्ठ व्यापारी संबंध आपल्या लक्षात येऊ शकतो.

***३. आयात व निर्यात:*** यातील आयात मालांचा विचार करता चांदी (अफगाणिस्तान, इराण), मौल्यवान दगडांमध्ये (मणी तयार करण्यासाठी) राजवर्द (बदक्शान, इशान्य अफगाणिस्थान), नीलमणी (मध्य आशिया, इराण), जेड (मध्य आशिया) याचा विचार होतो. तर निर्यातीमध्ये मेसोपोटेमियाशी होणाऱ्या व्यापारात तांबे, सोने, अकिक, हस्तीदंत, मोती, कापूस, मसाल्याचे पदार्थ, वेगवेगळ्या प्रकारचे लाकूड इ. बाबींचा समावेश होतो.

४. ***वजन–मापे:*** येथील वजनमापांमध्येही एक प्रकारची प्रमाणबध्दता दिसून येते. या वजनांची एक मालिका असून, प्रथम दुपटीत म्हणजे १, २, ४, ८, ६४ अशी व नंतर १६ च्या पटीतील दशमान पध्दतीची म्हणजे ३२०, ६४०, १६००, ३२००, ६४०० अशी होती. येथे लांबी '३७.६ सेमी चा एक फूट' अशा मोजपट्टीने मोजली जात होती. ही वजनं गारगोटी, जास्पर, स्टेटाईट तसेच चुनखडीपासून बनवलेली असत. वजन करण्यासाठी तांब्याचा तराजू वापरला जात असे. वजनमापांतील अशा प्रमाणबध्दतेतून हडप्पा संस्कृतीच्या व्यापारी प्रशासनाचा, विस्तृत प्रदेशांवरील नियंत्रणाचा यशस्वी प्रयत्न दिसून येतो.


५. ***वाहतुकीची साधने:*** हा व्यापार विविध अशा साधनांद्वारे केला जात असे. या वाहतूक साधनांत, अंतर्गत व्यापारासाठी बैलगाड्या, बैलांचे तांडे, ऊंट यांचा वापर केला जात असे. हडप्पा येथे कांस्याची एक गाडी मिळालेली आहे, तसेच इतर ठिकाणाहून गाडीची खेळणीही मिळालेली आहेत. तसेच, दूरवरील व्यापारासाठी पशुपालक जमातीच मुख्यत्वे बैलांचे तांडे घेऊन माल वाहतूकीची कामं करीत असत. तर सागरी व्यापाराचा विचार करता, मोहेनजोदडो आणि हडप्पाच्या शिक्क्यांवर जहाज, नावांच्या आकृत्या दिसतात. तर लोथलमध्ये एका जहाजाची मातीची प्रतिकृतीही मिळालेली आहे. अर्थातच, सागरी व्यापार याद्वारे केला जात असून, पश्चिम किनारपट्टीवर लोथल, बालाकोट सारखी बंदरे तर मकरान किनाऱ्यावर सुतकाजेन–डोर (पाकिस्तान आणि इराणच्या रस्त्यावर), सुत्काकोह अशा चौक्या दिसतात. यावरुनच हडप्पा संस्कृतीचा आंतरराष्ट्रीय व्यापार सुव्यवस्थित आणि विकसित होता हे दिसून येते.

६ . ***बंदर:*** लोथल येथील मानवनिर्मित बंदराची सोय विशेष लक्षणीय आहे.

लोथल (गुजरात) हे भोगाव नदीच्या काठी वसलेले असून याठिकाणी हडप्पा संस्कृतीचे महत्वाचे बंदर होते. ही भोगाव नदी साबरमती नादीची एक उपनदी असून, खंबायतच्या आखातातद्वारे अरबी समुद्राला जाऊन मिळते. येथील हडप्पाकालीन लोकांनी, या शहराच्या पश्चिमेस, एक बंदर (२१६ मी. –द ३६ मी. पू–प) बांधले. म्हणजे, भाजीव वीटांचा एक तलाव (४.३ मी. च १.२ मी रुंद) त्यांनी बांधला. पुढे, हे बंदर, त्यांनी कालव्याद्वारे (७ मी. रुंद) नदीला जोडले. अशा पध्दतीने या बंदरामध्ये पाण्याचा कायमचा पुरवठा राहिला. एक दुसरा चर खणून, अधिकचे पाणी पुन्हा नदीमध्येच सोडण्याची व्यवस्था केली. अशा पध्दतीने, येथील तलावातील पाणी एका पातळीवर आणि स्थिर राहील अशी व्यवस्था केली.

असे दिसते की व्यापारी जहाजे ही; अरबी समुद्र–खंबायतचे आखात–साबरमती अशा मार्गाने प्रवास करीत येत असत. पुढे ही जहाजे साबरमतीतून, भोगाव नदीत येत. मग, भोगाव नदीतून प्रवास करुन, भरतीच्या वेळी, कालव्यातून लोथलच्या बंदरामध्ये येऊन थांबत असत. पुढे, बंदराला जोडूनच एक धक्काही आहे. या धक्क्यावर हा माल उतरवला जात असे/जहाजांत चढवला जात असे. पुढे ओहोटीच्या वेळी ही जहाजे पुहा कालवा–भोगाव नदी–साबरमती–खंबायतचे आखात–अरबी समुद्र अशी जात असत.

**हडप्पाकालीन मानवनिर्मिती बंदर, लोथल**




**ड. धर्म**

मोहेनजोदडो येथील पुराव्यावरुन असे दिसते की, याठिकाणी धर्मगुरुंची एक प्रकारे सत्ता असावी. महास्नानगृहाजवळील प्रार्थनेची जागा या धर्मगुरुंचा स्थान व पूजाविधी दर्शवितात. त्याचप्रमाणे या स्नानगृहाजवळच असणाऱ्या धान्याच्या कोठारावरुन दिसून येते की या धर्मगुरुंचीच सत्ता या धान्याच्या कोठारावर म्हणजेच अर्थकारणावर असावी. असेच चित्र कालीबंगामध्येसुध्दा दिसून येते.

**१. पूजा/धार्मिक विधी स्थाने:** हडप्पा संस्कृतीमध्ये मंदिरांसारखी निश्चित अशी रचना दिसून येत नाही. तरी पूजास्थान अथवा काही धार्मिक विधीच्या जागा आपणास दाखवता येतात. जसे, मोहेनजोदडो येथील लोकवस्तीच्या भागामध्ये एक, मध्यवर्ती मंच असलेली मोठी इमारत मिळालेली आहे. हिला एक मोठे प्रवेशद्वार असून, मंचाकडे जाण्यासाठी दुहेरी पायऱ्याही आहेत. हे एक पूजास्थान असावे. येथील महास्नानगृहाजवळ पूजापाठासाठी खोल्या दिसून येतात. तसेच लोथल मध्येही बालेकिल्ल्यात एका उंचवट्यावर (४ मी. उंच) १२ स्नानगृहांच्या रांगा आहेत. कालीबंगात अग्नीवेदीजवळ, विहीर व अंघोळीसाठी उंचवटे केलेले होते. हे पुरावे धार्मिक विधीतील स्नानाचे महत्व दाखवितात.

याठिकाणी कालीबंगा येथील पुरावे विशेष महत्वाचे आहेत. येथील बालेकिल्ल्याचे उत्तर व दक्षिण असे पुन्हा दोन समान आकाराचे (१२० मी) भाग केलेले आहेत. यामधील दक्षिण भागात धार्मिक स्थळे आहेत. याठिकाणी मातीच्या विटांनी बांधलेले उंच जोते दिसून येतात. यातील एका जोत्यावर सात अग्नीवेदी बांधलेल्या आहेत. जवळच एक विहिर व अंघोळीसाठी उंचवटे केलेले आहेत. अर्थातच, स्नान व त्यानंतर पूजापाठ करण्याची ही जागा असावी. अशीच रचना दुसऱ्याही जोत्यावर आहे. बालेकिल्याच्या या दक्षिण भागास दोन दरवाजे (उत्तर व दक्षिणेस) असून, पायऱ्यांची सोय केलेली आहे. म्हणजेच, या

दरवाज्यातून दक्षिण भागात जायचे असेल तर पायउतार होऊनच जावे लागते. म्हणजेच या दक्षिण भागास एकप्रकारचे धार्मिक पावित्र्य व महत्व होते असे दिसते. तर, उत्तर भागात रस्त्याच्या दोही बाजूस घरांची रांग दिसून येते. यापलिकडे कोणतीही राजकीय स्वरुपाची इमारत दिसून येत नाही. म्हणजेच, कालींबगामध्येही एकप्रकारे पुरोहितांची सत्ता असावी. हे पुरोहित बालेकिल्ल्याच्या उत्तर भागात रहात असून, धार्मिक कार्य करण्यासाठी ते दक्षिण भागात येत असावेत. याठिकाणी इतरांना प्रवेश जरी असला तरी याठिकाणी त्यांना पायउतार होऊन नम्रपणेच जावे लागत असावे.

**२. दैवते:** हडप्पा संस्कृतीत सापडलेले विविध शिक्के तसेच मातीच्या आणि टेराकोटांच्या मूर्ती येथील देव-देवतांबद्दल लक्षणीय माहिती पुरवतात. याठिकाणी पुरुष, स्त्रिया, पशु-वनस्पती, संयुक्त/काल्पनिक अशा देवदेवतांचे पूजन होत असे. जसे, पशुपती. यामध्ये योगासनात बसलेली एक व्यक्ती दाखवलेली असून; ती, बकरी, हत्ती, सिंह आणि हरिणांनी घेरलेली आहे. हिच्या डोक्यावर शिंगांचा मुकुट असून, मार्शलच्या मते ही पशुपती (पुढील शिव) ची मूर्ती असावी. याचबरोबर, टेराकोटाच्या मातृदेवतांच्या मूर्तीही मिळालेल्या आहेत. यांच्या डोक्यावर पंख्याचे शिरोभूषण आहे. काही मातृदेवतांच्या मूर्ती बाळांबरोबरही दिसतात.

अशा पुरुष आणि मातृदेवतांबरोबरच, काही वृक्षदेवताही दिसू येतात. विशेषत: पिंपळाचे महत्व अगदी पूर्वहडप्पा काळापासून (ते आजपर्यंतही!) दिसून येते. काही शिक्क्यांवर सभोवती पार असलेला पिंपळ दाखविलेला आहे. तसेच, एका ठिकाणी एका देवतेच्या डोक्यावरील शिंगामधून एक झाड उगवताना दिसते. दुसऱ्या एका शिक्क्यावर एक लांबसडक केस असलेली देवता पिंपळाच्या फांद्यामधून वर येताना दिसते. तिच्यासमोर एक भक्त साष्टांग नमस्कार घालत आहे व सोबत सात आकृत्या आहेत.

याचबरोबर प्राण्यांचेही पूजन केले जात होते. विशेषत: वशिंडयुक्त बैल विशेष श्रध्देय दिसतो. काही संयुक्त/पौराणिक/काल्पनिक प्राणीही पूजले जात असावेत, जसे, नर-सिंह, एकशिंगी/युनिकॉर्न इ. तसेच, मेसोपोटेमिया पौराणिक कथांतील दोन सिंहांशी लढणारा शूर गिलगामेश सारखा देव ही पूजला जात असावा. वरील दैवतांसह, अग्नीदेवता (वेदी), सूर्यदेवतेचेही (स्वस्तिक/चक्र अशी चिहे) पूजन असण्याची शक्यता वर्तविली जाते.

***३. अंत्यसंस्कार पध्दती:*** अंत्यसंस्काराला धार्मिक जीवनात एक महत्वाचे स्थान असते. यातून, त्या संस्कृतीच्या मरणोत्तर जीवनावरील विश्वास आणि, त्याबाबतच्या कल्पना दिसून येतात. हडप्पा संस्कृतीमध्ये अंत्यसंस्काराच्या विविध पध्दती दिसून आलेल्या आहेत, जसे, पूर्ण दफन, अंशत: दफन, दहनोत्तर दफन इ. येथे प्रेताला उत्तर-दक्षिण दिशेत ठेवले जात असत. तसेच, मृतदेहाचे दफन करताना त्याबरोबर शिंपल्यांच्या बांगड्या, हार, कर्णभूषण, तांब्यांचे आरसे, कज्जलशलाका, मातीचे लाडू, चमचे, मणी, हस्तीदंती वस्तू सोबत ठेवली जात. काही दफनं व्यवस्थित विटांनीही बनवलेली दिसून येतात. तसेच, लोथल मध्ये प्रेतांची जोडीही दिसू येते. यावरुन मरणोत्तर जीवनाबद्दल त्यांच्या काही कल्पना असाव्यात असेही दिसते.


हे लक्षात घेतले पाहिजे की यांची स्मशानभूमी ही शहरांपासून स्वतंत्र असे.

हडप्पा संस्कृतीतील एकंदर धार्मिक परिस्थितीचा विचार करता, विविध क्षेत्रांमध्ये विविध प्रकारचे विधी प्रचलित होते असे आढळते. जसे, कालीबंगा-लोथल मध्ये अग्नीवेदी दिसतात, मात्र इतरत्र कुठे नाही. तर, या दोघांबरोबर, मोहेनजोदडो येथे स्नानाचे पूजाविधीसाठी महत्व दिसते, हडप्पा मध्ये नाही. अंत्यसंस्कारामध्ये ही एक प्रेत, जोडी प्रेत, पूर्ण/अंशतः/दहनोत्तर इ. वैविध्य दिसून येते. अर्थातच, हडप्पा संस्कृतीचा प्रचंड विस्तार आणि तत्कालिन मर्यादित दळणवळण/संपर्क व्यवस्थेमुळे हे स्वाभाविकच होते. त्याचबरोबर यातून हडप्पा संस्कृतीच्या समाजजीवनचे वैविध्यपूर्ण स्वरुप आणि तरीही सांस्कृतिक ऐक्य आपल्याला बरेच काही शिकवू पाहते!

**इ. शिक्के**

हडप्पा संस्कृतीमध्ये व्यापारी मालाची हमी देण्यासाठी शिक्क्यांचा वापर केला जात होता. येथे शिक्क्यांबरोबरच (Seal) शिक्क्यांचे ठसेही (Sealing) मिळालेले आहेत. हडप्पा संस्कृतीतून जवळजवळ २००० पेक्षा अधिक शिक्के मिळालेले आहेत. हे साधारणतः चौकोनी असून, स्टेटाईटपासून बनवलेले असत. हे शिक्के १ ते ५ सेमी पर्यंत  आकाराचे असून, साधारणतः त्यांच्या एका बाजूवर चित्र तर दुसऱ्या बाजूस अक्षरे दिसतात. यातील काही शिक्क्यांवर केवळ लिपी तर काहींवर माणूस, प्राणी, अर्ध-मानव, वनस्पती इ. आकृत्या दिसून येतात. तसेच, यांवर भौमितिक आकृत्याही दिसून येतात.

**हडप्पाकालीन वृषभ आणि लिपीचे शिक्क्यांवरील अंकन**




प्राण्यांच्या आकृतींचा विचार करता यामध्ये भारतीय हत्ती, रेडा, गेंडा, वाघ आणि मुख्यत्वे वशिंडयुक्त बैल दिसून येतात. त्याचप्रमाणे काही संयुक्त पशु ही दिसून येतात. एका आकृतीत तर एक माणूस दाखविलेला असून, चेहरा हत्तीचा, डोक्यावर बैलाचे शिंग असून, पुढील शरीर मेंढ्याचे असून मागील वाघाचे आहे. तर काही शिक्क्यांवर पशुपती आणि मातृदेवता ही दिसून येतात. कदाचित असे शिक्के धार्मिक

उपयोगासाठी वापरले जात असावेत. या शिक्के त्याकाळची कलेतील प्रगती सांगतातच शिवाय त्याकाळातील लोकांचे लेखनकलेचे ज्ञान, कलेतील प्रमाणबद्धता, सभोवतालचा निसर्ग (प्राणी-पक्षी-झाडे), त्यांच्या धार्मिक कल्पना/श्रध्दा, प्रगत व्यापारही दाखवितात.

अर्थात, अजूनही हडप्पा संस्कृतीची लिपी आपल्याला वाचता आली नाही याचीही नोंद घ्यावी.

**ड. हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास आणि उत्तर हडप्पा**

अशा या वैभवशाली संस्कृतीचा ऱ्हास कसा झाला असावा? याबाबत विद्वानांमध्ये मतभेद होते. पुराव्यांचे चुकीचे वाचन झाल्याने, त्याबाबत काही गैरसमजही प्रचलीत झाले होते. जसे, नंतर आलेल्या वैदिक आर्यांनी, हडप्पा संस्कृतीतील लोकांची कत्तल केली, नगरं उध्वस्त केली अशी एक चुकीची समजूतही करुन दिली गेली होती. पण पुढे, पुराव्यांचे व्यवस्थित वाचन केल्यानंतर, तसेच, विविध वैज्ञानिक पध्दतींचा उपयोग करुन या संस्कृतीचा ऱ्हास कसा झाला असावा? हे शास्त्रज्ञांनी सिध्द करुन दाखवलेले आहे.

याठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की हडप्पा संस्कृतीचा उदय ही जशी एका रात्रीत घडलेली घटना नव्हती तसाच तिचा ऱ्हासही एकाच दिवशी घडलेला नाही. तर ही ऱ्हासाची प्रक्रिया बरीच वर्षी चाललेली होती. दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्या एकाच कारणाने, एवढ्या मोठ्या प्रदेशावर पसरलेली ही संस्कृती नष्ट झाली नाही. तर विविध ठिकाणच्या ऱ्हासासाठी, वेगवेगळी कारणे आहेत. जसे, धोलावीरा भुकंपामुळे, मोहेनजोदडो पूरामूळे, नदीचे पात्र बदलल्याने तिच्या काठावरील काही शहरे ओसाड झाली असे आपल्याला आढळते.

अर्थात, सगळ्यात महत्वाचे कारण म्हणजे पर्यावरणातील प्रतिकूल बदल. यावेळी पर्यावरण हे अगदी कोरडे झाले, पर्जन्यमान कमी झाले. त्याचा फटका समृध्द शेतीला बसला. आणि पुढे, शेतीवर आधारलेल्या कारागीर-व्यापाऱ्यांना बसला. या सगळ्याचा परिणाम म्हणजे शहरांचे अर्थकारण ढासळले. ती निर्मनुष्य झाली. अर्थात, हे काही एका दिवसात घडले नाही.

थोडक्यात, हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास ही एक प्रक्रिया होती आणि ती अनेक वर्षं चालली. **प्रतिकूल निसर्ग हे हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाचे कारण आहे.**

याच कालखंडास 'उत्तर हडप्पा' काळ असे म्हणतात. या काळात प्रतिकूल निसर्गामुळे एकंदर शहरी व्यवस्थेचा ऱ्हास झाला. एकंदर नियोजनबध्दता नष्ट झाली. कुडांची घरं असलेली, अस्त्यावस्त्य वसलेली अशी छोटी गावं तयार झाली. शहरांचे ही प्रमाण कमी झाले. १७४ विकसित हडप्पा नगरांतील निव्वळ ५० भर उरली. याउलट निमभटक्या लोकांच्या वसाहती वाढू लागल्या. हे लोक कुरणांच्या शोधात भटकू लागले.

**ड. महाशिलायुगीन भटके**

ज्या काळातील मानवी संस्कृतीमध्ये, मोठ्या दगडांचा खुणेसाठी वापर करुन, मृतांचे दफन करण्याची पध्दती होती अशा संस्कृतीला 'महाशिलायुगीन संस्कृती' असे म्हणतात. या संस्कृतीची दफनं आपल्याला

मोठ्या प्रमाणावर मिळतात, मात्र वसाहतीचे पुरावे खूप मोजक्या स्वरुपाचे आणि अप्रत्यक्ष स्वरुपाचे आहेत. त्यामुळे या संस्कृतीची मुख्य माहिती ही आपणाला त्यांच्या दफनांवरुनच मिळते. अशी ही संस्कृती साधारणत: इसवी सन पूर्व १००० मध्ये दख्खनच्या पठावरावर दिसू लागते. यावेळी पूर्वीच्या ताम्रपाषाणाची जागा आता लोहहत्यारे घेतात. दक्षिण भारतामध्येही या संस्कृतीचे पुरावे आपणास मिळतात. साधारणत: इसवी सन पूर्व ३०० च्या दरम्यान ही संस्कृती अस्पष्ट होत जाऊन, या भागात सातवाहनांचे राज्य निर्माण होते. मात्र, पुढे अनेक वर्षे, अगदी आजपर्यंतही या संस्कृतीच्या खूणा आपल्याला काही आदिवासी समाजात दिसून येतात. त्याचबरोबर युरोप आणि आशियाई देशांमध्येही या संस्कृतीशी साधर्म्य असणाऱ्या संस्कृती आपल्याला दिसून येतात.

लोहतंत्रज्ञान, घोडा, दफनांच्या खुणेसाठी दगडांचा वापर आणि लाल-काळी मडकी ही या संस्कृतीची ठळक लक्षणं आहेत.


१८२३ मध्ये बॅबिंग्टन यांनी दक्षिण भारतातील मलबार भागामध्ये महाशिलायुगीन दफनांचा सर्वप्रथम शोध लावला. आत्तापर्यंत भारतामध्ये २००० महाश्मयुगीन स्थळं सापडलेली असून, फक्त ४० ठिकाणी त्यांच्या वसाहतींचे पुरावे सापडलेले आहेत. तर महाराष्ट्रातील विदर्भात जी शेकडो दफनं मिळतात, त्यामध्ये फक्त चार ठिकाणी वसाहतींचे पुरावे आपल्याला मिळतात.

महाशिलायुगीन मानवाची संस्कृती ही दफनांवरुन ओळखत जरी जात असली तरी या संस्कृतीमध्ये दफनांचे विविध प्रकार आपल्याला दिसून येतात. जसे, शिलावर्तुळं (Cairn Circles), पेटी-दफन असलेली शिळावर्तुळं (Cist & Cairn Circles), डॉलमेन/चेंबर दफनं (Dolmen/Chamber Stone), मेनहिर (Menhir), टोपी-शिला (Topi Kal), मडक्यांतील दफन (Urn Burials), सार्कोफॅगस (Sarcophagus), गुहा (Cave Burials) इ. यातील शिलावर्तुळं मुख्यत्वे विदर्भात सापडतात. उर्वरीत प्रकार कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामीळानाडू, केरळ इ. प्रदेशामध्ये सापडतात.

शिलावर्तुळांमध्ये, एका खड्डयात मृताचे दफन केले जात असे. मृतांसोबत, त्याच्या पुढील प्रवासाच्या सोबतीसाठी, अन्न, पाणी, घोडा, घोड्याचे अलंकार इ. ठेवले जात. त्याचप्रकारे, तो वापरत असणारी साधने आणि हत्यारेही ठेवली जात. त्यानंतर, माती लोटून हे दफन पूर्ण केले जाई. त्यानंतर, खुणेसाठी, या दफनाभोवती, मोठेमोठे दगड वर्तुळाकार मांडले जात. या वर्तुळांतील जागा खडींनी भरलेली असे. याला शिलावर्तुळ असे म्हंटले जाते. अशी शिलावर्तुळं मोठ्या प्रमाणावर विदर्भात सापडलेली आहेत. यातील काही दफनांमध्ये, एकापेक्षा दोन व्यक्तींचेही दफन केलेले दिसते. यातील काही शिलावर्तुळांचे उत्खननही अभ्यासकांनी केलेले आहे, जसे, टाकळघाट-खापा, माहुरझरी, भागीमोरी, नैकुंड, रायपूर, पाचखेडी इ. अशा शिलावर्तुळाप्रमाणेच, विदर्भात रायपूर येथे 'शिलावर्तुळ' आणि 'पेटी-दफन' हे एकाच ठिकाणी सापडते. तसेच दफनामध्ये एक खोलीही दिसून येते. तर पाचखेडी येथे एका ठिकाणी शिळावर्तुळाऐवजी एक उंच दगड म्हणजेच 'मेनहिर' हा प्रकार दिसून येतो.

**शिलावर्तुळ, पेटी–दफन असलेले शिलावर्तुळ, डॉलमेन**









काही शिलावर्तुळांमध्ये, एका खड्ड्यामध्ये पातळ दगडांची एक पेटी केली जाते आणि जमिनीवर शिलावर्तुळ निर्माण केले जाते. याला 'पेटी–दफन असलेले शिलावर्तुळ' असे म्हणता येईल. बऱ्याच ठिकाणी पेटीच्या एका भिंतीवर एक मोठा पोकळ गोल ही दिसून येतो. तर काही ठिकाणी या पेटीपर्यंत जाण्यासाठी, जमिनीवरुन एक छोटी वाटही काढलेली असते. काही ठिकाणी या पेटीला जोडून दुसरी पेटी असते किंवा एका मोठ्या पेटीचे दोन भाग केलेले असतात. आंध्र प्रदेशामध्ये अशी दफनं पूर्णपणे जमिनीखाली दिसून येतात. तर कर्नाटकमध्ये, ब्रह्मगिरी याठिकाणी, याचा अर्धा भाग जमिनीवर आहे. तर बेंगलोरजवळील सुवणदुर्ग याठिकाणी, ते पूर्णपणे जमिनीवर उभे आहेत.

डॉलमेन दफनप्रकारामध्ये, चार भिंतीची एक मोठ्या दगडांची खोली केलेली असते. तिच्यावर एका दगडाचे छत असते. ही एकतर पूर्णपणे जमिनीवर असते किंवा हिचा अर्धा भाग जमिनीवर व उरलेला जमिनीच्या आत असतो. दक्षिण कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामीळनाडूच्या भागामध्ये अशी दफनं दिसून येतात. दक्षिण कर्नाटकातील गुंटुर जिल्ह्यात अशा प्रकारची दफनं मोठ्या प्रमाणावर सापडतात. यालाच चेंबर/खोली–दफन असे म्हणता येईल. उत्तर कर्नाटकामध्येही यांचे मोठे प्रमाण दिसून येते.

**मेनहीर, टोपी–शिला, मडक्यातील दफन**







काश्मीर भागामध्ये ही प्रथा असून, आजही पूर्व भारतामध्ये ही प्रथा आढळून येते. छोटा नागपूर आणि पूर्व भारतामध्येही ही प्रथा होती. टोपी–शिलामध्ये, दफनावर, तीन/चार मोठ्या शिला उभ्या–तिरक्या ठेवून त्यावर टोपीसारखा एक दगड आडवा ठेवलेला असतो. केरळमध्ये अशा स्वरुपाची दफनं सापडतात. मडक्यातील दफनं ही तामीळनाडूच्या प्रदेशात सापडतात. यामध्ये, जमिनीमध्ये भांड्यांचे दफन ठेवून, त्यावर खडीचा ढीग पसरलेला असतो.

सार्कोफेगस/रांजण दफनामध्ये एक भाजीव मातीचे उभे रांजण तयार करुन, त्यामध्ये दफन केले जाते. किंवा प्रतिकात्मक (म्हणजे प्रेतरहित) असे रांजण उभे केले असते. या रांजणाला मातीचे पायही केलेले असतात. आंध्र प्रदेशामध्ये ही दफनं सापडतात. येथील चित्तूर आणि कडप्पाच्या भागामध्ये, जमिनीमध्ये एक पेटी तयार करुन, त्यामध्ये असे रांजण ठेवलेले दिसतात. कर्नाटकातील जदिगेनहेल्ली येथे ही दफनं दिसतात. तर, तामीळनाडूमध्ये असे सार्कोफॅगस जमिनीमध्ये ठेवून, त्याभोवती दफावस्तू ठेवल्या जात. त्यावर माती लोटून, खुणेसाठी शिलावर्तुळ निर्माण केलेले दिसते.

**रांजण दफन (सार्कोफॅगस)**



तर, केरळमध्ये, दगडामध्ये एक **अंडाकृती गुहा** करुन त्याठिकाणी दफन केलेले दिसते. यांचा दरवाजा आयताकृती असतो. कधीकधी गुहेत एक खांब उभा केलेला असतो तर कधी छतावर एक मोठे छिद्र कोरलेले असते. तर आत गुहेत दगडी बाकं तयार करुन त्यावर दफनसाहित्य ठेवलेले असते.

महाशिलायुगीन लोकांच्या दफनांच्या तुलनेने, यांच्या वसाहतींचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. विदर्भातील टाकळघाट, नैकुंड, भागीमरी आणि रायपूर मध्ये अशा वसाहती दिसून येतात. या वसाहती हंगामी स्वरुपाच्या असाव्यात असे संशोधकांचे म्हणणे आहे. हे लोक आयताकार, चतुष्कोणी तशाच गोलाकार झोपड्यांमध्ये रहात. चुन्याने सारवलेली जमिन, कुडाच्या भिंती आणि गवताने शाकारलेले छत ही परंपरा कायम राहिलेली दिसून येते. गोलाकार झोपड्यांचे छत मात्र शंक्वाकृती असे. चूल आणि धाय साठविण्यासाठी मातीच्या कणग्या ही या घरांतील महत्वाच्या गोष्टी. ही निवासव्यवस्था, मागील ताम्रपाषाणयुगाचीच नियमितता दाखवते.

काही ठिकाणी महाशिलायुगीन दफनाजवळ शैलचित्रेही दिसून येतात. या शैलचित्रांवरून या महाशिलायुगीन मानवाच्या जीवनावर प्रकाश पडतो, जसे, हिरेबंकल येथील शैलचित्रे. अशा चित्रांमधून शिकार करण्याची पध्दती, समूहनृत्यासारखे धार्मिक विधी दिसून येतात.

महाशिलायुगीन लोकांचे जीवन हे निमभटके असल्याने; शेतीपेक्षा, शिकार, पशुपालन हे यांचे उपजीविकेचे प्रमुख मार्ग दिसून येतात. यांच्या आहारामध्ये कंदमुळे, फळे, वनस्पतींचे प्रमाण जास्त असल्याने, त्यांच्या दाढा मोठ्या दिसून येतात.

तसेच, हे उत्तम कारागीरही होते असे आपल्याला दिसून येते. विशेषत: लोहतंत्रज्ञानामध्ये हे पुढारलेले असे होते. विदर्भातील नैकुंड या ठिकाणी अशी लोखंडाची भट्टीही मिळालेली आहे. ही जमिनीच्या आत १.२५ मीटर खोलीवर होती. ही चार सेमी जाडीच्या विटांनी बांधलेली असून, ३० सेमी व्यासाची होती. आत हवा मारण्यासाठी दोन मातीचे नळ होते. तसेच, लोखंड तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये, गाळ

काढण्यासाठी तळाशी तोंडही ठेवलेले होते. असे दिसते की, यांच्या हत्यारामध्ये लोखंडाचे प्रमाण अतिशय शुध्द (९९%) असे आहे. हे लोक लोखंडाची विविध साधने, अवजारे आणि हत्यारे तयार करीत असत. या साधनांमध्ये प्रचंड प्रमाणावर वैविध्य आहे. जसे, तलवार, खंजीर, भाले, बाण, छिन्नी, कुऱ्हाडी, नांगर, विळे, तिपाई, थाळी, हस्तभूषण, कढई, नेलकटर, खिळे, दिवे, घोड्याची रिकीब इ.

तसेच, यांनी तांब्याची आभूषणं आणि विविध वस्तू बनवलेल्या दिसून येतात. जसे, कर्णभूषणं, बांगड्या, घंटा, आरसा इ. घोडा हा प्रिय प्राणी असल्याने हे तांब्याचे घोड्याचे अलंकारही, विशेषत: तोंडावरील पत्रा, बनवत असत.

लोह आणि तांब्याच्या तंत्राप्रमाणेच; हे लोक चांदी आणि सोन्यामध्येही आभूषणं बनवताना दिसून येतात. चांदीमध्ये बुंदके तर सोन्यामध्ये अंगठ्या, बांगड्या, कर्णभूषण, हस्तभूषण, पदके, पट्टे, वेढण्या बनविल्या जात. दागिन्यांसाठी सोन्यामध्ये चांदी मिसळली जात असे.

लोहतंत्रज्ञानाप्रमाणेच, कुंभारकामही गरजेचे होते. हे लोक 'लाल-काळी' अशा दुहेरी रंगातील भांडी वापरीत. यामध्ये वाडगे, वाट्या, कुंडे, थाळ्या यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे हे लाल मडकीसुध्दा वापरत. या लाल मडक्यांमध्ये अभ्रकाचे अंश असल्याने, ही चकाकताना दिसतात. एकतर हे लोक स्वत: अशी भांडी बनवत किंवा, ढवळीकर म्हणतात त्याप्रमाणे लोहअवजारांच्या मोबदल्यात, गावकऱ्यांकडून भांडी घेत. 'मणीकारी' हा उपजीविकेचा आणखीन एक पर्याय. हे लोक विविध प्रकारच्या मौल्यवान दगडांपासून मणी बावताना आपल्याला दिसतात, जसे, गारेच्या दगडांपासून, अकिक, पोवळे, वैदूर्य/इंद्रनील, शंख अशापासून. यातील अकिकाचे मणी हे पांढरी नक्षी असलेले असे आहेत.

हे मुख्यत्वे फिरस्ते असल्याने, यांचा इतर संस्कृतींशी सहसंबंध असणे स्वाभाविकच होते. अशा संस्कृतीसह हे लोक विविध वस्तूमध्ये विमियही करीत. जसे, वैदूर्य, शंख इ. मण्यांचा कच्चा माल, तसेच, सोने,चांदी हे विनिमयातूनच यांच्या संस्कृतीत आलेले दिसतात. यातील शंखाचा वापर ते मण्यांबरोबरच, बांगड्या बनविण्यासाठीही करीत असत.

महाशिलायुगीन लोक कोण होते याबद्दल संशोधकामध्ये मतभेद आहेत. युरोपियन दफनांशी साधर्म्य असल्याने हे भूमध्यसागराकडून भारतामध्ये आले असावेत असे समजले जात होते. पण अलिकडच्या अभ्यासावरुन असे दिसून आलेले आहे की हे लोक भारतीयच होते. एकमात्र निश्चित की यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक वैविध्य होते. याचे कारण त्यांच्या भटकण्याच्या भौगोलिक वैविध्यामध्ये दडलेले आहे.

या काळातील वसाहतींचे पुरावे अत्यल्प मिळाल्याने, हे एका जागी रहात होते का? यांचे उपजीविकेचे मार्ग कोणते होते? असे विविध प्रश्न संशोधकामध्ये आजही दिसून येतात. साधारणत: असे समजले जाते की हे भटके पशुपालक होते. पण पुन्हा प्रश्न निर्माण होतात की, हे जर भटके असतील तर जे वसाहतींचे पुरावे मिळालेले आहेत, त्या वसाहतींचे उपयोजन काय होते? तसेच, हे जर पशुपालक होते तर यांच्या दफनांमध्ये शेतीची अवजारं कशी सापडतात? अशा प्रश्नांची उत्तरं ही अधिकाधिक संशोधनानंतरच मिळणार

हे उघड आहे. तूर्त तरी, ढवळीकरांसारखे विद्वान असे म्हणतात की, महाशिलायुगीन लोक हे भटके पशुपालक होते. तसेच यांचे लोहारकामाचे ज्ञान उच्च दर्जाचे होते. हे लोक, आपल्या भटकंतीच्या दरम्यान, गावाजवळ तात्पुरती वसाहत करत. त्या गावांची जशी गरज असेल त्याप्रमाणे ते लोकांना लोखंडाची साधने, अवजारे तयार करुन देत. त्यानंतर पुढे जात. असे वारंवार घडल्याने, या लोकांचे प्रवासाचे मार्ग आणि थांबे निश्चित होत असत. अशा मार्गातच आणि थांब्यावरच त्यांची दफने असत. तसेच दफनातील वेगवेगळे प्रकार, या काळातील विविध टोळ्यांचे वितरण, विचरण आणि सहाचर्य दर्शवितात. अशा या महाशिलायुगीन काळाच्या शेवटीशेवटी आपल्याला सातवाहनांचे राज्य पुढे येताना दिसून येते.

**प्रश्न**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. .........ही पूर्वपुराश्मयुगीन मानवाची हत्यारे होत.

अ. हातकुऱ्हाडी व तोडहत्यारे — ब. सूक्ष्मास्त्रे

क. पात्यांची हत्यारे — ड. गुळगुळीत हत्यारे

२. ............या काळात मानव गुहांमध्ये चित्रे काढू लागला.

अ. पुराश्मयुग — ब. मध्याश्मयुग — क. नवाश्मयुग — ड. ताम्रपाषाणयुग

३. ............ही मध्याश्मयुगीन मानवाची हत्यारे होत.

अ. हातकुऱ्हाडी — ब. सूक्ष्मास्त्रे — क. पात्यांची हत्यारे — ड. गुळगुळीत हत्यारे

४. मध्य प्रदेशातील...........याठिकाणी गुहाचित्रे सापडलेली आहेत.

अ. बूर्झाहोम — ब. भीमबेटका — क. बागोर — ड. धोलावीरा

५. १८६३ मध्ये...............यांनी मध्याश्मयुगीन गुहाचित्रांचा शोध लावला.

अ. मार्शल — ब. कार्लाईल — क. बॅबिंग्टन — ड. प्रिन्सेप

६. 'निओलिथिक' हा शब्दप्रयोग..............यांनी सर्वप्रथम वापरला.

अ. मार्शल — ब. कार्लाईल — क. बॅबिंग्टन — ड. लुबॉक

७. 'राखेचे ढिगारे'हे...........या काळाचे ठळक लक्षण आहे.

अ. पुराश्मयुग — ब. मध्याश्मयुग — क. नवाश्मयुग — ड. ताम्रपाषाणयुग

८. ............हे एक प्रसिध्द नवाश्मयुगीन ठिकाण होय.

अ. बूर्झाहोम — ब. नेवासे — क. बागोर — ड. धोलावीरा

९. .........ही महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती होय.

अ. आहाड ब. कायथा क. रंगपूर ड. जोर्वे

१०. ...........हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे ताम्रपाषाणयुगीन स्थळ होय.

अ. इनामगाव ब. कोल्हापूर क. नागपूर ड. रत्नागिरी

११. ............हे महाराष्ट्रातील हडप्पा संस्कृतीचे स्थळ होय.

अ. दायमाबाद ब. नेवासा क. पैठण ड. कऱ्हाड

१२. हडप्पा संस्कृतीतील महास्नानगृह.............याठिकाणी सापडलेले आहे.

अ. मोहेनजोदडो ब. लोथल क. कालीबंगा ड. धोलावीरा

१३. .............याठिकाणी हडप्पा संस्कृतीतील बंदर सापडलेले आहे.

अ. मोहेनजोदडो ब. लोथल क. कालीबंगा ड. धोलावीरा

१४. हडप्पा संस्कृतीमध्ये सोन्याची आवक............येथून होत असे.

अ. महाराष्ट्र ब. राजस्थान क. कर्नाटक ड. केरळ

१५. महाराष्ट्रातून...............ची आवक हडप्पा संस्कृतीमध्ये होत असे.

अ. ॲमेथिस्ट ब. तांबे क. अगेट ड. चॅल्सिडोनी

१६. ................यांनी महाशिलायुगीन दफनांचा सर्वप्रथम शोध लावला.

अ. मार्शल ब. कार्लाईल क. बॅबिंग्टन ड. प्रिन्सेप

१७. महाराष्ट्रामध्ये, प्रामुख्याने................भागात महाशिलायुगीन दफने सापडतात.

अ. कोकण ब. पश्चिम महाराष्ट्र क. खानदेश ड. विदर्भ

१८. महाशिलायुगीन लोखंडाची भट्टी.............या ठिकाणी सापडलेली आहे.

अ. नैकुंड ब. रायपूर क. पाचखेडी ड. भागीमोरी

१९. 'मेनहिर' स्वरुपाची दफने ही प्रामुख्याने................येथे सापडतात.

अ. तामीळनाडू ब. केरळ क. काश्मीर ड. आंध्र प्रदेश

२०. महाशिलायुगीन शैलचित्रे............याठिकाणी आढळलेली आहेत.

अ. माहूरझरी ब. हिरेबंकल क. भीमबेटका ड. नैकुंड

टीपा द्या.

१. अश्मयुगीन हत्यारे २. मध्याश्मयुगीन गुहाचित्रे

३. हडप्पाकालीन धर्म, ४. हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास

५. महाशिलायुगीन दफनांचे प्रकार

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. अश्मयुगीन जीवनाची माहिती द्या.

२. नवाश्मयुगीन मानवी जीवनाची माहिती द्या.

३. महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगाची माहिती द्या.

४. हडप्पा संस्कृतीच्या नगररचनेची माहिती द्या.

५. महाशिलायुगीन संस्कृतीची माहिती द्या.

भीमबेटका गुहाः https://youtu.be/zrcTFQ8lufU

*हा क्युआर कोड स्कॅन केल्यानंतर, या प्रकरणाबद्दलचे मूळ छायाचित्रे, नकाशे, ग्रंथ, लेख वगैरे अभ्यासता येतील.*

❑❑❑

## घटक २

# वैदिक युग आणि महाकाव्ये

**अ. वैदिक साहित्य, ब. पूर्व ते उत्तर वैदिक काळातील बदलः राज्यसंस्था आणि आर्थिक परिस्थिती, क. पूर्व ते उत्तर वैदिक काळातील बदलः समाज आणि धर्म, ड. महाकाव्येः रामायण आणि महाभारत**

**प्रस्तावना**

मागील घटकात, आपण, प्रागैतिहासिक भारताचा म्हणजेच आद्य भारतीय मानवाचा अभ्यास केला. साध्या भटक्या जीवनापासून, शहरे निर्माण करणाऱ्या भारतीयांचा विकास पाहून आपण थक्क झालो! पुढे या संस्कृतीच्या ऱ्हासानंतर किंवा त्या दरम्यान आपल्याला भारताच्या वायव्य भागात म्हणजे सप्तसिंधूच्या प्रदेशामध्ये एका नव्या संस्कृतीचा परिचय होऊ लागतो. ही वैदिक संस्कृती. वैदिक संस्कृतीचा कालखंड हा साधारण हजार वर्षांचा आहे. मात्र, या वर्षामध्ये या संस्कृतीमध्ये बदल होत गेले. हे बदल आपल्याला दोन ठळक टप्प्यामध्ये दिसून येतात. या घटकात या वैदिक संस्कृतीचा; तिच्या बदलांसह अभ्यास करायचा आहे. या काळात वैदिकांनी उच्च दर्जाचे साहित्य निर्माण केले. या साहित्याच्या अनुषंगाने आपल्याला या संस्कृतीचा परिचय होतो. त्यामुळे हे वैदिक साहित्यही पाहणे आवश्यक ठरते. तसेच, या काळाच्या उत्तरार्धात महाभारत आणि रामायण ही दोन महाकाव्ये निर्माण झाली. या अभिजात साहित्याने आजपर्यंत साऱ्या जगावर मोहिनी घातलेली आहे. या महाकाव्याच्या मूळ कथा आपल्याला माहिती आहेतच. याठिकाणी आपल्याला त्यांची काही वैशिष्ट्ये पहावयाची आहेत.

भारतातील ताम्रपाषाणयुगाच्या ऱ्हासानंतर, सप्तसिंधुच्या प्रदेशात एक वेगळ्या अशा संस्कृतीचे उल्लेख सापडण्यास प्रारंभ होतो. ही संस्कृती पशुपालक असून, भटकी होती. हे संस्कृत भाषा बोलत असत. तसेच होमहवनाद्वारे, निसर्गपूजेवर विश्वास ठेवणारी असे होते. यांनी आपल्या निसर्गपूजेसाठी, संस्कृतमधील विविध श्लोकांची/प्रार्थनांची निर्मिती केलेली होती. अशा रचनांना वेद असे म्हंटले जाते. हे वेद ज्या भाषेत निर्माण झाले–म्हणजे संस्कृत भाषा; अशी संस्कृत भाषा बोलणाऱ्या भाषासमूहास आर्य म्हणतात. हे आर्य म्हणजे काही विशिष्ठ रंगांचे किंवा जातीचे–रक्ताचे असे नव्हते. तर हे वैदिक आर्य म्हणजे संस्कृत बोलणारा एक पशुपालक भटका समूह होय. तर हे वेद ज्या संस्कृतीत निर्माण झाले त्या संस्कृतीस वैदिक संस्कृती असे म्हंटले जाते. या संस्कृतीची निश्चितपणे माहिती देणारी भौतिक साधने उपलब्ध नाहीत. तरी यांच्या वैदिक साहित्यातून मात्र या संस्कृतीच्या विविध अंगांची माहिती मिळते. ही संस्कृती सर्वसाधारणपणे इ.स.पू. १५०० च्या दरम्यान उदयास आली असे म्हणता येईल.

याठिकाणी या संस्कृतीच्या कालखंडाचा, म्हणजे उदय (इ.स.पू. १५००) ते पूर्वऐतिहासिक काळापर्यंतचा (इ.स.पू. ६ वे शतक) विचार करावयाचा आहे.

हे वैदिक आर्य कोठून आले? त्यांचा वंश कोणता? असे विविध वादग्रस्त प्रश्न आर्यांशी निगडित आहे. काहींच्या मते हे आर्य परकीय (हंगेरी: गाईल्स–मॅक्डोनाल्ड; जर्मनी:, दक्षिण रशिया: घोष; इराण:


मॅक्समूलर; उत्तर ध्रुव: टिळक; तिबेट: पार्जिटर इ.) होते. तर काहींच्या मते हे आर्य हे स्थानिकच असून, हडप्पा संस्कृतीतूनच यांचा उदय झालेला दिसून येतो (बी.बी.लाल, एस.पी.गुप्ता वगैरे). अर्थात, दोन्हीही पक्षांचा मुद्दा *निव्वळ तर्कांवर* आधारीत आहे असे लक्षात येते. तसेच काही एक राजकीय भूमिकेतूनही हे मुद्दे मांडले जातात.

मात्र अलीकडे एक नवा विचारप्रवाह उदयास येतो आहे. हा विचारप्रवाह शास्त्रीय संशोधनावर आधारीत आहे. पुरातत्वशास्त्र, डीएनए शोधणारे जेनेटिक शास्त्र, शारीरिक मानवशास्त्र अशी विविध शास्त्रे आणि त्यांचे शास्त्रज्ञ या संशोधनामध्ये व्यग्र आहेत. डॉ. वसंतर शिंदे यांनी हरयाणामध्ये सखोल अभ्यास केलेला आहे. त्यांनी येथील राखीगढी, फरमाणा या महत्वाच्या स्थळांचे उत्खनन केलेले आहे. त्यांच्या मतानुसार हडप्पा संस्कृतीचेच लोक हे वैदिक आर्यच होते. सरस्वती नदीचे खोरे हा या संस्कृतीचा केंद्रबिंदू होता. पुढे, वेगवेगळ्या निमित्ताने हे हडप्पा/वैदिक आर्य कालांतराने आशिया, युरोपमध्ये पसरले गेले.

तसेच हे ही लक्षात घेतले पाहिजे की, त्या काळी देश, स्वदेश, परदेश या शब्दांनाच फारसा अर्थ नव्हता. सारे विश्वच मानवी कर्तृत्वाला खुले होते. आपल्या उपजीविकेसाठी हा मानव सर्वत्र भटकत असायचा.

तूर्त, सद्या; वैदिक आर्य हे परकीयच असून, वेगवेगळ्या टप्प्यात यांचे भारतात येणे झाले असे समजले जाते. त्याचबरोबर मुख्यत्वे हा एकच एक असा वंश नसून, *संस्कृत बोलणारा एक भाषासमूह* होता असे मत सर्वसाधारणपणे ग्राह्य धरले जाते. जसजसे अधिक संशोधक होत जाईल तसा या प्रश्नावर प्रकाश पडत जाईल.

**सप्तसिंधूचा प्रदेश**



## अ) वैदिक साहित्य

वैदिक आर्य निसर्गपूजक असून, होमहवनाद्वारे हे लोक इश्वरांची प्रार्थना करीत असत. अशा त्यांच्या श्रध्दांतूनच, त्यांनी, संस्कृतमधून व्यापक अशा साहित्याची निर्मिती केली. हे साहित्य विविध ज्ञानी ऋषींनी निर्माण केलेले होते. यांचा वैदिक साहित्यातील शब्दांवर, त्यांच्या उच्चाराच्या तंत्रावर हुकुमत होती. तसेच, ते शब्द जसेच्या-तसेच उच्चारले जावे यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे, त्या काळातील वैदिक साहित्य आजही जसेच्या तसे आहे! याचे कारण म्हणजे गुरु-शिष्य परंपरेतून त्यांनी हे साहित्य, शब्द आणि उच्चाराकडे बारीक लक्ष देऊन, मौखिक परंपरेने शतकानुशतके जतन केलेले आहे.

वैदिक साहित्यामध्ये महत्वाचे आहेत ते म्हणजे प्रमुख चार वेद. पुढे याचबरोबर, या वेदांचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या, चिंतन करणाऱ्या, कायदा-नियम सांगणाऱ्या अशा विविध रचनांचा समावेश होतो. या साहित्यातून वैदिक संस्कृतीची आपणास माहिती मिळते.

पूर्व वैदिक काळातील समाज हा सप्तसिंधुप्रदेशात वास्तव्य करुन होता. या काळात, त्यांचा इतर संस्कृतींशी फारसा संबंध येत नसे. मात्र पुढे, उत्तर वैदिक काळात त्यांचा गंगेच्या वरील टप्प्यामध्ये विस्तार झाला. यावेळी त्यांचा विविध समाज-संस्कृत्यांशी संबंध आला. यामुळे, त्यांच्या मूळच्या जीवनशैलीत-संस्कृतीत बदल होत गेला. हे त्यांच्या साहित्यातून दिसून येते. त्यामूळेच त्यांच्या या विविध टप्प्यातील निर्माण झालेल्या वैदिक साहित्याचा जर विचार केला तर आपल्याला या वैदिक संस्कृतीचे दोन उपभाग पाडता येतात; पूर्व वैदिक व उत्तर वैदिक.

अशा या वैदिक संस्कृतीचा विचार करण्यापूर्वी, तिची ज्यातून माहिती मिळते अशा वैदिक साहित्याची/साधनांची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. वैदिक काळातील साहित्यात चार वेद, वेद स्पष्ट करणारी ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदांसारखी परिशिष्टं, आणि व्याकरणादि व तत्वज्ञानांचे विवेचन करणाऱ्या वेदांगे व षडदर्शनांचा समावेश होतो.

### पूर्व वैदिक काळातील साहित्य

या काळामध्ये फक्त ऋग्वेदाची निर्मिती झाली. त्यातही २ ते ९ मंडलं या काळात रचली गेली.

आर्यांची ही सर्वात प्राचीन रचना असून, याची एकूण १० मंडलं (प्रकरणं) आहेत. यामध्ये, १०२८ सुक्त (अध्याय) व त्यात १०५५२ ऋचा (श्लोक/प्रार्थना) आहेत. हे प्रत्येक मंडल एकेका ऋषीपरंपरेला वाहिलेले आहे, जसे, वसिष्ठ, विश्वामित्र, भारद्वाज इ. यात मुख्यत्वे ईश्वराचे स्तवन करणाऱ्या प्रार्थना आहेत. पुढील वेदांचा हा महत्वाचा आधार आहे.

### उत्तर वैदिक काळातील साहित्य

### अ) वेद

**अ) ऋग्वेदातील उर्वरित मंडलं**: या काळात ऋग्वेदाची १ ले आणि १० वे मंडल तयार झाले आणि ऋग्वेदाची रचना पूर्ण झाली. यातील दहाव्या मंडलातील 'पुरुषसुक्त' हे महत्वाचे आहे. कारण वैदिक

वर्णव्यवस्थेचा सर्वप्रथम उल्लेख या पुरुषसुक्तात सापडतो. ही वर्णव्यवस्था पुढे वैदिक समाजाचे महत्वाचे लक्षण बनले.

**ब) यजुर्वेद:** ऋग्वेदातील ऋचा या होमहवन करताना म्हंटल्या जायच्या. हे होमहवन करण्याच्या पध्दतीबद्दल यामध्ये ऋचा आहेत. त्यामूळे, अर्थातच यामध्ये मुख्यत्वे ऋग्वेदातीलच ऋचा पुन्हा दिलेल्या आहेत. याचे दोन भाग आहेत (१) शुक्ल यजुर्वेद (२) कृष्ण यजुर्वेद

**क) सामवेद:** ऋग्वेदातील ऋचा म्हणावयाच्या पध्दतीबद्दल यात ऋचा आहेत. त्यामूळे अर्थातच यामध्ये ऋग्वेदातीलच ऋचा पुन्हा दिलेल्या असून (१६०३ पैकी १५०४ मूळ ऋग्वेदातीलच) त्या फक्त रागात/चालीत दिलेल्या आहेत. याचे एकूण दोन भाग आहेत; (१) आर्चिक-४८५ रागांचा संग्रह (२) उत्तरार्चिक-४०० गाण्यांचा संग्रह.

**ड) अथर्ववेद:** हा शेवटचा वेद. हा २० भागात असून यामध्ये ७३१ ऋचा आहेत. यामध्ये, जादूटोणा, भूतपिशाच, श्रध्दा, अंधश्रध्दा यांचा समावेश होतो.

असे हे वेद, वैदिक धर्मासाठी; आणि त्यातून विकसित झालेल्या हिंदू धर्मासाठी अत्यंत पवित्र असे ग्रंथ आहेत. हे अपौरुषेय आहेत असे मानले जाते. तसेच, यामध्ये कोणताही बदल करण्यावर निर्बंध आहेत. त्यामुळे, गुरुशिष्य परंपरेतून, हे ग्रंथ-व त्यातील रचना आजही जसेच्या तसे टिकून राहिलेले आहेत.

***नासदिय सुक्त: मानवाचा पहिला संदेह***

*ऋग्वेद हा वैदिक संस्कृतीतील पहिला ग्रंथ; पहिला वेद. यातील १० वे मंडल इसपू १२०० ते ८०० च्या दरम्यान रचले गेले. यामध्ये 'नासदिय सुक्त' येते. संदेह, जिज्ञासा ही शोधाची, परिक्षणाची सुरुवात असते. जवळजवळ तीन हजार वर्षापूर्वी, या भटक्या पशुपालक मानवाच्या शंका इथे येतात. भारतीय अध्यात्माचा प्रारंभ असेही याला म्हणता येईल.*

*''सृष्टीच्या मूलारंभी असत् आणि सत्, तसेच अंतरिक्ष आणि आकांश यापैकी काहीच अस्तित्वात नव्हते अशा स्थितीत कोणी कोणाला आवरण घातले? कोणाच्या सुखासाठी हे सारे आले? अगाध जल तरी त्या काली अस्तित्वात होते काय? (१)*

*त्याकाळी मृत्यु (मृत्युग्रस्त नाशिवंत सृष्टी) नसल्याने 'अमृत' हि (अविनाशी पदार्थ) अस्तित्वात नव्हते. अहोरात्र नव्हते. अहोरात्रिविभेदक काही साधनही नव्हते. तत्कालिन अबोध सृष्टी स्वबलाने वायूशिवायच श्वासोच्छ्वास करीत स्फुरत होती. त्याखेरीज अथवा त्यापलिकडे अन्य काहीच नव्हते. (२)*

*समस्त जल तमोव्याप्त आणि भेदाभेदाविरहित असून तपमहिम्याने प्रकट झालेले सर्वव्यापी ब्रह्म (आभु) फोल मायेने (तुच्छ) आच्छादिले होते. (३)*

*'सत्'चा हा पसारा (विसर्ग) कशापासून आणि कोठून उत्पन्न झाला, हे यापेक्षा अधिक विस्ताराने (प्र) कोण सांगू शकेल? 'सत्' सृष्टीच्या विसर्गानंतर उत्पन्न झालेल्या देवांनाहि हे ज्ञात नाही. मग सृष्टी कोठून निघाली? हे कोण जाणणार? (६)*

*'सत्' चा हा पसारा (विसर्ग) जेथून निर्मिला गेला, ते स्थान आकाशनिवासी जगताध्यक्षास (हिरण्यगर्भ) कदाचित ज्ञान असेल, अथवा नसेलहि.'' (नासदिय सुक्त, ऋग्वेद, १० वे मंडल, १२९ वे सूक्त, ऋचा १ ते ७)*

*(संदर्भः सिध्देश्वरशास्त्री चित्राव. ऋग्वेदाचे मराठी भाषांतर. भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे. १९९६. पृष्ठे ७०८-७०९ : प्रथम आवृत्ती १९२८ )*

**ब) वेदांच्या परिशिष्ठ रचना: ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे**

वेद निर्माण झाले. मात्र कालांतराने, वेद, त्यातील शब्द, त्यांचे अर्थ, त्यातील विचार हा स्पष्ट करुन सांगणे आवश्यक बनत गेले. त्यासाठी, हे ग्रंथ तयार झाले. वेदातील ज्ञान स्पष्ट करणे हाच उद्देश या ग्रंथांचा आहे.

या मुख्यत्वे गद्य रचना आहेत. यातील ब्राह्मण ग्रंथ वेदांतील यज्ञविधी स्पष्ट करतात; त्यांचे नियम सांगतात. उपनिषदे हे गुरुंकडून वेद समजून घेण्यावर, त्यांच्याशी अध्यात्मिक चर्चेवर भर देतात. तर आरण्यके ही चिंतनावर भर देतात.

'वेदांतील ज्ञान स्पष्ट करणे' हा उद्देश असल्याने, प्रत्येक वेदांची-तो, तो वेद स्पष्ट करणारी वेगवेगळी ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे आहेत.

जसे, ऋग्वेदाची ऐतरेय, कौशितकी ही ब्राह्मणे; ऐतरेय, कौशितकी ही आरण्यके; तर ऐतरिय, कौशितकी ही उपनिषदे आहेत. तर यजुर्वेदाची तैतरीय व शतपथ ब्राह्मणे; तैतरिय, बृहत् ही आरण्यके; व तैतरिय, बृहत, काठक अशी उपनिषदे आहेत. तसेच, सामवेदाची ताण्ड्य, जैमिनिय अशी ब्राह्मणे तर छांदोग्य व जैमिनिय ही उपनिषदे आहेत. अथर्ववेदाची मुण्डक, प्रश्न ही उपनिषदे आहेत.

यातील उपनिषदे म्हणजे भारतीय तत्वज्ञानाचा एक महत्वाचा ठेवाच आहे. अगदी जुनी उपनिषदे ही गद्यामध्ये होती. यामध्ये बृहदारण्यक, छांदोग्य इ. महत्वाची आणि सर्वात जुनी होती. पुढे, ही पद्यात्मक झाली. यामध्ये भारतीय अध्यात्म येते. म्हणजे, आत्मा म्हणजे काय? परमात्मा/ब्रह्म म्हणजे काय? या दोघांचे स्वरुप काय? या दोघांचा संबंध काय? अशा विचारांची चर्चा यात येते. याला जोडूनच कर्मसिध्दांत, माया, ज्ञान/योग/भक्ती अशा विविध मार्गांची चर्चा येते. प्रत्येक सजीवात आत्मा असतो. हा आत्मा, सर्वव्यापी परमात्म्याचा भाग असतो. मृत्युनंतर, हा आत्मा पुन्हा परमात्म्याकडे निघून जातो. याला मुक्ती किंवा मोक्ष असे म्हणलेले आहे. त्यामुळे, प्रत्येक आत्म्याला, मोक्षाची इच्छा असते. मात्र जीवनातील कर्तव्ये न पार पाडल्याने त्याला मुक्ती मिळत नाही. तो पुन्हा दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो. या चक्राला 'कर्मसिध्दांत' असे म्हणलेले आहे. तर, परमेश्वराची कृपा संपादन करावी किंवा मुक्ती मिळावी यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जातो. यामध्ये ज्ञान, योग, भक्ती असे मार्ग येतात. या काळातील या उपनिषदांचा प्रभाव पुढे भारतीय अध्यात्मावर पडलेला दिसतो. फक्त वैदिकच नव्हे तर बौध्द, जैन, आजीवक इत्यादी इतर विचारधारांच्या चर्चाही या अध्यात्माच्या अनुषंगाने येत राहते.

**क) व्याकरण-तत्वज्ञानादी रचना: सहा वेदांगे व षड्दर्शने**

पुन्हा या ग्रंथांचाही 'वेदांना स्पष्ट करुन सांगणे' हाच उद्देश आहे. इथे मुख्यत्वे वेदातील व्याकरण, त्यांतील तत्वज्ञान स्पष्ट करणे आहे. यामध्ये सहा वेदांगे येतात. तशीच सहा दर्शने-षडदर्शने येतात.

यामधील वेदांगामध्ये, शिक्षा (वैदिक मंत्रांचे उच्चारण स्पष्ट करण्यासाठी शिकवण), कल्प (वैदिक यज्ञातील नियमांचे विवेचन), व्याकरण (वैदिक भाषांचे व्याकरण), निरुक्त (वैदिक ऋचामधील शब्दांची व्युत्पत्ती), छंद (वैदिक ऋचा तालात म्हणावयाची पध्दती) व ज्योतिष (वैदिक यज्ञासाठी शकुन सांगणारे) यांचा समावेश होतो. हे सर्व वेदांचे एक प्रकारे उपग्रंथच असल्याने; तसेच वेदातीलच ज्ञान उलगडवून दाखणारे असल्याने, यांना 'वेदांगे' म्हंटलेले आहे.

त्याचप्रमाणे वेदांतील कर्मकांड, अध्यात्म, चिंतन, तत्वज्ञान उलगडून सांगणारे सहा ग्रंथ निर्माण झाले. यांना 'षडदर्शने' असे म्हणले जाते. यामध्ये, न्याय (कर्ता-गौतम ऋषी: अनुमान-उपमान स्पष्ट करणारे तत्वज्ञान), सांख्य (कर्ता-कपिल: निरिश्वरवाद, जीवशिव ऐक्य इ.), योग (कर्ता-पातंजली: योगविद्या), वैशेषिक (कर्ता-कणाद: अणूविषयक), पूर्वमिमांसा (कर्ता-जैमिनी: वैदिक कर्मकांड) व उत्तरमिमांसा (कर्ता-बादरायण: विश्वरचना, अध्यात्म इ.) यांचा समावेश होतो.

अशा प्रकारे, या वैदिक साहित्यातून आपल्याला वैदिक संस्कृतीची माहिती मिळते. तिच्या दोन टप्प्यातून, वैदिक संस्कृतीच्या अंगांमध्ये कोणकोणते बदल झाले? हे ही आपल्याला लक्षात येते. यापुढे आपण, वैदिक संस्कृतीच्या विविध अंगांचा विचार करणार आहोत. आणि यातील बदल समजून घेण्यासाठी, प्रत्येक अंग हे पूर्व वैदिक काळात कसे होते? आणि उत्तर वैदिक काळात त्यामध्ये कोणते बदल झाले? हे लक्षात घेणार आहोत.

## ब) पूर्व ते उत्तर वैदिक काळातील बदल: राज्यसंस्था आणि आर्थिक परिस्थिती

### राज्यसंस्था

पूर्व वैदिक काळात लढाईच्या गरजांतून लढवय्या लोकांची व राजाची आवश्यकता निर्माण झालेली होती. या काळात प्रजेने राजा *निवडायला* सुरुवात केली. या काळात समाजात स्पष्ट असे विभाजन नव्हते. तरीही लढवय्ये लोकांची, वैवाहिक संबंधाद्वारे, एक वेगळी भावकी विकसित होत गेलेली होती. या भावकीना 'राजन्य' असे म्हणत. ही लढवय्यांची भावकी; प्रजेसाठी, या राजाची शिफारस अशी करीत असे.

राजा निवडला जरी गेला तरी त्याला कर घेण्याचा/न्यायदान करण्याचा अधिकार घेण्यासाठी धर्माची म्हणजेच पुरोहितांची गरज लागत असे. त्यामूळेच, राजा व लढवय्या वर्ग/त्याची भावकी (राजन्यः पुढे क्षत्रिय) तर पुरोहित (ब्राह्मण) या वर्गांचे महत्व वाढत गेलेले दिसून येते. या व्यवस्थेत राजाचे स्थान हे सर्वोच्च असून, तो आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्याने व इतर अधिकाऱ्यांच्यामार्फत राज्यकारभार करत असे.

अर्थात या राजावर बरीच नियंत्रणं असत. याच्यावर त्याच्या भावकीचा दबाव असे कारण त्यांच्यातूनच त्याला शिफारस मिळत असे. तसेच, पुरोहिताचेही नियंत्रण असे कारण तो, राजाला धर्माची मान्यता मिळवून देत असे. तसेच, त्या काळातील वैदिक सभा-समितीचे ही त्याला ऐकावे लागे. कारण हीच मुख्य प्रजा असून, तेच राजाला मान्यता देत असत. तसेच मंत्रींनाही तो मान देत असे कारण त्याला राज्यकारभारासाठी हे मंत्री सल्ला देत असत. थोडक्यात, पूर्ववैदिक काळातील राजपद हे एक नियंत्रित राजपद असे.

यावेळी करव्यवस्था सक्तीची नव्हती आणि नियमितही नव्हती. तर कर हा नजराण्याच्या स्वरुपाचा आणि ऐच्छिक असे. त्याचप्रमाणे पायदळ, घोडदळ व रथदळ अशा स्वरुपाचे सैन्य जरी असले तरी ते कायमस्वरुपी नसे. तसेच सैन्याचे व्यवस्थीकरणही झालेले नव्हते. या काळात प्रशासनासाठी सर्वसाधारणत: राष्ट्र/जनपद (राजा हा प्रमुख)-विश (विशपती)-ग्राम (ग्रामिणी) अशी रचना असे. 'विश' म्हणजे सर्व प्रजा असल्याने, हे नजराणे देत असत. तर ग्राम हे विविध कुलांनी बनलेले असून कुलप्रमुखास 'कुलपती' असे म्हंटले जात होते. यांतील न्यायदानावर रुढी-परंपरेचाच प्रभाव दिसून येतो.

अशी वैदिक राज्यं/जनपद, त्यांच्या जमातीवरुन ओळखली जात असत. या काळात विविध अशा ३० वैदिक टोळ्या दिसून येतात. यामधील यदू, तुर्वशू, पुरु, अनू, द्रह्यू या टोळ्यांना 'पांचजन्य' असे म्हणले जात असे. या टोळ्यांमध्ये संघर्ष होत असे. हा संघर्ष प्रामुख्याने गाईंना पळविण्यावरुन तसेच त्यांच्या संरक्षणासाठी होत असे. या काळातील एका मोठ्या युध्दाची माहिती आपल्याला मिळते. याला 'दाशराज्ञयुध्द' असे म्हणलेले आहे. ऋग्वेदाच्या सातव्या मंडलामध्ये या युध्दाचा उल्लेख येतो. हे युध्द परुष्णी (रावी) नदीच्या तीरावर लढले गेले. हे युध्द, भरत टोळी आणि १० टोळ्यांचे संयुक्त सैन्य यामध्ये लढले गेले. सुदास हा भरत टोळीचा राजा होता. हे युध्द सुदासने-म्हणजे भरत टोळीने जिंकले. या विजयामुळे, भरत टोळीचा विस्तार वाढला. पुढे, आपल्या देशाला 'भारत' हे जे नाव मिळाले, ते याच विजयी भरत टोळीमुळे.

यावेळी युध्दांमध्ये रथांचा वापर होताना दिसतो. घोडे किंवा बैल यांचा वापर रथासाठी केला जात असे. सनौली येथील उत्खननावरुन लक्षात येते की या रथांच्या चाकांना तांब्याचे चिलखत असे. तसेच, त्यावेळचे योध्दे कातड्याचे चिलखत आणि तांब्याचे शिरस्त्राण वापरायचे. शस्त्रास्त्रांमध्ये धनुष्यबाण आणि तांब्याची तलवार यांचा वापर व्हायचा. चमड्याच्या ढाली दिसून येतात. विशेष म्हणजे या काळात स्त्रियाही युध्दात मोठ्या प्रमाणावर सहभागी होताना दिसतात.

**सनौली उत्खनन**

सनौली हे उत्तर प्रदेशातील बागपत जिल्ह्यातील एक साधं गाव. मात्र पुरातत्वशास्त्रज्ञांच्या संशोधनाने या गावचा समृध्द इतिहास उजेडात आला. भारतीय पुरातत्व खात्याच्या डॉ. एस. के. मंजूल यांनी अलिकडेच या स्थळाचे उत्खनन केले (२०१८). जे अवशेष प्राप्त झाले त्यांचे अत्याधुनिक शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण केले गेले. याठिकाणी हे जे पुरातत्वीय अवशेष मिळाले त्याने भारताच्या प्राचीन इतिहासात एक अभूतपूर्व क्रांती घडवून आणलेली आहे.

याठिकाणी बरीच दफनं मिळाली. साधारणतः त्या काळातील दफनांमध्ये प्रेताबरोबर विविध वस्तू ठेवल्या जात असत. त्यांना 'दफनवस्तू' असे म्हणता येईल. मनुष्य मृत जरी झाला तरी त्याचा आत्मा जिवंत असतो. त्या आत्म्याच्या पुढील प्रवासासाठी तशी तरतूद केली जायची. मरणोत्तर जीवनाबद्दल तशी एक जगभर श्रध्दा होती.

सनौली येथे ज्या दफनवस्तू मिळाल्या त्यांनी भारतासह सारं जग आश्चर्यचकित झाले. याठिकाणी चार शवपेटिका सापडल्या. या साऱ्या अलंकृत होत्या. या पेटीमध्ये प्रेतांचे दफन केले जात असे. येथे पूर्ण स्वरुपात घोड्यांचे रथ मिळाले. या रथांच्या चाकांना तांब्याचे चिलखतही चढवलेले होते. त्याचप्रमाणे तांब्याची शिरस्त्राणे मिळालेली आहेत. तलवारी, युध्दकुऱ्हाडी मिळालेल्या आहेत. तसेच कातड्यांची चिलखंतही मिळालेली आहेत. विशेष म्हणजे याठिकाणी स्त्रीयांची शस्त्रे, चिलखते, दफनं मिळालेली आहेत. म्हणजे पुरुषांबरोबरच, याठिकाणी स्त्रीयोध्दाही होत्या; त्यांना समाजात मान होता असे दिसते.

संशोधकांनी या अवशेषांचा काळ हा साधारण इसपू १९०० असा शोधलेला आहे. म्हणजे हडप्पा संस्कृतीच्या काळातच, सनौली येथे ही वसाहत होती हे स्पष्ट होते. कॉपर होर्ड किंवा ओसिपी संस्कृती म्हणून जी एक संस्कृती उत्तर प्रदेशामध्ये नांदत होती; तीच ही संस्कृती होती असे प्रथमदर्शनी आढळते. तसेच, या संस्कृतीचे आणि वैदिक संस्कृतीचे साम्यसुध्दा याठिकाणी लक्षात घेतले गेलेले आहे.

थोडक्यात, ज्या काळात वायव्य भारतात हडप्पा संस्कृती नांदत होती त्याचकाळात उत्तर भारतामध्ये ही संस्कृती विकसित होताना दिसते. विशेषतः सनौलीची ही वसाहत ही वैदिक संस्कृतीची होती असे दिसते. आणि ही दफने वैदिक लढवय्यांची होती हे स्पष्ट दिसते आहे.

**उत्खननातून सापडलेला रथ सनौली**



पुढे, उत्तर वैदिक काळातील लढायांचे व इतर व्यापाचे प्रमाण वाढले. विस्तार वाढला. त्यामुळे राजाची अधिकच गरज वाढली. त्यामूळे राजाचे महत्व वाढले. यातून राजपद हे वंशपरंपरागत झाले. तसेच, राजा अश्वमेधासारखे मोठ्या प्रमाणावर यज्ञयागादि धार्मिक विधी करु लागला. त्यावेळी प्रचंड दक्षिणा- मोठ्या प्रमाणावर बळी, समूहभोजन देऊ लागला. अशा प्रकारे, राजाने, पुरोहितांकडून राज्य करण्याचा कायदेशीर आणि वंशपरंपरागत अधिकारच प्राप्त करुन घेतले. त्यामूळेच त्याला कर घेण्याचा, न्यायदान करुन हिंसक शिक्षा देण्याचा सर्वोच्च अधिकार प्राप्त झाला. त्यामूळे राजा व त्याची भावकी (राजन्य/क्षत्रिय वर्ण) ही समाजातील सर्वोच्च सत्ता बनली. तर, या राजाला कायदेशीरपणा प्राप्त करुन देणारा पुरोहित वर्ग (ब्राह्मण वर्ण) सुध्दा सर्वोच्च बनला.

ही सत्ता टिकविण्याच्या हेतूने अशी वर्णव्यवस्था वंशपरंपरागत केली जाऊन जन्मावर आधारीत बनली. यामूळेच, नियमितपणे कर भरणे हे वैश्य वर्णाचे तर नियमिपणे सेवा-मजूरी करणे हे शूद्र वर्णाचे जन्माधिष्ठित कर्तव्यच बनले. अशा बंदिस्त वर्णव्यवस्थेला आधार देण्यासाठीच पुनर्जन्माचे सिध्दांत मांडले जाऊ लागले.

असा राजा 'राजसूय', 'वाजपेय' अशा प्रकारचे यज्ञ करु लागला. या यज्ञामध्ये, विधीद्वारे त्याच्यामध्ये ईश्वरतत्वाची प्रतिष्ठापना होऊ लागली. तो ईश्वरासारखा समजला जाऊ लागला. तसेच, सर्वांचे समर्थन मिळवण्यासाठी हा राजा 'रत्नहविंषी' हा विधी करु लागला. हा विधी राजसूय यज्ञाचाच एक भाग होता. या प्रसंगी राजा, विविध दिवशी, महत्वाच्या व्यक्ती/व्यावसायीकांच्या घरी भेट द्यायचा. तेथे जाऊन, तो, त्या-त्या घरातील देवांची पूजा करायचा. या लोकांना 'रत्न' म्हणले जात असे. यामध्ये पुढील लोकांचा समावेश असे-ब्राह्मण/पुरोहित, राजन्य (त्याची भावकी), महिषी (पट्टराणी), सेनानी (सैन्यप्रमुख), सूत (सारथी), ग्रामणी (गावाचा प्रमुख), संग्राहित्री (कोषाध्यक्ष), भागदूत (कर गोळा करणारा), अक्षवाप (द्यूत/जुगार चा प्रमुख), तक्षण (सुतार), रथकर, स्थपती (न्यायाधीश) इ.

अर्थात यामूळे राजपद हे वंशपरंपरागत आणि अनियंत्रित बनले. त्याला निवडण्याचा प्रजेचा अधिकार संपुष्टात आला. राजावर नियंत्रण ठेवणाऱ्या विविध घटकांचे (मंत्री, सभा-समिती इ.) महत्व नाहीसे होऊन या संस्था मोडकळीस आल्या. पुढेपुढे तर राजाने, आपल्या भावकीचेही ऐकणे सोडून दिले. अशा राज्यव्यवस्थेतूनच, प्रत्येक बाबीचे आता व्यवस्थीकरण घडून आले, जसे मंत्री-अधिकाऱ्यांची कर्तव्ये निश्चित करण्यात आली, न्यायदानासाठी धर्मावर आधारीत रीतसर कायदे करण्यात आले, सैन्य व्यवस्थित करण्यात येऊन त्यामध्ये श्रेणीपध्दती आली तसेच युध्दाचे नियमही तयार झाले.

राजाला 'विशमत्त' असे म्हणले जाऊ लागले. विश म्हणजे सर्व प्रजा. तर, प्रजा जे काही तयार करीत या प्रत्येकावर राजाचा हक्क निर्माण झाला. म्हणजेच, या काळात, करपध्दती सक्तीची झाली; ती व्यवस्थित करण्यात आली.

या काळातही वैदिक राज्यं/जनपद ही त्यांच्या जमातीच्या नावावरुन ओळखली जायची, जसे, तुर्वसू, यदू, पुरु, भरत इ. मात्र, या काळात ज्याप्रमाणे विविध टोळ्यांत/जनपदांमध्ये संघर्ष व्हायचा; त्याचप्रमाणे काही जनपदे एकत्रही येताना दिसतात. जसे पुरु आणि भरत ही जनपदे एकत्र येऊन, त्यांनी 'कुरु' हा संघ स्थापन केला. तर तुर्वसू आणि क्रिवी एकत्र येऊन 'पांचाल' स्थापन झाले. पुढे, विविध मोठ्या मोहिमांसाठी कुरु आणि पांचाल हे एकत्र ही येऊ लागले.

**आर्थिक परिस्थिती**

पूर्व वैदिक काळातील वैदिक आर्य समाज हा मुख्यत्वे पशुपालक होता. गुरे-ढोरे पाळणाऱ्या या भटक्या समाजामध्ये 'गुरे' हीच संपत्ती होती. त्यामुळे अर्थातच गाईला प्रचंड महत्व होते. म्हणूनच, या काळातील विविध संस्कार तसेच विविध महत्वाच्या गोष्टींची नावं 'गाय' या मूळ शब्दापासून पडलेली आहेत. जसे, विवाह 'गोरज' मुहुर्तावर संपन्न होत, कुटुंबं 'गोत्रा'वरुन ओळखली जात. अर्थातच गुरे

पळविण्यावरुनच वैदिक काळातील युध्दे होत. म्हणूनच या काळातील युध्दांनाही 'गविष्टी' असे म्हणले जात असे. 'गाईंचा शोध' ही एक महत्वाची गरज आणि मोहिम असल्याने, अशा शोधास 'गवेषणा' असे म्हणलेले आहे. मुलीला 'दुहित्री' असे म्हणलेले आहे. अशा या गुरांना चरण्यासाठी सामूहिक राखीव कुरणे असत.

याशिवाय शिकार, मासेमारी ही उपजीविकेची पारंपारिक साधने अजूनही वापरात होतीच. हे लोक प्रामुख्याने पशुपालक जरी असले तरी त्यांना शेतीचेही प्राथमिक ज्ञान होते. कारण, गुरांच्या कुरणाशिवाय काही जमिन लागवडीखाली आणल्याचेही उल्लेख मिळतात. ही जमिन कुटुंबांच्या मालकीची असे. यांना जमिन ओलिताखाली आणण्याचे, खते वापरण्याचे व विळ्याने कापणी करण्याचे ज्ञान होते. यामध्ये गहू, बार्ली हीच मुख्य पीक असून पुढे तांदळाची लागवड करण्यास सुरुवात झाली. अर्थात ही शेती पूर्णपणे निर्वाह-स्वरुपाची होती.

याबरोबरच, या संस्कृतीत कारागीरी ही दिसून येते. अर्थात, या काळात व्यवसायाचा जातींशी संबंध नसे. कोणत्याही व्यवसायात, कोणत्याही जातीची मक्तेदारी नव्हती. या समाजातील कारागीरी ही सुतारकाम, कुंभारकाम, लोहारकाम, वीणकाम, शिवणकाम इ. लघुद्योगासारखी मर्यादित अशी होती. धातूचा विचार करता 'अयस' हा शब्द आपल्याला आढळतो. हे बहुधा तांबे किंवा कास्य असावे. छोट्या प्रमाणावर व्यापारही असे; आपण त्याला 'विनिमय' असे म्हणू. हा व्यापार हा मुख्यत्वे वस्तुविनिमय पध्दतीचा असून; गाईंबरोबरच, कापड व कातडे यामध्येच प्रामुख्याने हा व्यापार चालत असे. गुरे सुध्दा विनिमयामध्ये वापरली जात. वाहतुकीसाठी बैलगाड्या वापरल्या जात असत. अर्थात, कारागीरी काय आणि व्यापार काय सर्व काही प्राथमिक स्तरावर असे. मर्यादित प्रमाणात चालत असे. यांना समुद्राचा परिचय नव्हता हे लक्षात घेतले पाहिजे.

मालमत्तेचा विचार करता, या काळात व्यक्तीगत मालमत्तेचे उदाहरण दिसत नाही. या समाजामध्ये मजूर जरे नसले तरी गुलामांचे उल्लेख आढळतात. कर्जफेड न झाल्यामुळे किंवा युध्दातील पराभूत सैनिकांना गुलाम केले जात असायचे. हे गुलाम व्यक्तीगत मालकीचे असत. त्यांचा उपयोग फक्त घरगुती कामांसाठी केला जात असे.

पुढे उत्तर वैदिक काळामध्ये अर्थव्यवस्था अशीच राहीली. फक्त एकंदर प्रमाणामध्ये विस्तार झाला. वाढ झाली.

यावेळीही पशुपालन हाच प्रधान व्यवसाय होता. तरी या समाजाचा, आता, शेतीकडे अधिकाधिक झुकाव झालेला दिसून येतो. पिकांमध्ये वैविध्य वाढून गहू, बार्ली, तांदूळ याचबरोबर कापूस, भाजीपाला ही घेतला जाऊ लागला. शेतीसाठी नांगरणी आता ६ ते २४ बैलांचा नांगर वापरुन सुरु झाली. पिकांची नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी इ. टप्पे आता अधिक व्यवस्थित होऊ लागले. पाणीपुरवठा करण्यासाठी शेतकरी प्रसंगी नदींना बांधही घालू लागले.

या काळात वर्णव्यवस्था ही अधिकाधिक कडक झाल्याने आता कारागीरी ही जातींशी निगडित झाली. ती जन्माधिष्ठित झाली; वंशपरंपरागत झाली. ही कारागीरी विविध क्षेत्रात वाढली. सुतार, रथकार, धनुष्यकार, धातूमध्ये काम करणारे, चामड्यात काम करणारे, कुंभार, चटई विणणारे, टोपल्या बनवणारे, सोनार इ. विविध कारागीरी दिसून येते. तसेच पुरोहित, नर्तक, वादक, सारथी, वैद्य, धोबी, नावाडी, शिकारी, नाभिक, दूत इत्यादी व्यावसायिकही विकसित झाले. या काळात लोखंडाचे ज्ञान होऊ लागलेले दिसून येते. या लोखंडाला 'कृष्णअयस', 'शामअयस' असे म्हणले जात होते.

या काळात वैदिक संस्कृतीच्या विस्तारामुळे, बाजारपेठही वाढलेली होती. देशी-विदेशी विविध संस्कृत्यांशी संबंध येऊन व्यापारामध्ये वैविध्याबरोबर विस्तारही झालेला होता. यामूळेच विशिष्ठ वस्तूंमध्ये व्यापार करणाऱ्या संघांची सुरुवात झाली. त्याचप्रमाणे वस्तूविनिमयाबरोबरच, थोड्याफार प्रमाणावर धातूंच्या तुकड्यांचा चलन म्हणून वापर सुरु झाला. बैलगाड्यांबरोबरच हा व्यापार प्रसंगी जलमार्गानेही होऊ लागला. या सर्व चलनवलनाचे व्यवस्थापन करणे आवश्यक बनले. त्यासाठी छोट्या मोठ्या व्यापारी केंद्रांचाही उदय होऊ लागला. अर्थात ही व्यापारी केंद्रे अजूनही गावांसारखीच होती. शेवटीशेवटी तैतरिय अरण्यकामध्ये 'नगर' हा शब्द मिळू लागतो. त्यामुळे, या बाबी अजूनही प्राथमिक स्तरावरच जरी असल्या तरी या बाबींमूळे आगामी पूर्वइतिहाकालिन नागरीकरणाची तयारी/कच्चा माल/पायाभूत बैठक तयार झालेली होती असे दिसते.

**क. पूर्व ते उत्तर वैदिक काळातील बदलः समाज आणि धर्म**

**समाज**

पूर्व वैदिक काळातील वैदिक समाज हा सप्तसिंधूच्या प्रदेशात बऱ्यापैकी स्थिर झाला. हे लोक बांबू-चिखलाच्या झोपडीत रहात असावेत. यांची कुटुंबपध्दती एकत्रित होती तशीच पितृसत्ताक होती. त्यामुळे यांच्यात वयाने ज्येष्ठ अशा कुटुंबप्रमुखाच्या (गृहपती) नियंत्रणाखाली सारे कुटुंब असे. या काळातील स्त्रीला कुटुंबाप्रमाणेच, समाजजीवनातही महत्वाचे स्थान होते. पुरुषांच्या बरोबरीने या स्त्रिया शिक्षण, राजकारण, समाजकारण, चर्चा यामध्ये भाग घेत असत. यांच्यामध्ये, प्रौढविवाह, स्वेच्छेने विवाह, विधवाविवाह इ. बाबी प्रचलित असून स्त्रीयांची एकंदर परिस्थिती चांगली होती असे दिसते.

या समाजात भेद नव्हते. व्यवसायावरुन ब्राह्मण व राजन्य (क्षत्रिय) असे दोन महत्वाचे वर्ग होते असे दिसून येते. मात्र, कोणतेही भेद हे जन्मावर आधारीत नव्हते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. तसेच, वैश्य आणि शूद्र या शब्दांचा उल्लेख या काळात कुठेही येत नाही.

शिक्षण हे गुरुगृही-आश्रमात चालत असून, राजाचे यास अनुदान असे. स्त्री-पुरुष या दोहोंनाही याठिकाणी प्रवेश असून, स्वतंत्र स्त्री शिक्षकांचीही सोय असे. लेखनकला जरी ज्ञात नसली तरी मौखिक पाठांतराने ज्ञान संग्रहित केले जात होते. व्यावहारीक शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्यांचीही शिकवण दिली जात असे.

हा समाज मुख्यत्वे पशुपालक असून यांच्या आहारात दुग्धजन्य पदार्थ, त्यासह मांसाहाराचा समावेश होता. मात्र 'गाय' मारली जात नसे. तिला 'अघन्या' म्हणजे मारण्यासाठी प्रतिबंधीत असे म्हणलेले आहे. सोम, सुरा यांचे मद्यपान नियमित चालत असे.

वेशभूषेचा विचार करता साधारणतः सुती कपडे वापरत. शिवाय लोकर, प्राण्यांचे कातडे यांचा वापरही वस्त्रासाठी होत असे.

हा समाज एकंदर संतुष्ठ आणि समाधानी होता. ते वीणा, मृदंग वादनात तल्लीन होत असत. तशीच यांना नाटकंही आवडत असत. त्याचप्रमाणे हे लोक मोठ्या प्रमाणावर जुगार खेळत असत. रथांच्या शर्यती हा एक यांचा खेळ होता.

पुढे उत्तर वैदिक काळात वैदिक समाज हा आता भारताच्या विविध भागात विस्तारला. त्यांचा निरनिराळ्या समाज-संस्कृत्यांशी संबंध येऊ लागला. सामाजिक अभिसरण झपाट्याने होत होते. एकंदर संस्कृतीमध्ये बरेच बदल होत होते. ती अधिक गुंतागुंतीची होत गेली. त्यामूळे वैदिक संस्कृतीतील यम-नियमही कडक व गुंतागुंतीचे बनत गेले. याचा महत्वाचा फटका *स्त्रीयांवर* बसून त्यांचे स्वातंत्र्य मर्यादित केले गेले. त्यांचे विवाहाचे वय कमी करण्यात आल्याने त्यांना शिक्षण आपोआपच नाकारले गेले. त्यांच्यातील समाजातील वावरावर, पुनर्विवाहासारख्या बाबींवर निर्बंध घालण्यात येऊन, तिला उंबऱ्याआड करण्यात आले.

या काळात वैदिक समाज हा पुरुषप्रधान, पितृसत्ताक असा बनला. त्यामुळे, स्त्रीयांचे स्थान घरामध्येही दुय्यम बनले. पुरुष हा 'गृहपती' असून, त्याचे घरातील सर्वांवर वर्चस्व असे. स्त्रिला मालमत्तेचा कोणताही अधिकार नव्हता. तसेच, पुत्रजन्मालाच अधिक महत्व दिलेले होते. श्रौतयज्ञामध्ये स्त्रियांना सहभागी होण्यास परवानगी होती. मात्र तिला पौरोहित्य करण्याचा अधिकार नव्हता. या काळात, विवाह हा महत्वाचा संस्कार बनलेला होता. त्यामुळे 'घटस्फोटा'ला मान्यता नव्हती. पतीला सुखात ठेवणारी, पुत्रांना जन्म देणारी आणि पतीला उलटं न बोलणारी स्त्री ही आदर्श समजली जात असे. पुनर्विवाह जरी अमान्य असला, तरी विधवेचा तिच्या दीराबरोबर विवाह झाल्याचे उल्लेख मिळतात.

या काळातील स्त्रियांना बरीच कामे करावी लागत असत. त्यांच्यावर पशुपालनाची जबाबदारी होती. दूध काढणे, पाणी आणणे ही कामे त्यांना करावी लागत. त्या वीणकाम, भरतकाम ही करीत असत. रंगोद्योगामध्येही त्या असत. त्या पीठाची गिरणी चालवित असत, बांबूच्या कामट्या तयार करीत असत असाही उल्लेख मिळतो. तसेच, या काळात गार्गी, मैत्रेयी यांच्यासारख्या विदुषी दिसतात. तसेच मुद्‌गालिनी, वध्रीमती यांसारख्या यौध्द्याही दिसतात.

या काळात *विवाहाचे* आठ प्रकार दिसून येतात, जसे आर्ष, ब्राह्म, प्रजापत्य, दैव आणि गांधर्व, असूर, राक्षस, पिशाच्च असे. मात्र पहिल्या चार प्रकारांनाच मान्यता होती. पितृसत्ताक पध्दती कडक करण्याच्या हिशेबाने अर्थातच यातील स्वेच्छा विवाहाला नापसंती देण्यात आली.

समाजातील बंडखोर लोकांना नियंत्रित करण्यासाठी तसेच कुटुंबव्यवस्था व व्यक्तीची सामाजिक बांधीलकी मजबूत करण्यासाठी *आश्रमव्यवस्था* निर्माण करण्यात आली. यामध्ये व्यक्तींच्या संपूर्ण आयुष्याचे चार भाग करण्यात आले. ब्रह्मचर्याश्रमातून शिक्षणाचे महत्व ठसवले गेले. पुढे, गृहस्थाश्रमात विवाह करणे, अपत्यजन्म, कुटुंबांची सेवा आणि सामाजिक कर्तव्ये यांना महत्व देण्यात आले. पुढे, वानप्रस्थाश्रमामध्ये; मुलाचा विवाह झाल्यावर, संसारातून पालकांनी निवृत्त होण्याला महत्व देण्यात आले. तर, शेवटी संन्यासाश्रमामध्ये, संन्यास घेण्याची परवानगी देण्यात आली.

तर, सांस्कृतिक सरमिसळीतून समाजातील वर्णभेद/वर्गभेद हा अधिक स्पष्ट स्वरुपात मांडला गेला. या काळात वर्णव्यवस्था निर्माण झाली. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात 'पुरुषसुक्त' हा एक ऋचांचा/श्लोकांचा संच आहे. येथे यज्ञामधून विश्वनिर्मात्याचा जन्म झाला असा उल्लेख आहे. या विश्वनिर्मात्याच्या मुखातून ब्राह्मण, बाहूतून राजन्य (क्षत्रिय), मांडीतून वैश्य आणि पावलातून शुद्र निर्माण झाले असा तो उल्लेख आहे. हे चार वर्ण होत. प्रत्येकांची कर्तव्ये निश्चित झाली. यांना 'चातुवर्ण्य व्यवस्था' म्हणले जाते. यामध्ये पहिल्या तीन वर्णांना–त्रैवर्णिकांना 'द्विज' असे म्हणले गेले. म्हणजे वैदिक संस्कारांचा अधिकार या त्रैवर्णिकांना होता. हे समाजातील महत्वाचे वर्ग होते. अर्थात या काळात वर्णव्यवस्थेचा उगम जरी झाला तरी ती फारशी कठोर दिसत नाही. म्हणूनच ऋग्वेदाच्या नवव्या मंडलामध्ये एकजण म्हणतो ''मी ऋचा म्हणतो, माझे वडिल वैद्य आहेत, माझी आई जात्यात मका दळते आहे. अशा प्रकारे वेगवेगळी कामे करुन संपत्ती मिळवत आहोत''.

पुढे, ही वर्णव्यवस्था जन्मावर आधारीत करण्यात आली. राजन्य/क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य आणि शूद्र असे हे चार वर्ण होते. या काळात राजपद वंशपंरापरागत झाले आणि ते राजन्यांच्या भावकीतच राहिले. त्यामुळे हा राजन्यांचा/क्षत्रियांचा वर्ण सर्वोच्च ठरला. त्यानंतर, राजाला कायदेशीरपणा प्राप्त करुन देणारे ब्राह्मण महत्वाचे ठरले. या काळात यज्ञांचे महत्व वाढले; धर्मशास्त्रावर त्यांचा अधिकार निर्माण झाला. अशाप्रकारे या दोन वर्णांना समाजामध्ये महत्वाचे स्थान मिळाले. अर्थात, उत्पन्न मिळविण्याची जबाबदारी तिसऱ्या म्हणजेच वैश्य वर्णावर आली. हे शेती–व्यापार करीत आणि कर भरीत. काही काळ यांचेही समाजात महत्व राहिले. त्यानंतर, सर्व समाजाची सेवा करण्याची जबाबदारी शूद्र या चवथ्या वर्णाकडे आली. त्यात शुध्द–अशुध्द या कल्पनेतून अस्पृश्यांच्या वर्गांचा उदय झाला. थोडक्यात, ही वर्णव्यवस्था आता कठोर झाली. ती जन्माधिष्ठित झाली. त्यामुळे लाभ मिळविण्याचे सर्व क्षेत्र क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्याकडेच कायमस्वरुपी राहिले. राज्याला उत्पन्न मिळवून देणे आणि कर भरणे ही वैश्य वर्णांची कायमस्वरुपी जबाबदारी झाली. तर सर्वांची सेवा करणारे शूद्र हे ही कायमस्वरुपीच झाले.

या काळात शूद्रांपेक्षा कनिष्ठ असे गुलाम असत. यांना दास, दासी असे म्हणले जात असे. अस्पृश्यांची संकल्पना जरी नसली तरी चांडाळांकडे तिरस्काराने पाहिले जात असे.

तसेच, या काळात; आंध्र, पुलिंद, किरात, निषाद अशा विविध जमातींचा उल्लेख मिळतो. मात्र, या जमाती वेगाने वैदिक संस्कृतीत सामील होताना दिसतात. हे होत असताना, या जमातींच्या देवता, श्रध्दा,

विधी यांनाही वैदिक संस्कृतीमध्ये स्थान मिळत गेले. वैदिक संस्कृतीचा हा विशेष पुढे हजारो वर्षे कायम राहिलेला दिसून येतो.

पशुपालन हा यांचा महत्वाचा व्यवसाय जरी असला तरी शेतीचाही एक महत्वाचा उपजीविकेचा मार्ग म्हणून उदय झाला. अर्थात, आहारात शाकाहार, मांसाहार व मद्यसेवन हे पूर्वीचे घटक कायम राहीले. अपूप (बार्लीचा एक पदार्थ), करंभ (बार्लीची खीर) हे पदार्थ दिसतात. तर, सोम, सूरा हे मद्यांचे प्रकार दिसून येतात.

यांची वेशभूषा पूर्वीसारखीच राहीली. आणि मनोरंजन, खेळांचे प्रकार ही. टाळ, बासरी, वाण (१०० तारांचे वाद्य) अशा वाद्यांची भर पडली. थोडक्यात सुषीर, तंतू आणि चर्म/ताल अशा वाद्यांचे सर्व प्रकार दिसू लागले. या काळात 'सामवेद' रचला गेला. यामध्ये, वेदांतील ऋचा कशा ताला-सूरात म्हणायच्या याचे मार्गदर्शन आहे. म्हणूनच या वेदाला 'भारतीय शास्त्रीय संगीताचा' मूळ वेद म्हणले जाते.

**धर्म**

पूर्ववैदिक काळातील आर्य समाज हा मुख्यत्वे निसर्गपूजक होता. निसर्गातील शक्तींना व संकटांना त्याने ईश्वर मानले. त्यांच्या कृपेसाठी तो स्तवन करीत असे; प्रार्थना म्हणत असे. या प्रार्थनांचा संग्रहच ऋग्वेदात आहे. हे स्तवन यज्ञाच्या साक्षीने केले जात असत. संपत्ती, आरोग्य, पुत्र, दीर्घायुष्य मिळविण्यासाठी यज्ञ केले जायचे. या काळात, यज्ञ हे ईश्वराच्या कृपाप्राप्तीसाठीचे एक *साधन* मात्र होते. असे यज्ञ घराघरातून केले जात असून, कुटुंबप्रमुख हे यज्ञ करीत असत. त्यांना स्त्रिया मदत करीत. तर कुटुंबप्रमुखाच्या अनुपस्थितीत स्त्रिया यज्ञ करीत. इंद्र, रुद्र, वरुण, अग्नी, सूर्य, वायू, उषा, अदिती अशा देवता असून, यामध्ये इंद्राला महत्वाचे स्थान होते. या काळात 'ऋत' ही संकल्पना दिसून येते. ऋत म्हणजे एकंदर नैतिक मूल्यव्यवस्था होय. ही व्यवस्था टिकून रहावी यासाठी प्रार्थना केल्या जात. वरुण, मित्र या देवता 'ऋत' संकल्पनेच्या संरक्षक देवता आहेत असे मानले जात असे.

उत्तरवैदिक काळात मात्र धर्मामध्ये वैविध्य व गुंतागुंत निर्माण झाली. त्यामूळे धर्म व विधी यांचे विविध नियम करण्यात आले अणि ते कडक करण्यात आले. पूर्वी कृपाप्राप्तीसाठी *यज्ञाचा* वापर फक्त साधन म्हणून केला जायचा. आता यज्ञ जर व्यवस्थित केले गेले तर ईश्वराला कृपा ही करावीच लागते असा समज करुन देण्यात आला. त्यामूळे यज्ञ व्यवस्थित करणे ही एक महत्वाची बाब बनली. त्यामुळे पूर्वी साधन असणारे यज्ञ आता एकमेव साध्य ठरले.

अर्थातच, हे यज्ञ व्यवस्थित करणाऱ्या पुरोहित वर्गाचे प्रचंड महत्व वाढले. यज्ञातील वैविध्य आणि गुंतागुंत लक्षात घेता, पुरोहित वर्गाने यज्ञ करण्याचे क्षेत्र आपल्या ताब्यात घेतले. आणि जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेमुळे ते त्याच वर्गात कायमस्वरुपी राहिले. अर्थातच, यज्ञ करणे हा पुरोहित वर्गाचा हक्क बनला. कुटुंबप्रमुखाकडून हा अधिकार काढून घेण्यात आला. परिणामी यज्ञामध्ये वैविध्य आणि नियमामध्ये गुंतागुंत निर्माण झाली. आणि त्यानुसार, पुरोहितांमध्येही वैविध्य निर्माण झाले. यातून प्रचंड खर्चाचे आणि वेळखाऊ असे एक कर्मकांडच तयार झाले.

या यज्ञांमध्ये विविध प्रकार दिसून येतात. राजासाठी म्हणून काही दीर्घकालीन आणि महत्वाच्या यज्ञांचा उल्लेख मिळतो. यामध्ये, सत्ता-संपत्ती मिळवण्यासाठी 'वाजपेय' यज्ञ केला जात असे. यावेळी राजा रथांची शर्यत करीत असे. तर राज्याभिषेकावेळी 'राजसूय' हा यज्ञ केला जात असे. यावेळी गुरं पळवणे, द्युत/जुगार खेळणे इ. चे नियोजन असे. तर राज्यविस्तारासाठी 'अश्वमेध' यज्ञ केला जात असे. अशा यज्ञांच्यावेळी लोकांची प्रचंड गर्दी होत असे. त्यांच्या सेवेसाठी आणि मनोरंजनासाठी सर्व कारागीर, व्यावसायीक, खेळ करणारे यांचीही गर्दी होत असे. बरेच दिवस चालणाऱ्या या यज्ञांमुळे त्याठिकाणी यात्रेचेच रुप येत असे. एका बाजूला असे यज्ञ प्रचंड खर्चीक वाटू शकतात. तर दुसऱ्या बाजूने जर आपण पाहिले तर हे यज्ञ समाज संघटनेचे, आर्थिक उलाढालीचे, उत्पन्नाच्या संधी देणारे तसेच कला-साहित्य-संस्कृती टिकवून ठेवणारे असे असत.

अन्य यज्ञांमध्ये, नित्य यज्ञ असत. हे यज्ञ त्रैवर्णिकांच्या घरांमध्ये रोज होत असत. यामध्ये 'अग्नीहोत्र' हा यज्ञ येतो. काही यज्ञ प्रासंगिक असत, जसे, पोर्णिमेला, प्रत्येक हंगामाच्या सुरुवातीला. तसेच काही यज्ञ हे 'काम्य' असत; म्हणजे, एखादी विशिष्ठ इच्छा धरुन हे यज्ञ केले जात असत.


यातूनच, देवादिकांमध्येही वैविध्य व संख्या वाढली. त्यांचे तीन गटांमध्ये (कोटी) वर्गीकरण झाले. प्रत्येक गटामध्ये ११ देव आणि त्यातील प्रमुख १ अशी रचना तयार झाली. अंतरिक्ष गटाचा इंद्र, आकाश गटाचा सूर्य तर पृथ्वी गटाचा अग्नी हा प्रमुख देव झाला. पुढे सूर्य देवतेचे महत्व वाढून पुढे यातूनच विष्णू या देवतेचा उदय झाला. तर रुद्र या देवतेतून, शिव या देवतेचा उदय झाला. या काळातील सामाजिक अभिसरणातून, इतर संस्कृत्यांतील देवादिकांचा व विधींचाही समावेश वैदिक संस्कृतीत होऊ लागला. यातून देवतांची संख्या वाढत गेली. त्याचप्रमाणे, विविध प्रकारच्या मूर्तीपूजा, प्राणीपूजा, जादूटोणा, अंधश्रध्दा इ. बाबी विकसित होऊ लागल्या. अर्थात, या काळात देवादिकांची संख्या जरी वाढली असली तरी ते सर्व एकाच ईश्वराची/परमात्म्याची विविध रुपे आहेत असे समजले जात असे. ''देव हा एकच असतो. फक्त ते अनेक आहेत असे भटजी म्हणत असतो'' असे स्पष्ट विधान या काळात आढळते.

याच काळात व्यक्तीच्या आयुष्यातील विविध टप्प्यांना/बदलांना सामाजिक मान्यता देणे आवश्यक बनू लागले. यातूनच *संस्कारा*च्या संकल्पनेचा उदय झाला. व्यक्तीच्या गर्भावस्थेपासून, त्यांच्या मृत्युपर्यंत विविध शारिरिक/मानसिक बदलाचे टप्पे येत असतात. याला कुटुंब तसेच समाजाचाही आधार लागत असे. यासाठी, या प्रत्येक टप्प्यावर संस्कारांची व्यवस्था करण्यात आली. या कार्यक्रमांत सारे कुटुंब आणि समाज उपस्थित असल्याने, त्या व्यक्तीला एक आधार, मान्यता मिळत असे. जसे, जातकर्म (बाळ जन्माला आल्यानंतर लगेच), नामकरण (बारसं), कर्णवेध (कानाच्या पाळीला छिद्र पाडणे), निष्क्रमण (बाळाला पहिल्यांदा अंगणात नेणे) अन्नप्राशन (बाळाचा पहिला शिजवलेला खाऊ), वर्षवर्धन (पहिला वाढदिवस), चूडाकर्म/चौल (जावळ काढणे), उपनयन (पहिल्यांदा शाळेला जाताना), समावर्तन (पदवीदान), विवाह (यात काही उपसंस्कारांचे टप्पे), अंत्यसंस्कार आदि असे १६ प्रमुख संस्कार निर्माण झाले.

तर, कुटुंबातील जबाबदारी आणि सामाजिक कर्तव्याचे पालन यासाठी धर्म, अर्थ, काम, मोक्ष असे चार *पुरुषार्थही* तयार केले गेले. प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन करावे, धर्मविहित कर्तव्यांचे पालन करावे, आपापल्या वर्णानुसार जबाबदाऱ्या पार पाडाव्यात म्हणजे धर्म हा पुरुषार्थ. तर समाजमान्य उपजिविकेचे पालन करावे म्हणजे अर्थ. विवाह करुन, अपत्यांना जन्म देणे म्हणजे काम हा पुरुषार्थ. तर, जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून सुटका करुन घेण्यासाठी म्हणजेच मोक्ष (मुक्ती) मिळविण्याच्या प्रयत्नात राहणे म्हणजे मोक्ष हा पुरुषार्थ होय.

**ड. महाकाव्ये: रामायण आणि महाभारत**

**महाकाव्यकालीन भारत**




रामायण आणि महाभारत ही दोन महाकाव्ये. यांना 'इतिहास' असेही म्हणले जाते. यांनी निव्वळ भारतावर नव्हे तर जगावर आपला प्रभाव टाकलेला आहे.

सर्वसाधारणतः असा समज आहे की, रामायण प्रथम आणि महाभारत हे नंतर निर्माण झाले. तर ते तसे नसून, महाभारत हे प्रथम निर्माण झाले. कारण महाभारतामध्ये जी राज्यपध्दती आहे ती जमातीवर आधारीत अशी पध्दती आहे. तसेच, ते ज्या भूभागात घडते, तो फक्त उत्तर भारताचा मर्यादित असा आहे. याउलट, रामायणामधील राज्यपध्दती ही व्यवस्थित राजसत्तात्मक राज्य पध्दती आहे. प्रादेशिक ओळख असलेली ही राज्ये आहेत. शिवाय, रामायणामध्ये वर्णिलेल्या भूगोलात भारताचा व्यापक भूप्रदेश येतो. या काळात आर्यीकरण हे भारताच्या दक्षिण टोकापर्यंत पोचू लागले होते असे दिसते.

दोन्ही महाकाव्ये, मूळ स्वरुपात, इसपू १० व्या ते ८ व्या शतकाच्या दरम्यान निर्माण झालेली दिसून येतात.

**महाभारत**

महर्षी वेदव्यासांनी हे महाकाव्य लिहिले. व्यास, महाभारताला 'इतिहास' असे म्हणतात. व्यासांनी आपला शिष्य वैशंपायन याला महाभारत सांगीतले. पुढे वैशंपायनने, जनमेजय राजाला हे सांगीतले. नंतर, नैमिषारण्यात, उग्रश्रवा सौती याने, एका यज्ञाच्यावेळी जमलेल्या ऋषींना हे महाभारत पुन्हा सांगीतले. याला 'जय', 'इतिहास', 'महाभारत' अशी विविध नावे आहेत.

हस्तीनापूर येथे राज्य करणाऱ्या कुरु जमातीतील, चुलतभावांमधील, कुरुक्षेत्र येथे घडलेल्या युध्दाची कथा ही महाभारतातील मुख्य कथा आहे.

यात एकूण १८ पर्व आणि जवळजवळ १ लाख श्लोक आहेत.

१. **आदिपर्वः** महाभारत केंव्हा, केंव्हा सांगीतले गेले, कौरव आणि पांडवांचे पूर्वज, कौरव, पांडवांचे बालपण.

२. **सभापर्वः** पांडवांचे लग्न, द्यूताचा खेळ, इंद्रप्रस्थ नगरीची स्थापना, द्रौपदीचा भरसभेत अपमान, पांडवांचे वनवासाला निघून जाणे.

३. **वनपर्वः** पांडवांचा १२ वर्षांचा वनवास.

४. **विराटपर्वः** १३ व्या वर्षी, म्हणजे अज्ञातवासातील पांडव, विराटाच्या राज्यात.

५. **उद्योगपर्वः** कौरव आणि पांडवांची युध्दाची तयारी, कृष्णाची असफल शिष्ठाई.

६. **भिष्मपर्वः** युध्द सुरु, भिष्माच्या नेतृत्वाखाली कौरवांची लढाई, ते शरपंजरी पडतात. याच पर्वात 'श्रीमद् भगवतगीता' येते. यात १८ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत. हा, कृष्णाने, अर्जुनाला केलेला उपदेश आहे.

७. **द्रोणपर्वः** द्रोणाच्या नेतृत्वाखाली कौरव. त्यांचा अंत.

८. **कर्णपर्वः** कर्णाच्या नेतृत्वाखाली कौरव, त्याचा अंत.

९. **शल्यपर्वः** शल्याच्या नेतृत्वाखाली कौरव. भीमाच्या हल्ल्याने दुर्योधन जखमी. तो मरणासन्न.

१०. **सौप्तिक पर्वः** झोपलेल्या पांडवांच्या छावणीवर अश्वत्थाम्याचा हल्ला, पांडवांचा वंशउच्छेद करण्याचा प्रयत्न. समाधानाने दुर्योधन प्राण सोडतो.

११. **स्त्रीपर्वः** पराभूत कौरवांच्या स्त्रियांची रणभूमीला भेट, त्यांचा आक्रोश.

१२. **शांतीपर्वः** युधिष्ठीराचा राज्याभिषेक होतो.

१३. **अनुशासनपर्वः** राजाने कसे लोककल्याणकारी असावे? याचा भिष्माकडून उपदेश.

१४. **अश्वमेधपर्वः** अर्जनाच्या नेतृत्वाखाली अश्वमेधाचा प्रवास. त्याचा दिग्वीजय.

१५. **आश्रमवासिका पर्वः** धृतराष्ट्र, गांधारी आणि कुंतीचे अरण्यात निघून जाणे. तेथे त्यांचा मृत्यु.

१६. **मौसूल पर्वः** द्वारकेत यादवांचे एकमेकांतील युध्द-यादवी युध्द, यादवांचा अंत. कृष्णाचा मृत्यु.

१७. **महाप्रस्थानिका पर्वः** पांडव आणि द्रौपदीचे भारतभ्रमण आणि शेवटी हिमालयामध्ये. तेथे युधिष्ठिर वगळता, सर्वांचा मृत्यु.

१८. **स्वर्गारोहण पर्वः** युधिष्ठिराची परिक्षा आणि विजय. सर्वांचे स्वर्गाला जाणे.

या १८ पर्वाबरोबरच, एक खिल किंवा उपपर्व आहे. याला 'हरीवंश पर्व' असे म्हणतात. येथे कृष्णाचे चरित्र दिलेले आहे.

यामध्ये पुढे प्रसिध्द झालेल्या अन्यही काही कथा आहेत जसे, हरिश्चंद्र, सत्यवान सावित्री, नलदमयंती, शकुंतला, कच-देवयानी, पुरुरवा-उर्वशी इ.

महाभारत हे लोकप्रिय महाकाव्य आहे. त्यामुळे, भारतातील विविध भाषांमध्ये महाभारताची रुपांतरे झालेली आहेत. त्याचप्रमाणे जगामध्येही रुपे दिसतात; विशेषतः आग्नेय आशियामध्ये ही रुपं दिसून येतात.

**रामायण**

हे महर्षी वाल्मिकी यांनी रचले. कोसल राज्यातील, अयोध्या हे शहर. येथील इक्ष्वाकू घराण्यातील, सूर्यवंशी राजा म्हणजे राम होय. याची ही कथा आहे.

एकूण ७ कांडात आणि २४,००० श्लोकांचे हे महाकाव्य आहे. साधारण इसपूच्या ८-७ व्या शतकामध्ये हे रचलेले असावे. यात सात कांडात बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा, सुंदर, युध्द आणि उत्तर यांचा समावेश होतो.

- बालकांडमध्ये रामाचे बालपण, त्याचा परिवार, त्याचे शिक्षण, सीतेशी विवाह आणि अयोध्येला परत येणे हे प्रसंग येतात.
- अयोध्याकांडमध्ये रामाचा राज्याभिषेक करण्याचे ठरते. मात्र कैकेयीच्या हस्तक्षेपामुळे त्याला वनवासाला जावे लागते. तो, सीता आणि लक्ष्मणासह वनांकडे निघून जातो. त्याने परत फिरावे अशी भरताची विनवणी तो अमान्य करतो.

- अरण्यकांडामध्ये रामाचा १३ वर्षाचा वनवास पूर्ण होतो. पंचवटीच्या अरण्यात, सीतेचे अपहरण होते. जटायूचा प्रसंग येतो. सीतेचा शोध सुरु होतो.
- किष्किंधाकांडमध्ये राम आणि हनुमानाची भेट होते. वाली-सुग्रीवाचा प्रसंग घडतो. हनुमानाला कळते की सीतेला रावणाने पळवलेले आहे. ती लंकेत आहे.
- सुंदरकांड हे हनुमानाच्या पराक्रमाला वाहिलेले आहे. त्याचे सीतेला, रामाचा निरोप सांगणे. लंकेत गोंधळ घालणे. आणि, बातमीसह, रामाकडे परत येणे हे प्रसंग येतात.
- युध्दकांडामध्ये राम आणि रावणाचे युध्द येते. रावणाचा वध होतो. राम सीता भेटतात. सीतेची अग्नीपरिक्षा होते. रामसीता, सर्वांसह अयोध्येला परत येतात.
- उत्तरकांड हे नंतर रचलेले आहे. वास्तविक युध्दकांडानंतर मूळ रामायण संपन्न होते. पण हा भाग नंतर जोडलेला आहे. यामध्ये रामाचे राज्य, सीतेला जंगलात पाठवणे, लवकुशांचा जन्म, सीतेचा मृत्यु, रामाचा मृत्यु हे प्रसंग येतात.

महर्षी वाल्मिकींनी जरी हे रचले असले तरी भारतभर रामायणाची विविध रुपे दिसून येतात जसे, मराठीतील एकनाथांचे 'भावार्थ रामायण', गोंड आदिवासींचे रामायण, जैन रामायण, तामीळ भाषेतील कंबनचे 'रामावतरम', तेलुगूतील गोणारेड्डीचे 'रंगनाथ रामायण', मल्याळीतील 'अधात्म्यरामायण', आसामीत माधव कंदलीचे 'सप्तकांड रामायण', बंगालीत कृतीबास ओझा चे 'क्रितीवासी रामायण', उडियातील बलराम दास चे 'जगमोहन रामायण', हिंदीतील तुलसीदासांचे 'रामचरितमानस'. त्याचप्रमाणे जगातही रामायणची रुपे दिसतात, कंबोडिया, ब्रह्मदेश, थायलंड, इंडोनेशिया, फिलिपाईन्स, लाओस इ. आग्नेय आशियाई देशात; त्यांची, त्यांची रामायणाची रुपे आहेत. थोडक्यात, रामायणाने भारतासह, जगावरही मोहिनी टाकलेली आहे असे दिसून येतात.

**रामलिला, अयोध्या आणि रामायण, इंडोनेशिया**

**कृष्ण, यक्षगान आणि हनुमान आणि रावण, थोलूबोम्मलाटा छाया-पपेटस्, आंध्र प्रदेश**





**या महाकाव्यांची वैशिष्ट्ये**

- ही महाकाव्ये एकेका व्यक्तीने लिहिली असे मानले जाते. मात्र, एकंदर यांची प्रचंड व्याप्ती पाहता हे अशक्य वाटते. मूळात ही महाकाव्ये छोटी असावीत, पुढे त्यामध्ये भर पडत गेली असे वाटते. त्याचप्रमाणे, विविध 'सूत' (राजाचा सारथी) जे असत, त्या सूतांद्वारे या कथा प्रसारीत झालेल्या दिसून येतात. पुढे, या कथांचे संकलन ऋषींनी केले असावे. म्हणजेच, ही महाकाव्ये, प्रथम लोककथांच्या स्वरुपात असावीत, पुढे त्यांचे प्रमाण महाकाव्यात रुपांतर झाले असावे.
- तसेच, अगदी सुरुवातीला, गुरुशिष्यांच्या मौखिक पंरपरातूनच ही महाकाव्ये पुढे जात राहीली. पुढे भूर्जपत्र/ताडपत्र यांवर लिहिली गेली. पुढे कागदावर लिहिली गेली. आणि आता त्यांची छपाई होते.

- यातील, महाभारत हे मानवाच्या सर्व गुण-अवगुणांवर प्रकाश टाकते. तर रामायण हा कुटुंबसंस्थेबाबत आदर्श निर्माण करते.

- ही महाकाव्ये फक्त गोष्टी सांगत नाहीत. तर, राजाने लोककल्याणकारी कसे वागावे? कुटुंबामध्ये कसे वागावे? समाजात, सामाजिक बांधीलकीने कसे वागावे? पुरुषार्थ म्हणजे काय? अशा विविध माध्यमातून, लोकशिक्षण करतात; त्यांच्यावर संस्कार करतात.

- 'कर्तव्याला प्रधान स्थान' (कर्मयोग) देणाऱ्या भगवत्‌गीतेला भारतीय संस्कृतीत मानाचे स्थान आहे. तो हिंदूचा धर्मग्रंथ समजला जातो. भारतीय विद्वानांवर या ग्रंथाची खूप मोहिनी आहे. शंकराचार्य, रामानुजाचार्य, संत ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक अशा विद्वानांनी गीतेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- ही महाकाव्ये इतिहासाचे महत्वाचे साधनग्रंथ आहेत. इसपू १० ते ६ व्या शतकादरम्यान भारत कसा होता याचे दर्शन यातून घडते. तत्कालिन भूगोल, राजकीय जीवन, सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, धार्मिक जीवन, कलात्मक जीवन अशा तत्कालिन संस्कृतीच्या सर्व अंगांची माहिती मिळते.

- या महाकाव्यांचा काळ हा इसपू १० ते ६ वे शतक जरी असला तरी, काळाच्या ओघात त्यामध्ये अनेक गोष्टींची भर पडत गेलेली आहे. त्यांचे पुनर्लेखन वारंवार घडत आलेले आहे.

- ही महाकाव्ये अन्य महत्वाच्या गोष्टींवर ही प्रकाश टाकतात, जसे, राजपदाचे स्वरुप काय होते? विविध संस्कृतींमध्ये कसे संबंध होते? वैदिक संस्कृतीचा प्रसार कसा झाला? अशा अनेक बाबींची आपल्याला माहिती मिळते.

- पूर्वी वैदिक संस्कृती ही गंगेपर्यतच मर्यादित होती. या महाकाव्यांनीच खऱ्या अर्थाने, दक्षिणेमध्ये, वैदिक संस्कृतीचा प्रसार केला. हा प्रवास या महाकाव्यांतूनही दिसून येतो.

- महाकाव्यातील एकेकाळचे नायक, पुढेही प्रभाव टाकत राहिले. काही काळानंतर, त्यांचे देवांमध्येही रुपांतर झालेले दिसून येते. जसे, कृष्ण, राम, सीता, हनुमान.

- ही महाकाव्ये संस्कृत भाषेतील अजरामर कृती समजल्या जातात. यांची भारतातील विविध भाषांमध्ये रुपांतरे आहेत. शिवाय आग्नेय आशियातील देशांमध्येही ही रुपांतरे दिसून येतात. शिवाय, याची भाषांतरेही विविध युरोपियन भाषेत झालेली आहेत.

- या महाकाव्यांमुळे शिल्पकला, चित्रकला, सादरीकरणाच्या कला अशा कलेच्या प्रत्येक प्रांतावर आपला ठसा उमटवलेला आहे.

- या महाकाव्यांनी विविध कलाप्रकारांवर प्रभाव टाकलेला आहे. लोकलांवरही या महाकाव्यांचा प्रभाव दिसून येतो. जसे चित्रपट, नाटक, संगीतनाटक, तमाशे, रामलीला, दशावतार, यक्षगान, कथकली,

पपेटस् चे खेळ इ. आणि हे फक्त भारतातीलच नव्हे. तर आग्नेय आशियातीलही संगीतनाटके, नृत्यनाटके ही महाकाव्यांवर आधारीत आहेत.

**सारांश**

हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासानंतर, साधारण २०० वर्षानंतर, वायव्य भारतामध्ये एका वेगळ्या संस्कृतीचा परिचय होऊ लागतो. ही वैदिक संस्कृती. प्रारंभी, ही संस्कृती या सप्तसिंधूच्या प्रदेशामध्येच विचरण करीत असते. हा एक भटका, पशुपालक, साधा समाज असतो. यावेळी हा समाज समताप्रधान, समान संधी असणारा, भेद नसणारा, सभा-समिती सारख्या लोकसंस्थेचे महत्व असणारा असा असतो. पुढे, फक्त सप्तसिंधूच्याच प्रदेशात वितरीत झालेला हा समाज, उत्तरवैदिक काळात विविध संस्कृत्यांशी संबंधित होतो. यातूनच सामाकि अभिसरण होऊ लागते. यातून एकीकडे शेती, कारागीरी, व्यापार हा विकसित होतो. त्याचबरोबर स्वत:च्या संस्कृतीची वेगळी ओळख जपण्यासाठी नियमांना कडक केले जाते. आश्रम, ऋण, पुरुषार्थ अशा संकल्पनांतून व्यक्तीची कुटुंबाप्रती तसेच समाजाप्रति बांधीलकी या कर्तव्यांची जाणीव करुन दिली जाते. संस्कारासारख्या संकल्पनेतून, व्यक्तीच्या शारीरिक-मानसिक बदलांना मान्यता आणि पाठिंबा दिला जाते. त्याचबरोबर, सत्ता टिकविण्याच्या लालसेतून समाजातील क्षत्रिय व ब्राह्मण वर्ण; वर्णव्यवस्था निर्माण करतात. ती जन्माधिष्ठित, कडक व साचेबंद करतात. स्त्रीयांवर बंधने येतात. एकंदर या सर्व प्रक्रियेत कायदेशीरपणा येण्यासाठी धर्माचे महत्व वाढल्याने कर्मकांडाबरोबर प्रचंड खर्चाचे व हिंसेचे असे विधी निर्माण होतात. मात्र, या व्यवस्थेतून व्यापार-शेती करुन कर भरणारा वैश्य वर्ण व शारिरिक कष्ट करणारा शूद्र वर्ण हा खालच्या पातळीवर फेकला जातो. या वैदिक संस्कृतीतील दोन्ही काळातील बदल आपल्याला वैदिक साहित्यातून लक्षात येतो. याच उत्तर वैदिक काळामध्ये महाभारत आणि रामायण ही महाकाव्ये घडतात. नायकांच्या कथांद्वारे, लोकसंस्कार करणे, लोकशिक्षण देणे हा या महाकाव्यांचा हेतू असतो. आजही, या महाकाव्यांची मोहिनी; भारतामप्रमाणेच, साऱ्या जगावर पडलेली आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

**अ. योग्य पर्याय निवडा.**

१. आर्यांच्या होमहवन करण्याच्या पध्दतीबद्दल ऋचा...................या वेदात आहेत.

अ. ऋग्वेद　ब. यजुर्वेद　क. सामवेद　ड. अथर्ववेद

२. .....या वेदांगामध्ये वैदिक शब्दांची व्युत्पत्ती सांगीतलेली आहे.

अ. शिक्षा　ब. निरुक्त　क. व्याकरण　ड. छंद

३. ........या वेदांगामध्ये वैदिक ऋचा कशा तालात म्हणायच्या याची पध्दती सांगीतलेली आहे.

अ. शिक्षा　ब. कल्प　क. व्याकरण　ड. छंद

४. ...........याने योगविद्या सांगीतली.

अ. गौतम　ब. कपिल　क. पातंजली　ड. कणाद

५. ..............हा सांख्य या दर्शनाचा कर्ता होय.

अ. गौतम	ब. कपिल	क. पातंजली	ड. कणाद

६. उत्तर वैदिक काळात............या वर्णावर नियमित कर भरण्याची सक्ती असे.

अ. ब्राह्मण	ब. क्षत्रिय	क. वैश्य	ड. शूद्र

७. राजन्य म्हणजे.............ची भावकी होय.

अ. लढाऊ लोकांची ब. शेतकऱ्यांची	क. व्यापाऱ्यांची	ड. पुरोहितांची

८. वैदिक राज्य ला..........असे म्हणले जात असे.

अ. विश	ब. ग्राम	क. कुल	ड. जनपद

९. ............वैदिक संस्कृतीचे प्रमुख उपजीविकेचे साधन होते.

अ. शेती	ब. पशुपालन	क. उद्योग	ड. व्यापार

१०. पूर्व वैदिक काळात..........ही संपत्ती असे.

अ. गुरे	ब. शेळ्या-मेंढ्या	क. ऊंट	ड. हत्ती

११. .............या आश्रमातून शिक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

अ. ब्रह्मचर्याश्रम	ब. गृहस्थाश्रम	क. वानप्रस्थाश्रम	ड. संन्यासाश्रम

१२. ...........या आश्रमामध्ये, विवाह करुन अपत्यजन्म देणे, कुटुंब आणि समाजाची सेवा करणे हे अपेक्षित होते.

अ. ब्रह्मचर्याश्रम	ब. गृहस्थाश्रम	क. वानप्रस्थाश्रम	ड. संन्यासाश्रम

१३. विष्णू या देवतेचा विकास.............या देवतेतून झाला.

अ. इंद्र	ब. सूर्य	क. वरुण	ड. रुद्र

१४. शिव या देवतेचा विकास..............या देवतेतून झाला.

अ. इंद्र	ब. सूर्य	क. वरुण	ड. रुद्र

१५. ............ही पृथ्वीवरील देवतांची प्रमुख देवता होती.

अ. अग्नी	ब. मरुत	क. वरुण	ड. रुद्र

१६. महाभारताची मूळ कथा म्हणजे.........जमातीतील भावांतील युध्द होय.

अ. यदू	ब. पुरु	क. तुर्वसू	ड. कुरु

१७. महाभारतात एकूण...........पर्व आहेत.

अ. १२	ब. १६	क. १८	ड. ७

१८. 'भगवद्गीता' ही महाभारताच्या.........पर्वात येते.

अ. भिष्मपर्व     ब. द्रोणपर्व     क. कर्णपर्व     ड. शल्यपर्व

१९. रामायणात, सीतेचे हरण हा प्रसंग...........मध्ये येतो.

अ. बालकांड     ब. अयोध्याकांड     क. अरण्यकांड     ड. किष्किंधाकांड

२०. ............यांनी 'भावार्थ रामायण' लिहिले.

अ. संत एकनाथ     ब. रामदास     क. तुलसीदास     ड. सुरदास

**ब. टीपा**

१. वैदिक साहित्य

२. रामायण

३. महाभारत

४. वैदिक राजपद

५. वैदिक धर्म

६. सनौली

**क. दीर्घोत्तरी प्रश्न**

१. वैदिक काळातील राजकीय आणि आर्थिक परिस्थितीत झालेला बदल स्पष्ट करा.

२. वैदिक काळातील राजपदाच्या बदलत्या स्वरुपाची माहिती द्या.

३. वैदिक काळातील सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीत झालेला बदल स्पष्ट करा.

४. वैदिक काळातील स्त्रीयांची परिस्थिती आणि वर्णव्यवस्था यावर माहिती द्या.

५. रामायण आणि महाभारत या महाकाव्यांचे महत्व स्पष्ट करा.

*हा क्युआर कोड स्कॅन केल्यानंतर, या प्रकरणाबद्दलचे मूळ छायाचित्रे, नकाशे, ग्रंथ, लेख वगैरे अभ्यासता येतील.*

❑❑❑

# घटक ३
# दुसरे नागरीकरण

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ प्रादेशिक राज्यांचा उदय – सोळा महाजनपदे

३.२.२ गौतम बुद्ध : त्यांची शिकवण

३.२.३ वर्धमान महावीर : त्यांची शिकवण

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा, संकल्पना व अर्थ

३.५ स्वय: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे:

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१. नागरिकरण शहरीकरणाची प्रक्रिया यांचा आढावा घेता येईल.

२. १६ महाजन पदांच्या उद्या बद्दल माहिती घेता येईल.

३. बौद्ध धर्माच्या उदयाची पार्श्वभूमी समजून घेता येईल.

४. जैन धर्माच्या उदयाची पार्श्वभूमी समजून घेता येईल.

५. बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान समजून घेता येईल.

६. जैन धर्माची शिकवण समजून घेता येईल.

## ३.१ प्रस्तावना:

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये इसवी सन पूर्व शतक हे क्रांतिकारी शतक म्हणून मानले जाते. या काळामध्ये धार्मिक पुनरुजीवनवादी आणि सुधारणावादी चळवळ सुरू होऊन बौद्ध आणि जैन धर्माचा उदय आणि विकास झाला. गौतम बुद्ध आणि भगवान महावीर यांच्या दैदीप्यमान व्यक्तिमत्त्वाने संपूर्ण जगाला परिवर्तनाचा नवीन विचार दिला. लोखंडाच्या वापरामुळे कृषी व्यवस्था स्थिर आणि भक्कम बनली होती. व्यवसाय आणि कारागरांचा विकास झालेला होता. व्यवहारामध्ये नाण्यांचा वापर नुकताच सुरू झालेला होता. सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडून आले होते. व्यापार उद्योगधंदाची भरभराट झाली, त्यामुळे अनेक नगरांचा उदय होऊन ती नगरे व्यापारी केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आली. त्या अनुषंगाने प्राचीन भारताचे दुसरे नागरिकरण आपणाला पहावयाचे आहे. पहिले नागरिकरण सिंधू संस्कृतीच्या काळामध्ये झाले. आणि सोळा महाजन पदांच्या निर्मितीने दुसरे नागरिकरण प्राचीन भारतामध्ये घडून आले.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ प्रादेशिक राज्यांचा उदय–सोळा महाजन पदांचा उदय:–

**प्रस्तावना :–** इसवी सन पूर्व सहाव्या शतकामध्ये आजच्या अफगाणिस्तानापासून ते महाराष्ट्रापर्यंत जी मोठी राज्ये पसरली होती तिलाच जनपद असे म्हणतात. ही जनपदे प्रदेश व लोकसंख्या या दृष्टीने मोठी होत गेली आणि ती महाजनपदे म्हणून प्रसिद्धीस आली या १६ महाजन पदांची माहिती बौद्ध व जैन ग्रंथातून मिळते तसेच परकीय प्रवाशांनी या महाजन पदाविषयी विश्‍वसनीय माहिती लिहून ठेवली आहे या सर्वच ग्रंथांमधून १६ महाजन पदांची संख्या ही समान आहे या महाजन पदांच्या मध्ये सतत परस्पर संघर्ष झाल्याने त्यातील काही महाजन पदे नष्ट झाली आणि मगध साम्राज्यामध्ये विलीन झाली.

*** महाजनपदांची वैशिष्ट्ये:–**

१. सर्व महाजन पदांची निर्मिती ही नद्यांच्या समृद्ध प्रदेशातच झाली.

२. ही महाजनपदे लहान मोठी होती यातील काही मोठी होती तर काही लहान होती.

३. काही जनपदांमध्ये राजेशाही होती तर काही जनपदांमध्ये गणराज्य पद्धती होती.

४. काही महाजन पदांचे स्वरूप हे संघराज्यात्मक होते.

५. या महाजनपदामध्ये अंतर्गत यादवी हा नित्याचा भाग होता.

६. महाजनपदामध्ये आपली सत्ता स्थिर करण्यासाठी वैवाहिक संबंध प्रस्थापित केले जात होते.

*** सोळा महाजन पदे:–**

१. काशी २. कोसल ३. अंग ४. मगध ५. वज्जी ६. मल्ल ७. चेदी ८. वत्स ९. कुरू १०. पांचाल ११. मत्स्य १२. सुरसेन १३. अश्मक १४. अवंती १५. गांधार १६. कंबोज

'जनपद' या शब्दाचा अक्षरशः अर्थ जणांचे पद जिथे स्थिरावतात ती जागा होय. ज्या भूमीत लोक कायम निवास करून शेती वा तत्सम व्यवसाय करून जीवन व्यतीत करतात ती जनपदे या नावाने ओळखली जाऊ लागली. महाजन पदांच्या राज्यकर्त्यामध्ये परस्पर संघर्ष होऊन त्यातील काही महाजनपदे नष्ट होऊन ती मगध साम्राज्यात विलीन झाली काही महाजनपदामध्ये लोकांचे प्रशासन असल्याने ती गणराज्य होती तीही मगध साम्राज्यविस्तारात नष्ट झाली. ही सर्व महाजनपदे राजकीय दृष्ट्या सार्वभौम होती व त्यांचे सर्व व्यवहार स्वतंत्रपणे चालत होते. ती १६ महाजन पदे खालील प्रमाणे आहेत.

**१. काशी:-** सुमारे तीनशे चौरस मैल विस्तार असलेले हे राज्य काशी नदीच्या तीरावर वसलेले होते. वाराणसी ही या राज्याची राजधानी होती काशी हे राज्य अत्यंत प्रभावशाली व वैभव संपन्न म्हणून ओळखले जाते. इसवी सन पूर्व ४५० मध्ये काशीचे राज्य उदयास आले त्या काळातील बौद्ध भिक्षुक कास्याच्या रंगाची कफनी वापरत असल्यामुळे कास्याची वस्त्र प्रावरणे परिधान केलेल्यांचा प्रदेश म्हणून काशी असे या राज्याला नाव मिळाले. काशी राज्यावर अनेक राजे येऊन गेले जातक कथांमध्ये काशीचा पाढा व सत्तेवर वेगवेगळ्या घराण्याने राज्य केल्याचा उल्लेख आढळतो. राजा दशरथ व राम आणि त्यांचे वंशज यांनीही या राज्यावरती राज्य केल्याची नोंद सापडते. २३ वे जैन तीर्थकर पार्श्वनाथ यांचे वडील अश्व सेन हे सुद्धा काशीचे सम्राट होते. गौतम बुद्धाने आपले पहिले प्रवचन काशी जवळील सारनाथ येथे दिले होते उपनिषदामध्ये आजाद शत्रू व धूर्त राष्ट्र यांचाही उल्लेख काशीचे राजे म्हणून करण्यात आला आहे काशी कोसल आणि मगध या राज्यांच्या मध्ये वारंवार संघर्ष होत असे. काशीने कोसल वर तर काही वेळेला कोसलने काशीवर अधिराज्य गाजवल्याचे उल्लेख सापडतात. गौतम बुद्धांच्या काळात काशीचे राजकीय अस्तित्व नष्ट होऊन प्रथम कोसल राज्यात व नंतर ते मगध राज्यात विलीन झाले.

**२. कोसल:-** आजच्या नेपाळ सरहद्दीवरील गोमती व सर्पिका नदीच्या किनाऱ्यावर वसलेले कोसल हे एक महत्त्वाचे राज्य होते. इसवी सन पूर्व सहाव्या शतकातील हे एक महत्त्वाचे महाजनपद होते. शरयू नदीने कोसल राज्याचे उत्तर कोसल व दक्षिण कोसल असे विभाजन केले होते. कपिल वस्तूचे शाक्य घराण्यातील वंशजाने या प्रदेशावर अधिराज्य स्थापन केल्याची माहिती सापडते. श्रावस्ती ही राजधानी असलेल्या राज्यात आयोध्या साकेत ही मोठी नगरे या राज्यात होती. शरयू नदीने या राज्याचे उत्तर कोसल व दक्षिण कोसल असे विभाजन केले होते इसवीसन पूर्व सहाव्या शतकापूर्वी येथे प्रसेनजित व शुद्धोधन यांनी कोसल व राज्य केल्याची माहिती मिळते. प्रसेनजीत हा संपूर्ण कोसलचा एकमेव राजा होता. मगध राज्याचा आजादशत्रू व कोसलचा प्रसेनजित यांच्या सतत संघर्ष होत असल्याने प्रसेनजिताने आजादशत्रूस कैद करून त्याच्याशी आपल्या बहिणीचा विवाह लावून दिला. प्रसेनजित गौतम बुद्धांच्या भेटीसाठी शासकीय राज्यात गेला असताना कोसलमध्ये क्रांती झाली व राज्यात गोंधळ माजला त्यामुळे मगध राज्यात कोसल विलीन झाले.

**३. अंग:-** मगधाच्या पूर्वेला असलेले अंग हे एक महत्त्वाचे महाजनपद. चंपा ही याची राजधानी होती. बुद्धकाळात भारतातील सहा महानगरांचा चंपा च्या राज्यात समावेश होता चंपा हे व्यापार व संपत्ती साठी प्रसिद्ध असलेले नगर होते दक्षिणेत अन्नान व कोचिन पर्यंत या नगराचे व्यापारी संबंध होते. गौतम बुद्धाने

काही काळ या राज्यांमध्ये वास्तव केल्याचा उल्लेख मिळतो. अंग राज्याचे कोशाबीशी मैत्रीचे संबंध होते. इसवी सन पूर्व सहाव्या शतकाच्या मध्यास मगधाने अंगराज्य जिंकून घेतले.

**४. मगध:–** सध्याच्या बिहार राज्यातील पाटणा व गया या जिल्ह्याच्या प्रदेशात मगध हे महाजन पद स्थिरावले होते. उत्तरेस गंगा नदी व पश्चिमेस सोन नदी दक्षिणेस विंध पर्वतरांगा आणि पूर्वेस चंपा नगर या मगदाच्या राज्याच्या सीमा होत्या. पुराना मध्ये मगदावरती 'कीकत' नावाची जमात राज्य करत होती असे म्हटले आहे. अथर्ववेद व यजुर्वेद या वेदांमध्ये मगदाचा उल्लेख सापडतो.

शिशुनाग वंशातील बिंबिसार हाच मगध देशाचा पहिला पराक्रमी राजा होता. त्याच्या वयाच्या पंधराव्या वर्षी मगध प्रदेशाची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. शेजारच्या राज्याशी सलोख्याचे धोरण अवलंबून बिंबिसारने त्यांना आपलेसे करून घेतले. कोसल, लिच्छवी, विदेह, व मद्र या देशांच्या राजकन्याशी वैवाहिक संबंध जोडले. त्यामुळे बिंबिसारचा प्रभाव वृद्धिंगत होऊन राज्य विस्तारास मार्ग मोकळा झाला. मगधाचे राज्य प्रभावशाली होण्यास बिंबिसारचा पराक्रम व सक्षम प्रशासन कारणीभूत ठरले. बिंबिसारणे बौद्ध धर्म प्रसारास उत्तेजन दिले त्याच्यानंतर इसवी सन पूर्व ४९३ मध्ये त्याचा मुलगा आझाद शत्रू हा मगधाच्या गादीवर आला त्याने आपल्या पित्यास तुरुंगात दाबून ठेवून अन्न पाण्याविना त्याला ठार मारले असेही म्हटले जाते. आझाद शत्रूने मगदावरती ३२ वर्षे राज्य केले त्याच्या काळातच गौतम बुद्ध व भगवान महावीर या दोन धर्म संस्थापकांचा मृत्यू झाला अशी नोंद मिळते आझाद शत्रू नंतर त्याचा पुत्र उदयभद्र हा सत्ताधीश झाला त्याने मगदाची राजधानी पाटलीपुत्र येथे वसवली उदयभद्र नंतर मगधाच्या सत्तेवरती नंदी वर्धन व महानंदी आले. त्यानंतर शिशुनाग घराण्याची सत्ता मगधावरती निर्माण झाली. त्यांनी मगधाची राजधानी पाटलीपुत्र हीच कायम केली. शिशु नाग घराण्याचा शेवट नंद घराण्यातील महापदमानंद या राजाने केला. तो जवळजवळ २८ वर्ष मगधावरती राज्य करीत होता. त्यानंतर त्याच्या आठ पुत्रांनी राज्य केले. आणि शेवटी इस. पूर्व ३२२ मध्ये चंद्रगुप्त मौर्याने नंद घराण्याचे मगधावरील अस्तित्व नष्ट केले व मगधावरती मौर्य घराणे स्थापन केले.

**५. वज्जी किंवा वृज्जी:–** गंगेच्या उत्तरेस नेपाळच्या टेकड्यापर्यंत विस्तारलेले हे आठ जमातींचे गणराज्य होते. त्यापैकी विदेह लिच्छेवी ज्ञातृक व वजी ही राज्ये महत्त्वाची होती. रामायणाच्या काळात विदेह राज्याला विशेष महत्त्व आले होते. लिच्छवी हे प्राचीन गणराज्य म्हणून प्रसिद्ध होते. भगवान महावीर यांचे घराणे असलेले ज्ञातृक राज्याची राजधानी कुंडलपूर वैशालीचे एक उपनगर होते. लिच्छवी मध्ये इसवी सन पूर्व सहाव्या शतकात क्षत्रियांची महत्त्वाची सत्ता होती. त्याने मगधा विरुद्ध संयुक्त आघाडी उभी केली व मगलाच्या बिंबिसार वरती हल्ला केला मात्र बिंबिसारणे लिच्छेवी कन्येशी विवाह करून समेट घडवून आणला. पुढे आझाद शत्रू ने ही मगधाविरुद्धची संयुक्त फळी मोडून काढली.

**६. मल्ल:–** क्षत्रिय जमातीचे प्राचीन गणराज्य पैकी मल्ल हे एक गणराज्य होते. त्याचे दोन भाग होते एका भागाची राजधानी कुशीनारा तर दुसऱ्याची पावा ही राजधानी होती. विदेह प्रमाणे मल्ल हे राजसत्ताक होते. मल्ल गणराज्य पाचशे ज्येष्ठ लोकांच्याकडून चालवले जात होते. गौतम बुद्धाच्या काळात पावा नगरास

अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. मल्लानी बौद्ध भिक्षू साठी संघ राम हे निवासस्थान बांधले होते आणि त्याचे उद्घाटन प्रत्यक्ष गौतम बुद्धांनी केले होते अशी नोंद सापडते. बुद्धांनी आपले मृत्यूपूर्वी अखेरचे भोजन पावा येथेच घेतले होते त्यानंतर ते आजारी पडले व कुशिनारा येथे त्यांचा मृत्यू झाला बौद्ध धर्मातील गौतम बुद्धाचे थोर शिष्य म्हणून मान्यता पावलेले आनंद, उपाली, अनुरुद्ध, देवदत्त, खंदसुमन ही विद्वान मंडळी मल्ल राज्यात राहत होती. मल्ल एक क्षत्रिय शूर व पराक्रमी होते गौतम बुद्धावर त्यांचे अलोट प्रेम होते बौद्ध व जैन वाङ्मयात मल्ल देशाचा अनेक ठिकाणी उल्लेख आला आहे.

**७. चेदी :-** सध्याच्या बुंदेलखंडाचा पूर्व भाग म्हणजे चेदी हे राज्य होय. शक्तीमती ही चेदी ची राजधानी होती. भगवान श्रीकृष्णाने ज्या शिशुपालाचा वध केला तो शिशुपाल चेदी राज्याचा होता. हाथीगुंफा शिलालेखात कलिंग प्रदेशात चेदी घराणे राज्य करीत होते असा उल्लेख सापडतो. कदाचित कलिंगचा काही भाव पुढे अशोकाने याच चेदी कडून जिंकला असावा.

**८. वत्स:-** यमुनेच्या तीरावर असलेल्या वत्स राज्याची राजधानी कोशिंबीर होती पुराणानुसार गंगेच्या महापुरात हस्तेनापूर वाहून गेल्याचा उल्लेख सापडतो बुद्धाचा समकालीन उदयन हा वत्स राजाचा पराक्रमी राजा होता. मगधाचा आजादशत्रू व अवंतीचा प्रद्योत यांच्याशी उदयानचे संबंध चांगले नव्हते. मैत्री करण्यासाठी उदयनने आजादशत्रूशी विवाह संबंध प्रस्थापित केले. अवंतीच्या प्रद्योत राजाला कोशाबी वरील अपयशी आक्रमणानंतर आपली कन्या उदयनला द्यावी लागली. उदयन हा अत्यंत पराक्रमी राजा असल्यामुळे तसेच त्याला शिकारीचा छंद असल्यामुळे राज्यात त्याने अनेक ठिकाणी राखीव जंगले ठेवली होती. प्रारंभी तो बौद्ध धर्म विरोधी होता, परंतु नंतर त्याने बौद्ध धर्म स्वीकारला व राज्य धर्म म्हणून बौद्ध धर्म जाहीर केला.

**९. कुरू:-** वैदिक काळात कुरुराज्याला फार महत्त्व होते मात्र बौद्धकाळात हे राज्य कमजोर झाले. सध्याच्या दिल्ली व मिरत या सभवाचा प्रदेश म्हणजे कुरुराज्य होय. कुरुची राजधानी इंद्रप्रस्थ होती. या राज्यात हस्तिनापूर, कुंडी, वारणावत अशी महत्त्वाची नगरी होती. कुरु राज्यात प्रारंभी राजसत्ताक पद्धती होती नंतर तेथे प्रजासत्ताक राजवट आली. महाभारतातील कौरव कुरुवंशीय होते. इसवी सन पूर्व सहाव्या शतकात कुरुचे महत्व कमी झाले.

**१०. पांचाल:-** पांचाल महाजन पदाचा उल्लेख जातक कथा जैन वांड:मय व संस्कृत ललित वाङ्मय यामध्ये सापडतो. सध्याचे बरेली, बदावून, फरुकाबाद, बुलंद शहर, अलिगड इत्यादींचा समावेश असलेले प्रदेश म्हणजे पांचाल महाजनपद होय. शहर पाच जमातींचे मिळून पांचाल महाजनपद बनले होते. या पाचही जमाती वैदिक काळातील होत्या. भगीरथी नदीमुळे पांचालचे उत्तर उत्तर पांचाल व दक्षिण पंचाल असे दोन विभाग झाले होते. प्राचीन भारतातील सांस्कृतिक व व्यापारी केंद्र म्हणून मान्यता पावलेले कनोज हे पांचाल राज्यातच होते. इसवीसन पूर्व पाचव्या शतकानंतर पांचालचे अस्तित्व नष्ट झाले.

**११. मत्स्य:-** सध्याच्या जयपूर भागलपूर प्रदेशात मत्स्य महाजन पद होते. या राज्याची राजधानी विराटपूर ही होती. पांडव अज्ञात वासात असताना ते येथेच राहिले होते. दक्षिणेला गुरु आणि पश्चिमेला

शूरसेन ही राज्य होती. या राज्याचा शेजारच्या चेदी राज्याने पराभव केला असावा व नंतर ते मगध साम्राज्यात विलीन झाले असावे.

**१२. शूरसेन/सूरसेन:–** या राज्याची राजधानी मथुरा होती. महाभारत व पुराण ग्रंथांमध्ये मथुरेवर यदु वंशाचे राज्य होते असे म्हटले जाते. शूरसेनाचा राजा बुद्धाच्या समकालीन होता. त्यामुळेच मथुरा व आसपासच्या प्रदेशात बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला होता. मथुरा हे कृष्ण भक्तीचे मोठे केंद्र असल्याचा उल्लेख केला आहे. मगध राजाने शूरसेनचा पराभव करून ते मगच साम्राज्यात विलीन करून टाकले.

**१३. अश्मक:–** बौद्ध वांड:मया हे राज्य गोदावरी नदीच्या काठावर वसलेले होते. पोतली ही त्याची राजधानी होती. या राज्यावर ईश्वाकू वंशीय लोक रज्य करीत होते. या राज्याने कलिंगशी युद्ध करून तो प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट केला. अश्मक व अवंती या दोन राज्यांमध्ये सतत संघर्ष होता .अखेर अवंतीच्या राजाने अश्मकचा पराभव करून ते राज्य आपल्या राज्यात जोडून घेतले.

**१४. अवंती:–** इसवी सन पूर्व सहाव्या शतकात अवंती महाजनपद अत्यंत प्रभावशाली होते. सध्याच्या नर्मदा नदीच्या खोऱ्यातील उज्जैनचा प्रदेश म्हणजे अवंती राज्य होय. विंध्य पर्वतामुळे अवंतीचे उत्तर व दक्षिण असे विभाजन झाले होते. उत्तर अवंतीची राजधानी उज्जैन तर दक्षिण अवंतीची राजधानी माहीशमती होती. व्यापारी केंद्र म्हणून व सांस्कृतिक केंद्र म्हणून अवंती महत्त्वाचे राज्य होते. इसवी सन पूर्व सहाव्या शतकात प्रद्योत हा राजा सत्तेवर होता. त्याचा पराक्रम व कौर्य पाहून मगदा वरील अजात शत्रूने राजगृह या राजधानी भोवती भक्कम तटबंदी बांधल्याचा उल्लेख सापडतो. प्रद्योत राजा हा बौद्ध धर्मीय असल्याने, अवंती बौद्ध धर्माचे प्रमुख केंद्र बनले. इसवी सन पूर्व चौथ्या शतकात अवंती च शेवटचा राजा नंदी वर्धन याचा मगध राजा शिशुनाग यांनी पराभव करून अवंती मगधास जोडून घेतले.

**१५. गांधार:–** आजच्या पेशावर व रावळपिंडी या पाकिस्तानातील जिल्ह्यांचा प्रदेश म्हणजे गांधार हे महाजन पद होय गांधारची राजधानी तक्षशिला होती तक्षशिला हे विद्येचे व व्यापाराचे मोठे केंद्र होते. तक्षाने तक्षशिला बसवले होते. गांधार देश लोकर उद्योगासाठी प्रसिद्ध होता. तक्षशिला विद्यापीठामुळे नावारूपाला आले होते. कौटिल्य या विद्वानाने या विद्यापीठातच अध्ययन केल्याचा उल्लेख मिळतो तर पाणीनी हा विद्वान या गांधार देशाचाच रहिवाशी होता. इसवी सन पूर्व सहाव्या शतकात पुष्कर सरीने गांधार देशावर कब्जा मिळवला. मात्र पुढे मगधाने ही राज्य आपल्या राज्यात विलीन करून घेतले.

**१६. कंबोज:–** गांधार राज्याच्या शेजारील राज्य म्हणजे कंबोजचे राज्य होय. आजच्या पाकिस्तान मधील हजारा व काफिरिस्थान जिल्हा म्हणजे कंबोजचे राज्य होय. कंबोज ची राजधानी राजपूर होती प्राचीन काळी विद्या व धर्म यांचे शिक्षण देणारे महत्त्वाचे ठिकाण म्हणून कंबोज ची ख्याती होती. अशोकाच्या शिलालेखात कंबोज चा उल्लेख आढळतो. महाभारतात ही कंबोजचा उल्लेख आढळतो. कंबोज मध्ये प्रथम राजसत्ताक पद्धती होती नंतर तेथे गणराज्य पद्धती अस्तित्वात आली.

**स्वय अध्ययनासाठी प्रश्न १**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. वत्स या महाजनपदाची राजधानी ............... होती.

अ) श्रावस्ती ब) कुशावती क) साकेत ड) कोशांबी

२. कोसलचा ............... राजा हा वर्धमान महावीर व गौतम बुद्धांच्या समकालीन होता.

अ) बिंबिसार ब) अजातशत्रू क) प्रसेनजीत ड) उदयन

३. ...............या वास्तुविशारदाने बिंबिसारचा राजवाडा बांधला.

अ) महापद्मानंद ब) महागोविंद क) जीवक ड) कौटिल्य

४. वर्धमान महावीरांची आई ची ............... राजकुमारी होती.

अ) मगध ब) कोसल क) लिच्छवी ड) वैशाली

५. आजच्या रावळपिंडी व पेशावरच्या परिसरात.. हे जनपद अस्तित्वात होते.

अ) शूरसेन ब) अवंती क) गांधार ड) कंबोज

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. काशी या महाजनपदाचे आधुनिक नांव काय?

२. सोळा महाजनपदांचा उदय कोणत्या शतकात झाला?

३. अंग राज्यातील दोन प्रसिद्ध शहरे कोणती?

४. गौतम बुद्धांनी कोणत्या महाजनपदाच्या कार्यपद्धतीची व सामर्थ्याची स्तुती केली आहे?

५. कुरू राज्याची राजधानी कोणती?

## ३.२.२ गौतम बुद्ध आणि त्यांची शिकवण:-

इस. पूर्व ६ वे शतक धार्मिक व सामाजिक क्षेत्रात क्रांतिकारी ठरले. या शतकात धार्मिक चळवळी मोठ्या प्रमाणात झाल्या. अनेक धार्मिक पंथ निर्माण झाले याच शतकात जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला. आणि त्याने समाजजीवनावरती खोल परिणाम झाला. या दोन धर्मांने ब्राह्मण धर्माला म्हणजेच वैदिक धर्माला जोरदार धक्का दिला. वैदिक धर्मातील यज्ञ परंपरा अंधश्रद्धा वर्णव्यवस्था इत्यादी गोष्टींना धक्का देऊन यामध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणले. बौद्ध धर्म संस्थापक गौतम बुद्ध यांना समाज परिवर्तन घडवून आणणारा युगपुरुष होण्याचा मान मिळाला.

**गौतम बुद्ध :-** इसवी सन पूर्व ५६६ मध्ये गौतम बुद्धाचा जन्म लुंबिनी नेपाळ येथे राजा शुद्धोधन व आई मायादेवी यांच्या पोटी शाक्य घराण्यात कपिलवस्तू येथे झाला. बुद्धाच्या जन्मानंतर सातव्या दिवशी आई मायादेवी चे निधन झाले त्यामुळे त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी मावशी प्रजापिता म्हणजेच गौतमी हिच्यावर आली गौतमचा सांभाळ अत्यंत सुरक्षित व काळजीपूर्वक करण्यात आला मात्र भविष्य वक्त्याने गौतम संन्याशी होण्याची शक्यता वर्तवल्याने सर्वजण काळजीत पडले त्याच्या विरागी व भाऊ स्वभावास आवर घालण्यासाठी राजा शुद्धोधनाने बालपणापासून त्यास राजवैभवात व दुःखाचा वाराही लागू नये अशा वातावरणात वाढवण्यात आले सिद्धार्थ गौतमाचा राजकन्या यशोधरा हिच्याशी विवाह झाला व पुढे त्यांना राहुल हा मुलगा झाला. मात्र तो मोठा झाल्यानंतर या जीवनातील व्याधीग्रस्त जीवन, तसेच लोकांच्या जीवनातील अनंत समस्या यांच्यावरती उपाय शोधण्यासाठी त्याने विचार मंथन सुरू केले यातच शाक्य आणि कोळी या जमातीमध्ये पाण्याच्या वाटपावरून झालेल्या संघर्षात गौतमाला संघाच्या निर्णयानुसार ग्रह त्याग करावा लागला व त्याने संन्यासाचा मार्ग स्वीकारला आणि तो आरण्याच्या दिशेने निघून गेला. यालाच गौतमाचे महाभिनिशक्रमण असे म्हणतात. ऐहिक दुःखावर उपाय शोधण्यासाठी तो सतत अरण्यामध्ये भटकत राहिला ज्ञानी साधूंची साधू पुरुषांची त्यांनी चर्चा केली व शेवटी वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी बोधगया येथील पिंपळवृक्षाखाली गौतमास ज्ञानप्राप्ती झाली त्याने तिथेच चार आठवडे ज्ञानसाधना केली व त्यास मनशांती लावली ज्या पिंपळवृक्षाखाली गौतमास ज्ञानप्राप्ती झाली त्याला बोधिवृक्ष असे संबोधण्यात येऊ लागले आणि बौद्ध धर्मीयांचे ते पवित्र स्थान बनले येथूनच गौतमास बुद्धत्व प्राप्त झाले तो बोधिसत्व झाला आणि आपणास मिळालेल्या ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तो फिरू लागला. सारनाथ येथे त्यांनी पहिले धम्मप्रवचन आपल्या पाच शिष्यास दिले. त्यानंतर त्याने राजे व्यापारी सामान्य लोक यांना आपल्या धर्माची तत्वे आचरण दैनंदिन वर्तन व्यवहार यासंबंधी प्रवचने दिली. सर्व देशभर भटकंती करत गौतम बुद्ध याने कोसलचा राजा प्रसेंजित मगधाचा राजा बिंबिसार आजाद शत्रू यांनाही बौद्ध धर्माकडे आकृष्ट केले व त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून प्रचार आणि प्रसार केला गौतम बुद्धाने आपल्या धम्माचा सुव्यवस्थितपणे प्रसार होण्यासाठी संघ स्थापन केला आणि संघामध्ये स्त्री पुरुष यांना सामावून घेतले देशभर धम्म प्रचार व प्रसार करीत असताना उत्तर प्रदेश मधील गोरखपूर जिल्ह्यातील कुशिनारा येथे इसवी सन पूर्व ४८६ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी गौतमाचे महानिर्वाण झाले.

**बौद्ध धर्माची तत्वे:-**

**१. चार आर्य सत्ये:-**

१. दुःख:- जग हे जन्म मृत्यू रोग निराशा यांनी भरलेले आहे. जग हे दुःखमय आहे

२. दुःख समुदाय:- दुःख हे समुदायाने येते आणि तृष्णा व लालसा यापासून दुःखाची निर्मिती होते.

३. दुःख निरोध:- कृष्णा व लालसा नष्ट केल्यास दुःख निरोध होतो म्हणजेच दुःख नाहीशी करता येते.

४. दुःख समुदाय निरोधाचा मार्गः- बुद्धाने दुःख नष्ट करण्याचा मार्ग सांगितलेला आहे नष्ट करण्याचे आठ मार्ग आहेत त्यास अष्टांग मार्ग म्हणतात.

**२. पंचशील मार्ग:-**

१. सत्य :-नेहमी सत्य बोलणे

२. अहिंसा :- कोणत्याही प्रकारची हिंसा करू नये

३. अस्तेय:- जी गोष्ट आपल्याजवळ नाही त्याची लालसा बाळगू नये.

४. अपरिग्रह:- आपणास लागेल तेवढीच संपत्ती बाळगणे इतर संपत्ती गरिबांना वाटून देणे

५. ब्रह्मचर्य :-शील व चारित्र्याचे पावित्र्य राखणे.

**३. अष्टांग मार्ग:-**

१. सम्यक दृष्टी:- चार आर्य सत्य जाणून घेणे.

२. सम्यक संकल्प:- चांगला व शुद्ध विचार जोपासणे स्वार्थ लोभ नष्ट करणे, ऐश्वर्य सत्ता कामोप यांची कृष्णा नष्ट करणे.

३. सम्यक वाक :- चांगले व योग्य बोलणे.

४. सम्यक कर्मांत:- चांगली व योग्य कृती करणे.

५. सम्यक अजीव:- चांगल्या मार्गाने उपजीविका करणे.

६. सम्यक व्यायाम:- चांगल्या विचारांची जोपासना करणे.

७. सम्यक स्मृती:- विवेकी राहून आत्मसंयमन करणे.

८. संमेक समाधी:- ध्यानस्थ होऊन एकाग्रता वाढवावी.

**बौद्ध धर्माची वैशिष्ट्ये:-**

१. चार आर्य सत्याचे पालन करणे.

२. जीवनामध्ये अष्टांग मार्गाचा स्वीकार करणे.

३. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्य या मार्गाने शिलाचे संवर्धन करणे.

४. जातीव्यवस्थेस विरोध करणे.

५. कर्म सिद्धांतावर पूर्ण विश्वास ठेवणे.

६. पराकुटीची ऐश्वर्या किंवा कठोर तप साधना या मार्गाचा अवलंब न करता मध्यम मार्गाचा अवलंब करून मोक्ष प्राप्ती मिळविणे.

७. नैतिक आचरणावर भर देणे.

८. देव ही संकल्पना अमान्य करणे.

९. अंतिम उद्दिष्ट निर्माण प्राप्ती याच जीवनात शक्य आहे यावर विश्वास ठेवणे.

१०. अहिंसेवर भर देणे

११. यज्ञ परंपरा नाकारणे.

१२. मनुष्य प्राणी अथवा कोणत्याही प्राण्याचा यज्ञात बळी देऊ नये

१३. ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व अमान्य करणे.

**※ बौद्ध धर्म प्रसाराची कारणे:-**

**१. गौतम बुद्धाचे व्यक्तिमत्व:-**

गौतम बुद्धाची व्यक्तिमत्व अत्यंत आकर्षक होते जगातील सर्व सुखे पायाशी लोळण घेत असताना त्यांनी जगातील मानवाच्या कल्याणासाठी संन्यासाचा मार्ग स्वीकारला घोर तपश्चर्या केली आणि जगातील दुःखावर त्यांनी मार्ग शोधला त्यामुळे लोक गौतम बुद्धाकडे आकृष्ट झाले.

**२. साधी शिकवण:-**

बुद्धाची शिकवण अत्यंत साधी व लोकभाषेत होती सामान्य लोकांना समजेल अशा भाषेमध्ये त्यांनी आपली तत्त्वे लोकांना सांगितली. वर्तन व्यवहार जीवन चांगले कसे जगावे चांगली करणे केल्यानंतर चांगले फळ मिळते असा साधा उपदेश त्यांनी केला सत्य, अहिंसा,अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य, प्रज्ञा- शील- करुणा यासारख्या सोप्या शब्दात त्यांनी लोकांना आपलेसे केले.

**३. समानतेचे तत्व:-**

गौतम बुद्धाने आपल्या धम्मात सर्वांना समानतेचे तत्व लागू केले. स्त्री पुरुष असा भेदभाव न करता त्याच्या धम्मात सर्वांना सहज प्रवेश मिळत असे जातिभेद याला त्यांनी मूठ माती दिल्यामुळे कोणत्याही जातीच्या लोकांना बुद्धाच्या धम्मामध्ये प्रवेश होता.

**४. लोक भाषेचा स्वीकार:-**

बुद्धाने आपल्या धम्माच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी लोकांच्या बोलीभाषेचा वापर केला. पाली या प्राकृत भाषेचा त्यांनी वापर केला व ही त्या काळातील लोकभाषा होती बुद्धाने आपले तत्त्वज्ञान पाली भाषेत लोकांना सहज समजेल असे सांगितल्यामुळे लोक बुद्धाकडे व त्याच्या धम्माकडे आकृष्ट झाले.

**५. पुरोहित वर्गाचे प्राबल्य नष्ट केले :-**

वैदिक धर्मातील पुरोहितांचे प्राबल्य मोठ्या प्रमाणावर जनमानसावर होते. बुद्धाने आपल्या धम्मात सर्वसामान्य ना मोक्षप्राप्ती सहज सोपा मार्ग सांगितल्यामुळे व पुरोहित वर्गाचे प्राबल्य नष्ट केल्यामुळे सामान्य जनता बुद्धाकडे आकर्षित झाली.

## ६. राजाश्रय:–

तत्कालीन राजानी बौद्ध धर्माला राजश्रय दिल्यामुळे हा धर्म झपाट्याने वाढला. राजा शुदोधन, प्रसेंजित, आजादशत्रू, सम्राट अशोक, कनिष्क, हर्षवर्धन या राजानी बौद्ध धर्मास राजाश्रय दिला.

## ७. बौद्ध संघ:–

गौतम बुद्धाने धम्म प्रसार व प्रचारासाठी संघ निर्माण केला.त्यामध्ये हजारो भिक्षु व भिक्षुनी यांना सामावून घेऊन त्यांची नियमावली तयार केली व धम्माच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी त्यांना जगाच्या कानाकोपऱ्यात पाठविले. सम्राट अशोक यांनी आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना जपान व श्रीलंका येथे पाठविल्याचा उल्लेख आहे.

## ८. बौद्ध धर्मातील लवचिकता:–

काळाप्रमाणे बदलण्याची लवचिकता बौद्ध धर्मामध्ये होती स्थानिक गरजेनुसार बुद्धाने आपली तत्त्वे व स्वरूप बदलल्याचे दिसते. वैदिक धर्मातील दोष लोकांना दाखवून दिले व कमी खर्चामध्ये किंबहुना कोणताही खर्च न होता आपण मोक्षाकडे जाता येते हे तत्त्वज्ञान बुद्धाने लोकांना सांगितले. त्यामुळे बौद्ध धर्म लोकप्रिय बनला.

## बौद्ध धर्माचे योगदान:–

### १. सोपे तत्त्वज्ञान

गौतम बुद्धाने आपल्या धम्माचे तत्त्वज्ञान अत्यंत सोप्या भाषेत लोकांना सांगितले. कर्मकांड, यज्ञीयसंस्था, पुरोहित शाही या वैदिक धर्मातील परंपरेवर आसूड ओढले. आणि साधी सोपी समताप्रधान मानवतावादी विचार प्रणाली असणारे तत्वज्ञान बुद्धांनी लोकांना दिले.

### २. उच्च नैतिकता व अहिंसेची शिकवण:–

बौद्ध धर्माने आपल्या अनुयायांना उच्च आदर्श व नैतिक आचरण निश्चित करून दिले त्यामुळे समाजातील चारित्र्यसंवर्धनाला मोठी मदत झाली हिंसा अमानुषता या गोष्टींना विरोध केला त्यामुळे प्राणीमात्रांचे रक्षण झाले व त्यांचे संवर्धन केले जाऊ लागले.

### ३. समानतेची शिकवण:–

बुद्धाने आपल्या धम्मा समता व समानता या तत्त्वावर भर दिला गेला. स्त्री पुरुष असा कोणताही भेदभाव न करता कोणताही जातीभेद श्रेष्ठ कनिष्ठ असाही भेदभाव न करता सर्वांना या धम्मामध्ये प्रवेश दिला व जीवनामध्ये मोक्षासाठी समतेची व समानतेची शिकवण दिली. यामुळे कोणालाही निर्वाणाप्रत जाण्याचा अधिकार पहिल्यांदा बुद्धाने सांगितला.

**४. भारतीय संस्कृतीचा प्रसार:-**

बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार भारताच्या कानाकोपऱ्यामध्ये जसा झाला. तसा तो भारताच्या बाहेर चीन जपान श्रीलंका जावा थायलंड म्यानमार इत्यादी देशांमध्ये झाला. बौद्ध भिक्षु भिक्षुनी यांनी बौद्ध तत्त्वज्ञान साहित्य शिल्पकला नृत्यकला याचा प्रसार बाहेरच्या देशामध्ये केला. त्यामुळे भारतीय संस्कृती ही जगासमोर आली.

**५. स्थापत्यशास्त्र व शिल्पकला इत्यादी क्षेत्रात प्रगती:-**

बौद्ध धर्माने स्थापत्यशास्त्र व शिल्पकला या क्षेत्रात भरीव कामगिरी केली. थोडक्यात मोठी क्रांति केली. बौद्ध धर्माने स्तूप, विहार, मठ, स्तंभ, चैत्यग्रहे यांच्या अप्रतिम कलाकृती भारतामध्ये निर्माण केल्या, बुद्धाच्या हजारो मूर्ती तयार केल्या. अजंठा, वेरूळ, सांची, सारनाथ या ठिकाणी शिल्पकला व चित्रकला उदयास आली. स्थापत्य कलेमध्ये मोठ्या प्रमाणात भर पडली. त्याचबरोबर ग्रीक व बौद्ध कलेच्या संगमातून गांधारकला उदयास आली.

**६. शिक्षण व साहित्य क्षेत्रात प्रगती:-**

या धर्माने मोठ्या प्रमाणात बौद्ध मठांची स्थापना केली त्या मठामध्ये बौद्ध धर्माची शिकवण दिली गेली. तेथेच शिक्षणाची सोय झाली. हे मठ पुढील काळात विद्या केंद्रे म्हणून उदयास आली. यातूनच नालंदा, तक्षशिला विक्रमशीला, वल्लभी ही बौद्ध विद्यापीठे उदयास आली. बौद्ध धर्माने लोकांना समजेल अशा बोली भाषेत धर्माचा प्रचार केला प्रसार केला आणि साहित्याची निर्मिती झाली.

**बौद्ध धर्मग्रंथ:-**

बौद्ध धर्मग्रंथांना त्रिपिटके म्हणतात. सूक्तपिटक,विनयपिटक अधिधम्मपिटक हे तीन पीटके याशिवाय सिहली भाषेतील महावंश, दीपवंश व दिव्यावदान हे ग्रंथ बौद्ध धर्माबद्दल माहिती देतात.

**बौद्ध धर्मातील पंथ**

**१. हिनयान:-** हा पंथ दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला. हा पंत सनातनी करमट संन्यासी मार्ग आहे गौतम बुद्धांच्या आचाराप्रमाणे वागणारा हा पंथ. बुद्धांच्या प्रतीकांची पूजा हिनयान पंथात केली जाते.

**२. महायान:-** हा पंथ उदारमतवादी आहे या पंथामधील लोक मूर्तीपूजा करतात बुद्धाची मूर्ती पूजा या पंथातील लोक करतात.

**बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची कारणे:-**

इ.स. पूर्व ३ ऱ्या शतकापासून बौद्ध धर्माच्या ऱ्हासाला सुरुवात झाली त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. राजाश्रयाचा अभाव:-**

गौतम बुद्ध जोपर्यंत जिवंत होते तोपर्यंत किंबहुना त्यांच्या निर्वाणानंतर काही वर्ष बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला. मात्र सम्राट हर्षवर्धनानंतर शुंग, वाकाटक, गुप्त राजाने पुन्हा एकदा वैदिक धर्माला उत्तेजन दिले. त्याचे पुनरुज्जीवन केले. त्यामुळे बौद्ध धर्माचा राजाश्रय संपुष्टात आला व त्याची पीछेहाट झाली.

**२. वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन:-**

वैदिक धर्मातील कर्मकांड, दोष, चुका यांचे पुढे शंकाराचार्य यांनी व कुमारील भट्ट यांनी दुरुस्त केल्या व वैदिक धर्माला श्रेष्ठ बनविले बौद्ध धर्म व पंथावर त्यांनी टीका केली बौद्ध धर्मातील दोष स्थळावर त्यांनी बोट ठेवले परिणामी हिंदू धर्माचे म्हणजेच वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन झाले व बौद्ध धर्म मागे पडला.

**३. बौद्ध धर्मातील मतभेद व पंथ:-**

गौतम बुद्धाच्या निर्वाणानंतर बौद्ध भिक्षू मध्ये वैचारिक मतभेद निर्माण झाले त्यातून वाद विवाद निर्माण झाले आणि त्यामुळे बौद्ध धर्म प्रचार प्रसाराकडे दुर्लक्ष झाले यातूनच ही नियम व महायान असे दोन पंथ निर्माण झाले शेवटी यातूनच बौद्ध धर्माचा ऱ्हास झाला.४.

**४. परकीय आक्रमणे:**

भारताची लूट करण्याच्या उद्देशाने आलेल्या फुल आक्रमणांनी आणि इस्लामी आक्रमणांनी अनेक बौद्ध विहार स्तूप व विद्यापीठे यांचा विध्वंस केला लुटा लूट केली त्यामध्ये शेकडो भिक्षू मारले गेले बौद्ध संघ व विहार यांच्या नाशाबरोबर बौद्ध धर्माची इमारत कोसळली.

वरील सर्व कारणां मुळे इसवी सन १२ व्या शतकापर्यंत बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास झाला.

**स्वंय अध्ययनासाठी प्रश्न २**

अ. योग्य पर्याय निवडा

१. गौतम बुद्धांचा जन्म इसवी सन पूर्व ५६६ मध्ये कपिल वस्तू नगराजवळ...............येथे झाला.

अ. मगध　　ब. पावा　　३. लुंबिनी　　४. श्रवणबेळगोळ

२. गौतम बुद्धांनी ज्ञानप्राप्तीनंतर पहिले प्रवचन ............... या ठिकाणी दिले.

अ. सारनाथ　　ब. गया　　क. काशी　　ड. वैशाली

३. बौद्ध धर्म ग्रंथांना ...............म्हणतात.

अ. सूक्तपिटक　　ब. विनयपिटक　　क. अधिधम्मपिटक　　ड. हे सर्व

४. बौद्ध धर्मग्रंथ...............या भाषेतून लिहिले गेले

अ. पाली　　ब. अर्धमागधी　　क. संस्कृत　　ड. मराठी

५. गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती............... येथे झाली.

अ. गया　　ब. लुंबिनी　　क. नेपाळ　　ड. सारनाथ

### ३.२.३ वर्धमान महावीर आणि त्यांची शिकवण:–

जैन धर्माचे २४ वे तीर्थकर म्हणून वर्धमान महावीर ओळखले जातात. त्यांचा जन्म इसवी सन पूर्व ५९९ मध्ये वैशाली नगरच्या कुंदग्राम येथे झाला त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशलादेवी सिद्धार्थ हे वृज्जी राज्याचे प्रधान होते तर आई वैशालीचा राजा चेटक यांची बहीण होती. महावीरांना राजघराण्याचा वारसा लाभला होता. त्यांचीही ऐहिक सुखामध्ये मन रमेनाशे झाले. त्यामुळे त्यांनी आपले वडील बंधू नंदी वर्धन यांची संमती घेऊन संन्यास धर्म स्वीकारला. महावीराने ज्ञानप्राप्तीसाठी बारा वर्षे घोर तपश्चर्या केली इंद्रिय दमनाचे कष्ट सहन केले शेवटी त्यांना ज्ञानप्राप्ती झाली त्यांना महावीर असे संबोधण्यात येऊ लागले व त्यांनी स्थापन केलेल्या धर्मास जैन असे नाव मिळाले संपूर्ण देशभर आपल्या धर्माचा प्रचार आणि प्रसार महावीरांनी केला शेवटी वयाच्या ७२ व्या वर्षी पाटण्या नजीक पावा या ठिकाणी इसवी सन पूर्व ५२७ मध्ये त्यांचे निर्वाण झाले.

**महावीरांची शिकवण: जैन धर्माची मूलतत्वे:–**

१. जैन धर्मास वेद, वैदिक, यज्ञ परंपरा, विश्वनिर्माता परमेश्वर मान्य नाही.

२. जैन धर्म देवाच्या अस्तित्व मानत नाही.

३. कार्यकारण भावामुळे विश्व निर्मिती झाली आहे.

४. देवदयेवर मोक्ष अवलंबून नसून त्याची प्राप्ती मनुष्याने इंद्रियावर ताबा मिळवल्यानंतर होते.

५. जीव आत्मा यामुळे जगाची निर्मिती झाली आहे. जीव नष्ट होतो तर आत्मा अमर असतो

६. जैन धर्म कर्मावर विश्वास ठेवतो पूर्वजन्म व पुनर्जन्म करमाशी संलग्न असतो.

७. कर्मापासून जीव स्वतंत्र झाला की तो मोक्ष परत जातो.

८. जैन धर्म समानता मानतो जन्मावरून जात ठरत नसून ती कर्मामुळे ठरते.

९. जीवाचे अंतिम उद्दिष्ट जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होऊन निर्वाणा प्रत जाणे हेच आहे.

१०. जैन धर्माचे सार वा केंद्रबिंदू आत्मा हाच आहे.

**पंचशील:–**

१. सत्य २. अहिंसा ३. अस्तेय ४. अपरिग्रह ५. ब्रह्मचर्य

**त्रिरत्ने :–**

१. सम्यक दर्शन २. सम्यक ज्ञान ३. सम्यक चरित्र

**केवल ज्ञान प्राप्तीची पाच साधने:–**

१. मतीज्ञान २. श्रुतीज्ञान ३. अविधीज्ञान ४. मन पर्यायज्ञान ५. केवलज्ञान

**साधूसाठी पाच नैतिक बंधने:-**

१. असत्यापासन दूर राहणे

२. हिंसेपासून दूर राहणे

३. चोरी पसून दूर राहणे

४. विषयापासून दूर राहणे

५. लोभा पासून दूर राहणे

**आत्मोद्धारासाठी सात प्रतिज्ञा:-**

१. भटकणाऱ्या मनास आवर घालणे.

२. पाप कृत्यापासून दूर राहणे.

३. उपभोग्य वस्तूवर निर्बंध घालणे

४. दैनंदिन कार्यक्रमाची व्याप्ती कमी करणे.

५. किमान वस्तू जवळ घेऊन निवांत स्थळी समाधी लावणे.

६. धर्मप्रवण जीवन जगण्यासाठी महिन्यातून चार दिवस उपास तपास करून देह क्लेश करून घेणे.

७. पवित्र व शुद्ध चारित्र्यसंपन्न साधू बरोबर अन्नग्रहण करणे

**जैन धर्म पंथ:-**

जैन धर्मात दोन पंच निर्माण झाले. याशिवाय अनेक उपपंथ ही आहेत त्यातील श्वेतांबर व दिगंबर हे दोन पंथ महत्त्वाचे आहेत. इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकात जैन धर्मात पंथ निर्माण झाले.

**१. दिगंबर पंथ:-**

दिगंबर म्हणजे आकाश हे ज्यांचे वस्त्र आहे हा सनातन पंथ असून महावीरांना थोर आत्मा व पुरुष मानणारे लोक या पंथात आहेत या पंथाच्या अनुयायांना मूर्ती पूजा मान्य नाही. तसेच ते वस्त्र वापरत नाहीत. चिंतन मनान ध्यान धारणा जप तप या अनुयायांना आवडते. लोकभाषा म्हणून अर्धमागदी भाषेचा वापर करतात केवल ज्ञानच अंतिम ज्ञान मानतात या पंथाचा प्रामुख्याने दक्षिणेत प्रसार झाला.

**२. श्वेतांबर पंथ:-**

श्वेतांबर म्हणजे शुभ्र वस्त्रधारी होय. हा पंथ परिस्थितीनुसार बदलणारा सुधारणावादी पंथ होय. हे अनुयायी ईश्वरास मानतात मूर्ती पूजा करतात. स्त्रीला सुद्धा केवलप्राप्ती होऊ शकते तसेच मुक्ततेसाठी वस्त्र वापरावयाचे नाही हे या अनुयायांना मान्य नाही. जेवणासाठी उपकरणे व पात्रे वापरतात. मूर्तीला वस्त्रे

घालतात. पूजेच्या वेळी मूर्तीला मिठाईचा नैवेद्य दाखवतात. यांचे बहुसंख्य ग्रंथ अर्ध मागणी भाषेत आहेत. याचाही प्रचार दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात झाला.

**जैन धर्म ग्रंथ:–**

जैन धर्मात जे प्रमुख ग्रंथ आहेत त्यांना आगम असे म्हटले जाते. आगाम म्हणजे महावीरांनी उपदेश केलेल्या प्रवचनातून जैन विचार एकत्रित केलेली ग्रंथरचना यातून जैन धर्म तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली जैन धर्माची मूळ धार्मिक ग्रंथात बारा भाग आहेत अनेक विद्वान साहित्यिक, आचार्य यांनी ग्रंथांची रचना केली आहे. हेमचंद्र सुरी यांचा परिशिष्ट पर्व हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत.

**जैन धर्माचे योगदान:–** जैन धर्माने भारतीय समाजाला सत्य अहिंसा याचबरोबर समता समानता ही तत्वे दिली त्याचबरोबर भारतीय समाजाला खालील योगदान मिळाले आहे

१. नैतिक आचरण व आयुष्याचा सिद्धांत

२. वैदिक धर्मास विरोध

३. सामाजिक समतेचा प्रसार

४. कला, स्थापत्य व साहित्य क्षेत्रातील योगदान

**जैन धर्माच्या ऱ्हासाची कारणे:–**

१. त्यागी, निरपेक्ष धर्म प्रसारकांची संख्या घटली.

२. राजाश्रय संपुष्टात आला.

३. जैन धर्मातील अनेक पंथामुळे समाज विभागला गेला.

४. जैन धर्मामध्ये जातीव्यवस्था याला थारा मिळाला त्यामुळे या धर्माचा ऱ्हास झाला

५. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन झाले.

**स्वयध्यनासाठी प्रश्न–३**

अ) योग्य पर्याय निवडा

१. भारताच्या इतिहासात ............... हे धार्मिक क्रांतीचे शतक म्हणून ओळखले जाते.

अ. इ.स पूर्व चौथे शतक ब. इ.स. पूर्व पाचवे शतक

क. इस पूर्व सहावे शतक ड. इ.स पूर्व तिसरे शतक

२. ...............यांना जैन धर्माचे संस्थापक मानतात

अ. महावीर ब. वृषभनाथ क. गोशाल ड. पार्श्वनाथ

३. जैन धर्मातील प्रमुख ग्रंथांना ...............असे म्हटले जाते

अ. संगम. ब. अगम. क प्रवचने. ड. उपदेश

४. महावीरांचा जन्म............... येथील नगरात झाला

अ. कुंदग्राम ब. वैशाली क. मगध ड. अवंती

५. जैन धर्मातील २३ वे तीर्थकर ............. होत.

अ. महावीर ब. अजित नाथ क. पार्श्वनाथ ड. वृषभ देव

## ३.३ सारांश

इ.स.पू. सहावे शतक हे प्राचीन भारताच्या इतिहासात युगप्रवर्तक घडले. याच काळात धार्मिक क्रांती घडून आली. लोखंड या धातूचा शोध व त्यामुळे कृषी व्यवसायास झालेली प्रगती हा अमुलाग्र बदल घडून आला. उत्पादनवाढीमुळे व्यापाराची आवश्यकता निर्माण होऊन यातून नागरी समाजाचा उदय झाला. व्यापारी केंद्रे अस्तित्वात आली. अयोध्या, कपिलवस्तू, श्रावस्ती, कुशीनगर, वैशाली, पाटलीमुत्र, चंपा ही त्या काळात भरभराटीस अ ालेली महानगरे होती. प्रामुख्याने १६ मराठी राज्ये (महाजनपदे) अस्तित्वात आली. याच कालखंडात संपूर्ण मानव जातीला कल्याणकारी मार्गावर नेणाऱ्या जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला. या प्रस्थापित धर्माविरुद्ध (वैदिक) केलेला एक प्रकारचा उठावच होता. या धर्मानी अहिंसा मार्गाने केलेले अनुकरण त्यामुळे सर्वत्र शांतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक लोकांनी हा धर्म स्विकारलेला, प्राचीन तिर्थकारांची परंपरा असलेल्या जैन धर्माची वाढ ही मर्यादितच राहिली. बौद्ध धर्माला मात्र लोकाश्रय व राजाश्रय मिळाल्यामुळे गौतम बुद्धांनी प्रभावी प्रचार यंत्रणा व व्यवहारवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार केल्याने बौद्ध धर्म हा भारताबाहेर मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाला. जैन व बौद्ध धर्माने भारतीय समाजाच्या सामाजिक, धार्मिक साहित्य, स्थापत्य व कला क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे महान कार्य केले.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ:

१. महाजन पदे- प्रादेशिक राज्ये

२. त्रिपिटक- गौतम बुद्धांच्या वचनाचे तीन भाग

३. अष्टांग मार्ग-दुःख दूर करण्याचा मार्ग

४. महापरिनिर्वाण- महान व्यक्तीचा मृत्यू

५. सम्यक- उत्कृष्ट चांगले

## ३.५ स्वय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे

अ. १. कोशांबी २. प्रसेंजित. ३. महागोविंद ४. वैशाली ५. गांधार

ब. १. बनारस २. इसवी सन पूर्व सहावे शतक ३. अश्वपूर

४. वजी किंवा वृज्जी ५. इंद्रप्रस्थ

स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे

अ. १. लुंबिनी २. सारनाथ ३. हे सर्व ४. पाली ५. गया

स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे

अ. १. इसवी सन पूर्व सहाव्या शतक २. महावीर ३. अगम

४. कुंदग्राम ५. महावीर

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ. टिपा लिहा

१. महाजन पदे
२. गौतम बुद्ध
३. वर्धमान महावीर
४. जैन तत्त्वज्ञान
५. बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची कारणे
६. बौद्ध धर्माच्या उदयाची कारणे
७. दुसरे नागरिकरण

ब. दीर्घोत्तरी प्रश्न

१. दुसऱ्या नागरीकरणाची कारणे सांगा
२. १६ महाजन पदाची माहिती सांगा
३. गौतम बुद्धांचे जीवन व त्यांची शिकवण यावर निबंध लिहा
४. वर्धमान महावीर यांचे जीवन व तत्त्वज्ञान सांगा
५. बौद्ध धर्माचा उदय विकास कसा झाला ते सांगा

६. बौद्ध धर्माचे भारताला कोणते योगदान आहे ते स्पष्ट करा

७. जैन धर्माचे भारताला कोणते योगदान आहे ते स्पष्ट करा

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. अ.रा. कुलकर्णी – प्राचीन भारत संस्कृती आणि इतिहास (१९६२)

२. या.ना. कदम – प्राचीन भारताचा इतिहास (२०१२)

३. रोमिला थापर अर्ली इंडिया (मराठी अनुवाद)


❑❑❑

## घटक ४
# मौर्य साम्राज्य

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ चंद्रगुप्त मौर्य आणि कौटिल्य

    ४.२.२ अशोकाचा धर्म

    ४.२.३ मौर्यांचे प्रशासन

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावसाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

१. चंद्रगुप्त मौर्याची राजवट व साम्राज्य विस्तार अभ्यासता येईल.

२. कौटिल्य विषयी माहिती मिळेल.

३. सम्राट अशोकाची कारकीर्द जाणून घेता येईल.

४. सम्राट अशोकाचा धर्म व धर्म प्रसार याचा अभ्यास करता येईल.

५. मौर्यकालीन केंद्रीय प्रशासन विविध खाती प्रांतीय प्रशासन जिल्हा प्रशासन नगर प्रशासन ग्राम प्रशासन व्यवस्था अभ्यासता येईल.

## ४.१ प्रस्तावना

भारताच्या प्राचीन इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्याचा उल्लेख होतो. मौर्य साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य हा भारताचा पहिला ऐतिहासिक सम्राट होय. मौर्य साम्राज्य निर्मितीपूर्वी च्या काळात भारतीय भूप्रदेश राजकीय दृष्ट्या छोट्या छोट्या राज्यात प्रदेशात विभागला होता. अशा राजकीय दृष्ट्या विभागलेल्या विविध भारतीय प्रदेशावर प्रथम मौर्य घराण्यातील कार्यक्षम सम्राटानी आपल्या एकछत्री अमलाखाली आणण्याचे कार्य केले, ही घटना भारताच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना होय. चंद्रगुप्त, बिंदुसार सम्राट अशोक या मौर्य सम्राटांनी एक सामर्थ्यशाली कार्यक्षम, संपन्न, प्रबळ राज्याची निर्मिती केली. प्रजाहित समोर ठेवून निर्माण केलेली राज्यव्यवस्था, कार्यक्षम प्रशासन व्यवस्था, न्यायव्यवस्था, समृद्ध अर्थव्यवस्था अशा विविध बाबीतून मौर्य साम्राज्याची झालेली भरभराट वैशिष्ट्यपूर्ण व आदर्शवत होती. चंद्रगुप्त मौर्याचे उत्तुंग साम्राज्य निर्माण करण्यामध्ये कौटिल्याची भूमिका महत्त्वपूर्ण होती. कौटिल्याच्या अर्थशास्त्र या संस्कृत ग्रंथात मौर्य काळाची माहिती मिळते.मौर्यानी प्रथमच राजकीय ऐक्य निर्माण करून संपूर्ण देशात एकछत्री साम्राज्य निर्माण केले.

अशोक हा विशाल साम्राज्याचा सम्राट होता. तो कुशल सेनापती होता. सत्तेच्या व वैभवाच्या अत्युच्च शिखरावर असताना त्यांनी आपल्या महत्त्वकांक्षेला आळा घातला आणि धर्माचे राज्य स्थापन केले. लोककल्याणकारी राज्याचा आदर्श घालून दिला. अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारकरीता महान कार्य केले. खऱ्या अर्थाने बौद्ध धर्माच्या उन्नतीचे श्रेय अशोकालाच आहे. अशोकाच्या राजाश्रयामुळे व प्रयत्नामुळे बौद्ध धर्माला जगातील प्रमुख धर्मामध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे. बौद्ध धर्माच्या प्रसारकरीता विविध कार्य त्यांनी केली.

साम्राज्याला स्थैर्य देण्याकरता बळकट शिस्तबद्ध प्रशासन व्यवस्था चंद्रगुप्ताने आपला प्रधानमंत्री आर्य चाणक्य उर्फ कौटिल्य यांच्या सल्ल्याने उभी केली. बिंदुसार व अशोक यांनी ही प्रशासन व्यवस्था तशीच चालू ठेवली. सम्राट अशोकाने चंद्रगुप्ताच्या प्रशासन व्यवस्थेला जोडून धर्मविभाग चालू केला. मौर्य प्रशासन व्यवस्था ही मूलतः चंद्रगुप्ताचीच प्रशासन व्यवस्था होती असे म्हटले पाहिजे. मेग्यास्थेनीसचा इंडिका व कौटिल्याचे अर्थशास्त्र यावरून तत्कालीन राज्य व्यवस्थेचे चांगले ज्ञान होते. मौर्य साम्राज्याच्या स्थापनेनंतर देशात सुख शांती व समृद्धी आणि सुव्यवस्था नांदू लागली होती. कला समृद्धतेसाठी असाच काळ पोषक ठरत असतो.

मौर्य साम्राज्य काळातील वाङ्मय, धर्म, कला इत्यादी विविध संस्कृतीक अंगाची वाढ ही गौरवपूर्ण अशीच होती. मौर्य घराण्यातील सम्राटानी आपल्या उत्कृष्ट अशा वैभवशाली कार्यक्षम कारकीर्दीचा ठसा उमटविला. प्रजाहितदक्ष सम्राटांनी भारतातच नव्हे भारताबाहेरी शांततामय वर्गाचा एक नवीन आदर्श निर्माण करून भारताची कीर्ती जगभर पसरविली.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ चंद्रगुप्त मौर्य आणि कौटिल्य

चंद्रगुप्ताने एका संपन्न प्रबळ राज्याची निर्मिती केली. मौर्यकाळात भारताच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशावर प्रथमच एकछत्री साम्राज्याची स्थापना होऊन राजकीय ऐक्य निर्माण झाले. मौर्य कालखंडाची सर्वांगीण माहिती असणारी अनेक संदर्भ साधने उपलब्ध आहेत. आर्य चाणक्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ, मेग्यास्थेनिसचा इंडिका ग्रंथ, सम्राट अशोकाचे शिलालेख, बौद्ध धर्म ग्रंथ, विशाखादत्ताचे मुद्राराक्षस नाटक, इत्यादी साधने आहेत.

चंद्रगुप्त मौर्याने मौर्य सत्तेचा पाया घातला आणि आपल्या कारकीर्दीत मगधाचे नंद घराणे व ग्रीक क्षत्रपांचा पराभव करून मौर्य साम्राज्याचा विस्तार अफगाणिस्तान पासून ते दक्षिणेत कावेरी नदी व पूर्वेकडे बंगालपर्यंत केला. एवढ्या मोठ्या राज्यविस्ताराची नीट घडी बसवण्यासाठी चंद्रगुप्ताने सुसंघटित अशी प्रशासन व्यवस्था उभारली. मौर्यांची अशी प्रशासन व्यवस्था प्रथमच उभारली गेली होती व या प्रशासन व्यवस्थेचा आदर्श मौर्यानंतर आलेल्या अनेक राजवटींनी स्वीकारला.

**मौर्यपूर्व मगध राज्य :** नंद घराण्याचा संस्थापक महापदमनंद याने मगधाच्या शिशुनाग घराण्याचा शेवट करून मगधावर इ.स. पूर्व ३६४ मध्ये आपली सत्ता स्थापन केली. महापदमनंद नंतर त्याच्या आठ मुलांनी राज्य केले, पण अखेरचा राजा धनानंद वगळता इतर सात जणांची माहिती मिळत नाही. पाटलीपुत्र या राजधानीचे योग्य प्रकारे रक्षण करण्यासाठी धनानंदाने मोठे सैन्य जमविले होते. शत्रूचा पराभव करून प्रचंड लूट त्याने जमविली होती. प्रजेवर अन्याय कर लादले. जनता त्याच्यावर नाराज राहिली. त्यावेळी धनानंदाचा सेनापती चंद्रगुप्त मौर्य होता. धनानंद त्याला मारण्याच्या प्रयत्नात आहे, हे कळल्यावर तो तिथून निसटला. आर्य चाणक्याच्या मदतीने त्याने धनानंदचा पराभव केला व नंद घराण्याची सत्ता इ.स.पूर्व ३२१ मध्ये संपली. मौर्य घराण्याची सत्ता मगधावर निर्माण केली, असे काही संशोधक सांगतात.

**चंद्रगुप्त मौर्य** (इ. स.पूर्व ३२१ ते २९८), कुलवृत्तांत : चंद्रगुप्ताच्या कुळाविषयी परस्पर विरोधी वृत्तांत आढळतात. चंद्रगुप्ताच्या कुळाचा उल्लेख पुराणांमध्ये नाही. महावंश या बौद्ध धर्मग्रंथात मोरीय या क्षत्रिय घरातील चंद्रगुप्त होता असे म्हटले आहे. परिशिष्टपर्वण या हेमचंद्राच्या जैन ग्रंथात चंद्रगुप्त मोर पाळणाऱ्या जमातीच्या प्रमुखाचा पुत्र होता अशी नोंद आहे. विशाखा दत्ताच्या मुद्राराक्षस या नाटकात वृक्षाला व कुलहीन यांच्या संबंधातून जन्मलेली कुलहीन संतती होती, असा चंद्रगुप्ताचा उल्लेख आहे. विष्णुपुराणात चंद्रगुप्त मौर्य हा नंदराजाच्या मुरा नावाच्या दासीपासून झाला म्हणून त्यास मौर्य म्हणतात असे दिसते. पण ही उत्पत्ती व्याकरण दृष्ट्या चुकीचे आहे. महावंश दिव्यादान या बुद्धधर्मीय ग्रंथात चंद्रगुप्त व त्याचे वंशज क्षत्रिय असल्याचे आढळते. ग्रीक इतिहासकार चंद्रगुप्ताला क्षत्रियच असल्याचे मानतात. यावरून चंद्रगुप्त क्षत्रिय कुलातील होता हे सिद्ध होते.

**चंद्रगुप्ताचा उदय** : त्याचे वडील धनाधंदाच्या सैन्यात एक अधिकारी होते. कोणत्यातरी कारणाने राजाची त्यांचे वितुष्टं आले व त्यांना ठार करण्यात आले.त्याच्या मृत्यू समय चंद्रगुप्ताची माता गरोदर होती.

तिच्या भावांनी तिला गुप्तपणे नंदराजाची राजधानी पाटलीपुत्र येथे ठेवले. तेथेच चंद्रगुप्ताचा उदय झाला त्याचे पालन पोषण एका गुराख्याने केले. पुढे त्या गुराख्याने चंद्रगुप्ताला एका शिकाऱ्याला विकले. त्याच्याकडे राहून चंद्रगुप्त जनावरांची जोपासना करीत असे आपल्या सवंगड्या बरोबर तो नेहमी राजा व प्रजा यासंबंधी अनेक गोष्टी ऐकून खेळ खेळत असे. तो नेहमी राजाची भूमिका घेत असे एकदा त्या रस्त्याने जाणाऱ्या आर्य चाणक्याने हे पाहिले व त्याने त्याला विकत घेतले. नंतर चाणक्यने त्याला तक्षशिलामध्ये नेले व योग्य प्रकारचे शिक्षण दिले.

**धनानंदवर विजय** : धनानंदाचा राजपुरोहित आर्य चाणक्य दरबारातील अपमानास्पद वागणुकीमुळे धनानंदाचा सूड घेण्याच्या भावनेने पेटला होताच. चंद्रगुप्त व चाणक्य यांचे उद्दिष्ट एकच असल्यामुळे त्यांनी धनानंदा विरोधी आक्रमक स्वरूपाची मोहीम उघडली. चंद्रगुप्त पराक्रमी व बुद्धिमान होता. त्यावेळी मौर्यांची अवस्था चांगली नव्हती. त्याने गुप्त रूपाने धनानंदाकडे नोकरी पत्करली होती. आपल्या गुणांनी तो सेनापती पदापर्यंत पोहोचला होता. धनानंदाला चंद्रगुप्ताचा उत्कर्ष सहन झाला नाही, त्याने चंद्रगुप्ताला ठार मारण्याचा कट केला, पण तो यशस्वी होऊ शकला नाही. चंद्रगुप्ताला ही माहिती कळताच त्याने तेथून पलायन केले.

या सुमारास नंदावर रागावून राज्यातून बाहेर पडलेल्या तेजस्वी आर्य चाणक्याची व चंद्रगुप्त ची भेट झाली. चाणक्याचा नंदराजाने अपमान केला होता, त्याचा सूड घेण्याची प्रतिज्ञा त्यानी केली होती. काही इतिहासकारांच्या मते, चंद्रगुप्त बालपणी त्याला मिळाला नाही. त्याची व चंद्रगुप्ताची भेट जेव्हा चंद्रगुप्त नंदराज्याच्या सैन्यातून पळून आला त्यानंतर झाली. असे म्हटले जाते की विंध्य पर्वताजवळ या दोन महान व्यक्तींची भेट झाली व दोघांनी मिळून एका सुसज्य सैन्याची निर्मिती केली.

चंद्रगुप्ताने सिंधू नदीपर्यंत भारतीय प्रदेश ग्रीकांच्या जोखडातून मुक्त केला. ग्रीक राजा अलेक्झांडर पंजाबातील राज्यांवर हल्ला करीत होता. त्याचवेळी चंद्रगुप्त व चाणक्य उत्तरेकडे पोहोचले होते. अलेक्झांडरशी दोन हात करण्याचे बळ अजून त्यांच्यात आलेले नव्हते. मात्र नंदाचे साम्राज्य संपवण्यासाठी ग्रीकांचे सहाय्य उपयोगी पडेल असे त्यांना वाटले, म्हणूनच अलेक्झांडरची चंद्रगुप्ताने भेट घेतली, पण त्याच्या मानि व स्पष्ट वक्त्या स्वभावामुळे अलेक्झांडरशी त्याचा खटका उडाला. अलेक्झांडरने त्याला पकडण्याची आज्ञा केली, तेव्हा तो जलद गतीने छावणीतून निघून गेला उभयत्यांच्या भेटीबद्दल पाश्चात्य इतिहासकारांनी अनेक कथा रचल्या आहेत. अलेक्झांडरने भारतातून काढता पाय घेतल्यावर चंद्रगुप्ताला अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झाली. ग्रीकांबद्दल लोकमत दूषित होतेच, त्यामुळे ग्रीक सत्येवीरुद्ध विद्रोहाची भावना निर्माण झाली. ग्रीक सत्तेविरुद्ध निर्माण झालेल्या क्षोभात चंद्रगुप्त व चाणक्य यांनी भर घातली. चंद्रगुप्ताने क्षुब्ध लोकांना प्रोत्साहन देऊन ग्रीकांना देशाबाहेर घालून दिले व त्यांच्या ताब्यातील मोठ्या भूभागावर स्वामित्व मिळविले असे ग्रीक लेखक मानतात. चंद्रगुप्ताची महत्वकांक्षा नंद साम्राज्य जिंकून एकसंघ सार्वभौम साम्राज्य निर्माण करण्याची होती. यासाठी त्याने चाणक्याच्या मदतीने काश्मीर पर्वतराजीच्या राजा प्रवर्तक याच्याशी संवाद साधून सर्व जय्यत तयारी करून सुसंघटित सैन्य बरोबर घेऊन त्याने नंद साम्राज्याकडे झेप घेतली. त्याच्या सैन्यात पंजाब, गांधार, कंबोज इत्यादी सैनिक होते. शिवाय पारशी, ग्रीक व शक सैनिकही सामील झाले. चाणक्याच्या सल्ल्यानुसार चंद्रगुप्ताने नंद साम्राज्याचा पश्चिम सरहद्दीवर प्रथम हल्ला केला. मध्य भारतात

घनघोर युद्ध झाले. पंजाब पासून पाटलीपुत्र पर्यंत जाण्यास चंद्रगुप्तास तब्बल दोन वर्षे लागली. यावरून नंदाने स्वसंरक्षणासरी केलेले प्रतिकार व चंद्रगुप्ताची अभूतपूर्व तयारी यासंबंधीचा अंदाज बांधता येतो. त्यानंतर चंद्रगुप्ताने पाटली पुत्रास वेढा दिला. अखेरीस घनदघोर लढाईत धनानंद व त्याचे आप्तस्वकीय मारले गेले व चंद्रगुप्ताला विजय मिळाला. धनानंदाचा या लढाईत पराभव झाला. चंद्रगुप्ताची एक प्रतिज्ञा सफल झाली. मग चाणक्याने इ.स.पूर्व ३२१ यावर्षी चंद्रगुप्ताला मगध सिंहासनावर बसवले व मगधाचे बलाढ्य साम्राज्य त्याला मिळाले. मतकांक्षी व पराक्रमी चंद्रगुप्त व दूरदर्शी कुटनितज्ञ चाणक्य या दोघांनी मिळून नंदवंशाचे समोर उच्चाटन केले व मौर्य घराण्याची स्थापना झाली. मौर्यांचे हे साम्राज्य म्हणजे भारताच्या इतिहासातील सुसंघटित, सुनियंत्रित असे पहिले साम्राज्य होय, त्यामुळे मौर्य साम्राज्याच्या इतिहासाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. जवळजवळ संपूर्ण भारतावर या घराण्याचा सुमारे १५० वर्ष प्रभाव होता, अधिकार होता.

**चंद्रगुप्ताचे विजय :** चंद्रगुप्ताच्या विजयी मोहिमांची सविस्तर अशी विश्वासार्ह माहिती मिळत नाही. पण सिंहासना रूढ झाल्यावर उत्तर भारत त्याने जवळजवळ सगळा जिंकला. पश्चिमेकडील सुराष्ट्र त्याच्या ताब्यात होता. गिरनार येथील रुद्रदामनच्या शिलालेखवरून हे स्पष्ट होते. चंद्रगुप्ताचा सुराष्ट्र येथील प्रांतीय अधिकारी पुष्पगुप्त याने येथे सुदर्शन तलाव बांधल्याचा उल्लेख त्यात आहे. दक्षिणेकडील साहित्यात तिवेली जिल्हापर्यंत चंद्रगुप्ताचे रथ पोहोचल्याचे उल्लेख आढळतात. जैन परंपरेप्रमाणे उत्तर म्हैसूरशी चंद्रगुप्ताचा संबंध होता असे दिसते. महावंशात तो भारत वर्षाचा सम्राट होता असे म्हटले आहे.

**सेल्युकस निकेटर चा पराभव** : इ.स. पूर्व ३२३ मध्ये अलेक्झांडरचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचे साम्राज्य आपसात वाटून घ्यावयाचे असे त्याच्या सरदारांनी ठरविले. त्यातील आशियातील भाग सेल्युकस निकेटर च्या वाट्याला आला. हा अलेक्झांडरचा एक प्रमुख सरदार होता. तो अत्यंत शूर व पराक्रमी योद्धा होता त्याने भारतातील ग्रीकांचा गेलेला प्रदेश परत मिळवण्याच्या इच्छेने भारतावर स्वारी केली, परंतु अलेक्झांडरच्या वेळची अराजकतेची स्थिती चंद्रगुप्ताच्या वेळी भारतात राहिलेली नव्हती. त्यावेळी चंद्रगुप्तासारख्या महान सेनानीच्या अधिपत्याखाली भारत संघटित झाला होता आणि सामर्थ्यशाली झाला होता. हे सेल्युकसच्या लक्षात आले नाही. बलाढ्य मौर्य साम्राज्याचा तो एक भाग होता. शिवाय त्याची शासनसुत्रे चंद्रगुप्त सारख्या पराक्रमी सेनापतीच्या व राजनीतिज्ञ शासकाच्या हाती होती. सेल्युकसने आक्रमण केले तेव्हा सिंधू नदीच्या पलीकडे काठावर जाऊन चंद्रगुप्ताने त्याला तेथेच रोखले. त्याच्या सैन्यात हत्ती दल यावेळी होते. चंद्रगुप्ताचे सैन्य कसलेले, प्रशिक्षित व विशाल साम्राज्याच्या निर्मितीत नित्यश युद्धाच्या सराव असलेले होते. सिंधू नदीकाठी चंद्रगुप्ताने सेल्युकस ला अडवून त्याचा पूर्ण पराभव केला. त्याच्याशी तह झाला. तहातील कलने पुढीलप्रमाणे १) खैबर किंडी पासून ते हिंदूकोश पर्यंत पसरलेल्या सध्याच्या अफगाणिस्ता व बलुचिस्तानचा सारा प्रदेश सेल्युकसने चंद्रगुप्ताला द्यावा हीरात (एरीया) कंधार (एराकोशिया) पैरोपनिसद (काबुल) आणि बलुचिस्तान (गेडरोशिया) हे चार प्रांत या प्रदेशात समाविष्ट होते. २) चंद्रगुप्ताला सेल्युकसने आपली मुलगी हेलन अर्पण करावी. ३) चंद्रगुप्ताने सेल्युकसचा परत भेट म्हणून ५०० हत्ती द्यावे. ४) सेल्युकसने मेगॅस्थेनीस नावाचा राजदूत चंद्रगुप्त दरबारी पाठवावे.

या युद्धाचा एक परिणाम असा झाला की भारतीय साम्राज्याची सीमा वायव्येकडे हिंदुकुश पर्यंत पोहोचली. हीच ती सीमा ही जिच्यासाठी पुढे मोगलांनी व इंग्रजांनी जंग जंग पछाडले, पण त्यात त्यांना यश आले नाही. डॉक्टर आर. के. मुखर्जी यांच्या मते चंद्रगुप्ताने निश्चित एका विशाल साम्राज्यावर राज्य केले. प्लुटर्क व जस्टीन या ग्रीक इतिहासकारांच्या मते त्याने संपूर्ण भारतावर आपला अधिकार प्रस्थापित केला होता. डॉक्टर व्ही. ए. स्मिथ च्या मते अफगाणिस्तान, प्राचीन एरियाना, हिंदुकुश पर्वताचा भाग उत्तर प्रदेश, बिहार, काठीयावाड इत्यादी प्रदेश चंद्रगुप्ताच्या साम्राज्याचे भाग होते. इ.स. पूर्व २९८ च्या सुमारास तो संपूर्ण भारताचा सम्राट होता. चंद्रगुप्ताने एकूण २४ वर्ष राज्य केले त्याचे साम्राज्यात नर्मदेच्या उत्तरेकडील बहुतांशी प्रदेशाचा अंतर्भाव होता असे दिसते. जैन ग्रंथावरून माळवा हा प्रदेश सुद्धा चंद्रगुप्ताच्या ताब्यात आलेला होता असे दिसते. अवंतीच्या पश्चिमेकडे त्याने आपले साम्राज्य वाढवले आणि पुष्यगुप्त नावाचा एक अधिकारी तिथे नेमला असा उल्लेख सापडतो. परकीय आक्रमणापासून छोट्या राज्यांच्या अस्तित्वाला धोका असतो हे जाणल्यामुळे जिंकलेले सर्व प्रदेश त्याने साम्राज्यात सामावून घेतले होते, त्यामुळे मौर्य साम्राज्य बहुतांशाने केंद्रवर्ती होते. त्या साम्राज्यात लिच्छवि, वृज्जी, मल्ल, भद्र वगैरे गणतंत्र राज्य होती. त्यांना मात्र अंतर्गत स्वातंत्र्य होते. त्याने दक्षिणेकडील तीनवेली जिल्हापर्यंत साम्राज्यविस्तार केला होता, असे तमिळ अख्याइके मध्ये आढळते. जैन ग्रंथानुसार चंद्रगुप्ताने आपल्या जीवनातील शेवटची वर्षे मैसूर मधील श्रवण बेळगोळ या ठिकाणी. श्रवणबेळगोळ जवळील एका पहाडाला चंद्रगिरी असे नाव दिलेले आढळते. जवळच चंद्रवस्ती नावाचे मंदिर असून ते चंद्रगुप्ताने बांधले असावे असे सांगितले जाते. थोडक्यात चंद्रगुप्ताने निश्चितपणे बऱ्याच मोठ्या प्रदेशावर राज्य केले असा असावे असा पुरावा मिळतो. चंद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र बिंदुसार याने मूळ मौर्य साम्राज्यात नवीन प्रदेशाचा समावेश केला नाही. त्याचप्रमाणे बिंदुसारचा पुत्र अशोकानेही कलिंग वगळता नवीन प्रदेश समाविष्ट केला नाही.

**चंद्रगुप्ताचा मृत्यू :** जैन ग्रंथानुसार चंद्रगुप्ताच्या अखेरच्या काळात साम्राज्यात फार मोठा दुष्काळ पडला. चंद्रगुप्ताने जैन धर्म स्वीकारला व जैन साधू भद्रबाहू यांच्या समवेत तो दक्षिणेत श्रवणबेळगोळ येथे आला. साम्राज्याची सर्व सूत्रे आपला पुत्र बिंदुसार याच्याकडे सोपवून चंद्रगुप्ताने संथारा व्रत (अन्न त्याग व्रत) स्वीकारले आणि इ. स .पूर्व २९८ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

● **कौटिल्य** : मगधाच्या नंद करण्याचा पराभव करून मगधाच्या सिंहासनावर चंद्रगुप्तास बसविणारा धनानंदाचा राजपुरोहित म्हणजे कौटिल्य उर्फ विष्णू गुप्त चाणक्य, कोणी साधीसुधी राज परिवारतील व्यक्ती नव्हती, तर अत्यंत हुशार, राज्यव्यवहार पारंगत, कुटील राजनीतिज्ञ, अशी असामान्य व्यक्ती होती. चंद्रगुप्ताचा मंत्री म्हणून त्याने केलेले कार्य सम्राट चंद्रगुप्तापेक्षाही मोठे होते. कौटिल्य एक प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानी, अर्थशास्त्रज्ञ, शिक्षक, रणनीतीकार, म्हणूनही ओळखला जातो. त्याच्या जीवनाने व शिकवणुकीने भारतीय इतिहास व तत्वज्ञानावर मोठी छाप पाडली आहे. त्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ राज्यशास्त्र, शासन, अर्थशास्त्र व मुत्सदेगिरी यावर एक महत्त्वाचा ग्रंथ होय. चाणक्याचा जन्म पाटलीपुत्र सध्याच्या, बिहार येथे ब्राह्मण कुटुंबात झाला. तो लहानपणापासून विलक्षण विद्वान होता. त्याने प्राचीन तक्षशिला विद्यापीठात शिक्षण घेतले, जे सध्याच्या पाकिस्तान मधील विद्येचे प्रसिद्ध केंद्रे आहे. चाणक्याच्या परिवाराची इतिहासात

फारशी माहिती नाही. त्याच्या वैवाहिक जीवनाची अथवा वंशांची माहिती नाही. चाणक्य स्वतः अविवाहित असल्याचे सांगितले जाते. चाणक्याने मगध साम्राज्याचा ऱ्हास व नंद राजवंशाचा उदय पहिला, त्यांची अत्याचारी भ्रष्ट राजवट पाहिली. नंदशासकांना उलथून टाकण्याचा निर्धार करून चाणक्याने त्यांच्या अधिकाराला आव्हान देणारा आणि भूमीत सुव्यवस्था पुनरसंचयित करू शकेल, असा एक योग्य उमेदवार शोधण्याची मोहीम सुरू केली. चंद्रगुप्ताचा शोध घेऊन तो त्याचा गुरू व मार्गदर्शक बनला. त्याला नंद घराण्याविरुद्ध यशस्वी बंड करण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य प्रदान केली. चाणक्याच्या मदतीने, मार्गदर्शनामुळे चंद्रगुप्ताने नंदाचा पराभव करून मौर्य साम्राज्याची स्थापना केली, जे प्राचीन भारतातील सर्वात मोठ्या साम्राज्यापैकी एक बनले.

चंद्रगुप्त सिंहासना रूढ झाल्यावर चाणक्याने त्याचा मुख्य सल्लागार म्हणून काम केले आणि साम्राज्याच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. शासन, करआकारणी, कायद्याची अंमलबजावणी आणि परराष्ट्र व्यवहारांशी संबंधित धोरणे तयार करण्यात त्याचा महत्त्वाचा वाटा होता. अर्थशास्त्रात सांगितल्याप्रमाणे चाणक्याचा राज्यकलेचा व्यवहारिक दृष्टिकोन स्थिरता, कार्यक्षम नोकरशाही, मुत्सद्देगिरी च्या महत्त्वावर भर दिला. चाणक्याने लिहिलेला अर्थशास्त्र हा राजकारण, लष्करी रणनीती, यावरील सर्व समावेशक ग्रंथ आहे. त्यात शासकाची कर्तव्य, न्याय प्रशासन, हेरगिरी, राजकीय प्रणाली, आर्थिक स्थिती, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती, राज्यव्यवस्था, राजकारणातील कुटनिती, सरकारची रचना, संसाधनाचे व्यवस्थापन, युद्धाचे आचरण, लष्करी रणनीती आणि मुत्सद्देगिरी ची तत्वे यासह विविध विषयांचा समावेश होतो. विद्वान, तत्त्वज्ञानि, राजकारणी असणाऱ्या चाणक्याने चंद्रगुप्त मौर्य याच्या नेतृत्वाखाली मौर्य साम्राज्याच्या स्थापनेत पुढाकार घेऊन त्याला एक शक्तिशाली शासक बनविले. कौटिल्याचे अर्थशास्त्र ज्याला ''चाणक्य नीति'' असेही म्हटले जाते. अर्थशास्त्र हा राज्य चालवण्याचा व व्यवस्थापित करण्याच्या कलेवर एक सर्वसमावेशक ग्रंथ आहे. अर्थशास्त्र हे १५ विभागात व १८० प्रकरणात आहे. ज्यामध्ये राज्यशास्त्र आणि शासनाच्या विविध पैलूंचा समावेश होतो. इ.स. पूर्व चौथ्या शतकातील अर्थशास्त्र या संस्कृत ग्रंथात ६००० श्लोक आहेत. ग्रंथाच्या नावात अर्थ हा शब्द कौटिल्याने उपयोजना असला तरी हा ग्रंथ मुख्यतः राज्य व्यवहार व राजकीय प्रशासन यासंबंधीचा आहे. अर्थशास्त्र या अनमोल ग्रंथाची मूळ प्रत अस्तित्वात नाही. पंडित रामशास्त्री यांनी स्वतःजवळ असलेल्या कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे १९०९ साली भाषांतर केले. या ग्रंथात राजाने आपल्या राज्याच्या अनेक विविध समस्या कशा प्रकारे सोडवाव्यात याचे सूत्रबद्ध विवेचन कौटिल्याने केले आहे. मौर्य इतिहासाचा पर्यायने प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती याचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत विश्वसनीय साधनग्रंथ म्हणून अर्थशास्त्राचे महत्व अनन्यसाधारण आहे त्यात वर्णन केलेले विषय आजही तेवढेच महत्त्वपूर्ण आहेत. सुमारे २५०० वर्षांपूर्वी लिहिलेला या ग्रंथात कौटिल्याने राजाच्या व राज्याच्या समस्यावर सुचवलेले उपाय आजही उपयुक्त ठरतात. या ग्रंथात राजनीतीची तत्वे आणि प्रत्यक्ष व्यवहार यांची सुरेख सांगड घालण्यात आली आहे .राजाला तत्त्वज्ञान, वेद, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र या विद्या अवगत असल्या पाहिजेत असे अर्थशास्त्र सांगते.

अर्थशास्त्रात चाणक्याने मांडलेल्या मुख्य तत्त्वांपैकी एक म्हणजे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दंड किंवा बळाचा वापर .चाणक्याच्या मते शासकाला त्याच्या प्रजेचे प्रेम व भीती दोन्ही असणे आवश्यक आहे आणि आज्ञा पालन, निष्ठा सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी बक्षिसे, व शिक्षा यांचे संयोजन वापरावे, राजाचे राजकीय व लष्करी कौशल्य देखील सांगितले आहे. प्राचीन स्थिती पूर्णपणे कळण्याकरिता या ग्रंथाचे वाचन करणे गरजेचे आहे. चाणक्याचा वारसा राजकारणी व रणनीतीकार या भूमिकेपलीकडे आहे. तो एक विद्वान आणि शिक्षक म्हणूनही आदरणीय आहे. चाणक्य नीति म्हणून ओळखले जाणारे त्यांचे सूत्र, नेतृत्व आणि नैतिकता आणि वैयक्तिक आचरण या सह जीवनाच्या विविध पैलूवर व्यवहारिक सल्ला देतात. ज्यामुळे चाणक्य इतिहासतील महान विचारवंतांमध्ये स्थान मिळवतो  चाणक्याची कित्येक वचने आजही सत्य आहेत. शेवटी चाणक्य हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते, ज्याचे राजकारण, अर्थशास्त्र आणि तत्त्वज्ञानावरील योगदानाचा भारतीय सभ्यतेवर खोलवर प्रणाम झाला आहे. भारतीय इतिहास व संस्कृतीत एक आदरणीय व्यक्तिमत्व होय. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सांगितलेल्या तत्त्वावरच चंद्रगुप्ताची राज्यव्यवस्था आधारलेली होती .कौटिल्य चंद्रगुप्ताचा मार्गदर्शक, सल्लागार व प्रधान अमात्य होता. राजकारणामध्ये धर्म किंवा नीती गौण आहे असे कौटिल्याचे मत होते. राज्यसत्तेचा खंदा पुरस्कर्ता असूनही राजसत्ता एकतंत्री, अनियंत्रित असावी हे त्याला मान्य नव्हते. राजाने कायम मंत्री परिषदेच्या सल्ल्यानेच राज्यकारभार करावा असा त्याचा आदेश होता. अर्थशास्त्रात त्याने राज्याची सांगितलेली सप्तांगे- राजा, अमात्य, मित्र, कोष, राष्ट्र, दुर्ग, बल ही राज्याची कल्पना भारतीय राजनीतीमध्ये मूलभूत मानले जाते. अर्थशास्त्राच्या सर्वकश स्वरूपामुळे त्याला शासनाचा विश्वकोश म्हणतात. अर्थशास्त्रास अथर्ववेदाचा उपवेद म्हणूनही मान्यता आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न-१**

प्रश्न १ रिकाम्या जागा भरा

१. चंद्रगुप्त मौर्याने मगधाच्या.......... या राजाचा पराभव केला.

अ) पर्वतक ब) खारवेल क) सुशिम ड) धनानंद

२. चंद्रगुप्त मौर्याने इ.स.पुर्व........... साली मौर्य साम्राज्याची स्थापना केली.

अ) ३२० ब) ३२१ क) ३२२ ड) ३२४

३. इंडिका हा ग्रंथ ................यांनी लिहिला.

अ) मेगास्थेनिस ब) एरियन क) डिमॅक्स ड) चाणक्य

४. अर्थशास्त्र हा ग्रंथ आधारलेला आहे.

अ) धर्मशास्त्र ब) तर्कशास्त्र क) समाजशास्त्र ड) राज्यशास्त्र

५. अर्थशास्त्रात १५ विभाग व ........... प्रकरणे समाविष्ट आहेत.

अ) १८० ब)१८५ क) १८९ ड) २००

### ४.२.२ अशोकाचा धर्म

अशोक हा मौर्य घराण्यातील सर्वाधिक प्रसिद्ध राजा होय. भारताच्या इतिहासात अशोकाला सर्वात महान सम्राटाचे स्थान आहे. अशोक हा चंद्रगुप्त मौर्याचा नातू व बिंदुसारचा शेवटून दुसरा पुत्र होय बिंदुसारच्या अनेक स्त्रिया होत्या, त्यापैकी सुभद्रांगी किंवा धर्मा ही अशोकाची जन्मदात्री माता होती. सुशीम हा बिंदुसारचा ज्येष्ठ पुत्र व अशोकाचा सावत्र भाऊ होता, तर वित्तशोक हा अशोकाचा सख्खा लहान भाऊ होता. लहानपणी अशोक तापट भांडखोर होता, पण त्यासोबत तो एक कसलेला निपुण योद्धा होता. तसेच एक शूर शिकारी होता. अशोका संबंधी विश्वसनीय माहिती मिळते ती त्याच्या शिलालेखातूनच. अशोकाने धर्म लेख लिहून घेतले तेच मुळी धर्मप्रसाराच्या उद्देशाने. लोकांना खरा धर्म कशात आहे हे कळावे व त्यांनी व्यवहारात कसे वागले असता त्यांचे ऐहिक व पारमार्थिक कल्याण होईल, तसेच सामान्य जनतेच्या आत्मिक व आध्यात्मिक उन्नतीसाठी स्वतः अशोकाने काय प्रयत्न केले आहेत, करणार आहे याविषयी माहिती सामान्य लोकांना देण्याचा मानस ठेवून त्याने हे लेख लिहून घेतले. मौर्य साम्राज्याचे अधिपत्य स्वीकारण्यापूर्वी अशोक उजजेन व तक्षशिला या प्रांताचा प्रमुख होता. बिंदुसारच्या मृत्यूनंतर तो इस ६ वीसन पूर्व २७३ मध्ये सिंहासनाधीश झाला बिंदुसारने आपल्या सुशीम अशोक दिश्य या तिन्ही मुलांना उत्तम प्रकारचे शिक्षण दिले होते अशोक स्वतः प्रतिभान महत्वकांक्षी शस्त्र शास्त्र निपुण होता वायव्य भागातील तक्षशिलाचे बंड मोडून काढून त्याने आपल्या पराक्रमाची चुणूक दाखविली त्यानंतर तो उच्चंचा राज प्रतिनिधी होता बिंदुसारच्या मृत्यूनंतर राजवतासाठी वारसा युद्ध होऊन अशोक विजय झाला की सपू २६९ मध्ये अशोकाने अधिकृतपणे राज्याभिषेक करून घेतला त्यावेळी त्याने स्वतःला देवानाम प्रियदर्शी असे विरोध लावून धारण केले.

**अशोकाचे धर्म परिवर्तन :** कलिंग युद्धामुळे मगधाच्या व भारताच्या इतिहासात एक नवे युग सुरू झाले. शांतता, सामाजिक प्रगती व धार्मिक प्रचार दिसून आला. पण याचवेळी राजकीय प्रगती खुंटली, शास्त्र वृत्ती लयास जाऊ लागली. कलिंग युद्धामुळे मोठ्या प्रमाणात नरसहार झाल्याने पापाचे क्षालन करण्यासाठी अशोक अहिंसावादी व भूतदयाबादी बौद्ध धर्माकडे वळला. महावंश या बौद्ध धर्मग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे एक सात वर्षाच्या निग्रोध या बाल भिक्षू कडून अशोकाने बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यानंतर तिसऱ्या बौद्ध धर्म परिषदेचे अध्यक्ष स्थान भूषविलेल्या मोगली पुत्र तीस्य या श्रेष्ठ बौद्ध भिक्षुशी त्याचा संपर्क आला. बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यावर धर्मप्रसारासाठी मोहिमा त्याने उघडल्या. अशोकाने स्वतः बौद्ध धर्माच्या पवित्र ठिकाणांना भेटी दिल्या.

अशोकाच्या धर्मांतराचे विविध परिणाम तात्कालीन राजकीय व सामाजिक स्थितीवर झालेले दिसतात. या धर्मांतरानंतर अशोकाच्या अंतर्गत धोरणात तसेच परराष्ट्र धोरणात लक्षवेधी बदल झाला.

**अशोकाचा धर्म :** कलिंग विजय ही अशोकाच्या चरित्राचा सारा ओघ फिरवणारी व म्हणून मगधाच्या, भारताच्या व जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची चिरास्मरणीय होऊन राहिलेली एक क्रांतिकारी घटना आहे. या घटनेमुळे अशोकाच्या हृदयात अमुलाग्र बदल झाला व अखिल जगताच्या अंतकरणात एक महान

धर्मवीर म्हणून तो कायमचा विराजमान झाला. खऱ्या धर्माची म्हणजेच मानवतेची शिकवण देत अखिल मानव जातीला सुखी करण्यासाठी अशोकाने आपले सर्वस्व पणाला लावले. अशोकाने आपल्या तेराव्या शिलालेखात म्हटले आहे, 'कलिंग विजयानंतर देवानाम प्रिय (अशोक) धर्माचरण करण्यास, धर्माप्रमाणे विचार करण्यास व धर्माप्रमाणे शासन करण्यास उत्सुक झाला', या लेखात धर्म कोणता याचा उल्लेख नाही, त्यामुळे धर्म म्हणजे नीती धर्म की बौद्ध धर्म अशी शंका काही विद्वानांनी घेतली. परंतु अशोकाने बौद्ध धर्मासंबंधी हा उल्लेख केला आहे असे मानणारे काही प्रमुख पुरावे आहेत. अशोक बौद्ध धर्मानुयायी होता असे मानणारे अनेक सबळ पुरावे आहेत. अशोकाने उभारलेली स्मारके, वास्तु बौद्ध असल्याचे सुचवतात, दीपवंश, महावंश या बौद्ध धर्म ग्रंथात त्याने बौद्ध धर्माची दीक्षा कशी घेतली याचे सविस्तर वर्णन आहे. दैनंदिन पाठासाठी त्याने निर्देश केलेले सर्व ग्रंथ पाली भाषेतील बौद्ध धर्मग्रंथ आहेत. अशोकाने राजधानी पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्माची तिसरी परिषद बोलविली होती. अशोकाने उभारलेले स्तूप, विहार, स्मारके या वास्तू तो स्वतः बौद्ध असल्याचे दर्शवितात.

अशोकाच्या धर्माचे स्वरूप इतर धर्म व धर्म पद्धती यापेक्षा वेगळे आहे. तो स्वतः बौद्धधर्मीय असला तरी धार्मिक बाबतीत तो सहिष्णू व विविध धर्मातील मूलतत्त्वे एकच आहेत असे मानणारा होता. १२ व्या शिलालेखा त्यांनी स्पष्ट केले आहे की, 'जो स्वधर्माचा आदर करून परधर्माचा द्वेष करतो, तो आपल्या धर्माची गंभीर हानी करतो'. सहाव्या स्तंभलेखात त्याने प्रतिपादन केले आहे की,' मी सर्व समाजाकडे पूर्णतः लक्ष देईल सर्व धर्मपंथाबद्दल मला अत्यंत आदर आहे. इतकेच नव्हे तर त्याच्याबद्दल योग्य सन्मान दर्शविणे हे माझे परम कर्तव्य आहे.' अशोकाने धर्म तत्वज्ञानावर अवास्तव भर न देता नैतिक आचरणावर भर देणारा धर्म प्रसारित केला. सर्वधर्मपंथ, संप्रदाय यांना एकत्र आणणारा नैतिक कायदा, सामान्य आचारसंहिता किंवा नैतिक आदेश याचा अशोकांनी पाठपुरावा केला. धर्म म्हणजे काय असा प्रश्नच त्याने उपस्थित करून त्याने स्वतःच त्याचे उत्तर 'पाप न करणे व सत्कृत्ते करणे' असे दिले आहे. सर्व धर्मांना अभिप्रेत अशा नैतिक तत्वांचे अधिष्ठान प्राप्त झालेला सदाचार संपन्न व्यवहार म्हणजेच अशोकाचा राजनैतिक क्षेत्रातील धर्म होय. त्या धर्माचे विवेचन पुढील प्रमाणे केले आहे, ........ गुणसंपन्न होण्यासाठी साधुता, दया, सत्य, पावित्र्य, माधुर्य, यांची प्रत्येक व्यक्तीलाच गरज असते त्यांच्या आचरणासाठी अशोकाने मार्गदर्शन केले होते १) अहिंसा आचरणे, २) आई-वडिलांची सेवा करणे व त्यांना आणि गुरूंना मान देणे, ३) प्राणीमात्रावर दया करणे, ४) ब्राह्मणांना श्रमणना पिडितांना व गोर गरिबांना दान देणे, ५) सत्याचरण करणे इत्यादी. अशोकाने अशा चांगल्या गोष्टी संबंधानेच मार्गदर्शन केले होते असे नव्हे, तर दुर्गुण व दुष्ट, भावना संबंधी ही त्याने इशारा दिलेला होता. क्रोध, कठोरता, गर्व, ईर्षा, त्यांच्यापासून दूर असावे, असे त्यांनी सांगितले. धार्मिक आचरणासाठी माणसाने नेहमी आत्मनिरीक्षण करावे असेही तो सांगे.

अशोकाच्या धर्माला कुठल्याही सांप्रदायिक धर्माचे स्वरूप नव्हते हे वरील विवेचनावरून समजते. किंबहुना सर्व धर्माचे सार म्हणजेच अशोकाचा धर्म होय. कुठल्याही धर्म परंपरेच्या अनुयायाला आपल्या धर्म श्रद्धेला धक्का न लागू देता अशोकाच्या या शुद्ध नैतिक स्वरूपाच्या धर्माचे अनुकरण करता येत असे. म्हणजेच हा विश्वधर्म होता व त्याचा उद्गाता म्हणून श्रेय अशोकाकडे जाते. अशोकाने आपल्या धर्माची तत्वे

आणि त्याचा प्रसार मोठ्या उत्साहाने केला. याचे कारण म्हणजे कलिंग युद्धातील हानीमुळे त्याला झालेल्या पश्चाताप. लोकांचे सुख -संरक्षण- निर्वाह आणि प्रशासन -धर्म नियमांनी बांधले गेले पाहिजे अशी त्याची भावना होती. सामान्य जनते प्रति राजाची भूमिका पित्याची आहे म्हणून तो म्हणतो, 'सर्व लोक माझी मुले आहेत', राज्यप्रसादातील सर्व ऐहिक सुखोपभोग, विलास, ऐशोआराम त्यांनी बंद केले. प्रजेचे कल्याण हा अशोकाचा ध्यास होता. सर्व धार्मिक बाबतीत सतत समान वागणूक देणारा धर्म सहिष्णुवृत्तीचा राजा म्हणजे सम्राट अशोक होय.

**अशोकाने बौद्ध धर्म प्रसारासाठी योजलेले उपाय :** अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी महान कार्य केले अशोकाच्या राजाश्रयामुळे व प्रयत्नामुळे बौद्ध धर्माला जगातील प्रमुख धर्मामध्ये महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

**१. बौद्ध धर्म राष्ट्रधर्म बनविला :** अशोकाने राजाश्रय देऊन बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी आपली शासन यंत्रणा राबविली. आपल्या अधिकाऱ्यांना धर्माचा प्रसार करण्याचे आदेश दिले व बौद्ध धर्म हा राष्ट्रधर्म बनविला.

**२. धर्म खात्याची निर्मिती :** धर्मप्रसारासाठी अशोकाने धर्मखाते स्थापन केले. धर्ममहामात्र व धर्मायुक्त नावाचे अधिकारी नेमले. या अधिकाऱ्यांकडे बौद्ध धर्म तत्वांची जोपासना व प्रसार करण्याचे कार्य सोपविले. धार्मिक मतभेद ही मिटविले. स्त्रियांच्या हितसंवर्धनार्थ स्त्रीमहामात्रा नियुक्त केले.

**३. धर्मयात्रा :** सम्राट अशोक स्वतः इतर प्रमुख अधिकाऱ्यांच्या समवेत धार्मिक स्थळांच्या दर्शनार्थ व धर्मप्रसारासाठी यात्रा करीत असे. त्यामुळे त्याला सहजच लोकांशी संपर्क साधता येत असे. गौतमाचे जन्मस्थान लुंबिनी ग्राम ला भेट देऊन, तेथे स्तंभ उभारला. गया व सारनाथची ही यात्रा त्यांनी केली.

**४. लोककल्याणकारी कामे :** सम्राट अशोकाने प्रजेच्या सुख सोयी वाढविल्या. माणसे व पशु यासाठी चिकित्सालय उघडली. शेतीसाठी कालवे विहिरी खोदल्या. रस्ते बांधले व त्यांच्या दुतर्फा झाडे लावली. प्रवाशांसाठी धर्मशाळा बांधल्या. विश्रांतीगृह बांधले. काही कर माफ केले. कैद्यांना मुक्त केले. दुःखी दिन लोकांना दानधर्म केला. प्रजेच्या सुखासाठी जलसंवर्धन व स्वच्छ पाणीपुरवठा केला. शिक्षणाला उत्तेजन देऊन नालंदासारखी विद्या केंद्र स्थापली. शाळांना मदत केली. कलेल्या उत्तेजन दिले. अशोकाच्या वेळी शिल्पकला व चित्रकला पूर्णावस्थेत गेलेल्या होत्या. आपल्या अधिकाऱ्यांना प्रजेशी शांतीने व दयाधर्माने वागण्याची आज्ञा दिली होती अशाप्रकारे प्रजेचे प्रेम संपादन करून बौद्ध धर्माविषयी आपुलकी वाढविली.

**५. प्राणीहत्या बंद :** मांसाहार व प्राणीसंहार यांचा प्रभाव हळूहळू सम्राट अशोकांनी कमी केला. साम्राज्यात निरर्थक प्राणी हत्येस बंदी केली. अशोकाने शिकार सुद्धा सोडली. कायद्याने पशुहत्या बंद केली. कत्तलखान्यावर अनेक बंधने लादली.

**६. भिक्षूसाठी मठ, विहार–स्तूप बांधले :** सम्राट अशोकाने बांधलेल्या मठ व विहारांमध्ये अध्यात्मिक संस्थेमध्ये स्त्री पुरुष भिक्षुक राहत असत. त्यांच्याबरोबर धर्मोपदेशकही राहत असत. ८४००० स्तूप बांधून त्यात बुद्धाच्या शरीराचे अवशेष ठेवले होते. अशोकाने सर्वांना आर्थिक मदतही केली.

**७. स्तंभ व शिलालेखाद्वारे तत्त्वांचा प्रचार :** बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी धर्माची शिकवण सर्वांना समजावी या हेतूने सम्राट अशोकाने बौद्ध धर्माची तत्वे राज्यात ठिकठीकाणी स्तंभ व शिलालेखावर कोरविली. त्यातून सत्य, अहिंसा, भूतदया, परोपकार इत्यादीचे प्रजेने पालन करावे असा आदेश त्यांनी दिला. या आलेखातून अहिंसा, सत्य विषयक धर्म सहिष्णुता, भूतदया, परोपकार इत्यादी सद्गुणांचे आचरण प्रजेने करावे असा उपदेश केला. हे आलेख म्हणजे अशोकाचे कोरीव आत्मचरित्र होय.

**८. धर्म संघातर्फे प्रचार :** सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी संघ तयार केले व त्यांना देशोदेशी पाठवले. आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना धर्मप्रसारासाठी नेपाळ व सिलोन येथे त्याने पाठविले होते. सिलोन चा राजा देवनामपिया तिस्स याने बौद्ध धर्माचा स्वीकार करून बौद्ध धर्म सिलोन चा राष्ट्रधर्म बनवला.

**९. बौद्ध धर्माची तिसरी धर्म परिषद :** बौद्ध धर्मातील मतभेद मिटवण्यासाठी राजधानी पाटलीपुत्र येथे सम्राट अशोकांनी बौद्ध धर्माची एक परिषद भरविली, ही तिसरी परिषद होय. या परिषदेचा अध्यक्ष मोगल्ली पुत्र तिस्स होता. ही परिषद सुमारे नऊ महिने चालली होती. अशोकाच्या आश्रयाचा फायदा घेऊन बौद्ध नियमांचे व सिद्धांतांचे नूतनीकरण केले गेले. बौद्ध धर्मातील फुटीर वृत्तीस आळा घालण्यात येऊन बौद्ध धर्माच्या प्रसारास उत्तेजन दिले. नऊ महिने चाललेल्या या परिषदेत कथावस्तू हा धर्मग्रंथ तयार करण्यात आला. अशोकाच्या राजवटीतच ही नवा संप्रदायाचा दक्षिण व पश्चिम आशियात प्रसार झाला होता.

कलिंग युद्धानंतर अशोकाने आपली कारकीर्द धर्माच्या प्रचारासाठी व प्रजेच्या कल्याणासाठी घालविली. प्रजेची आत्मिक व आध्यात्मिक अशी सर्वांगी उन्नती व्हावी, सत्य धर्माचे पालन करून प्रत्येकाने आत्मोन्नती साधावी, यासाठी त्यांनी राज्यात ठीक ठिकाणी धर्माज्ञा कोरूनन ठेवल्या. त्यांनी स्वतः बौद्ध धर्म स्वीकारला होता, तरी सर्व धर्म पंथांच्या मंदिरांचा व साधुसंतांचा त्याने सन्मान केला. अशोक ब्राह्मण– श्रमण– आजीवक इत्यादी भिन्न भिन्न धर्म संप्रदायी लोकांचा सारखा आदर करून सर्वांना समान दृष्टीने पाहत असे स्वपंथाभिमान परपंथाबद्दल अनादर यासारखा मनाच्या संकुचित पणा किंवा दुराभिमान त्याच्या ठाई काडी मात्र नव्हता. त्याने सर्व पंथांना मान्य असणाऱ्या सामान्य तत्वांची अर्थात नीतीपर आचरणाच्या नियमांचा पुरस्कार व नीतीविरुद्ध गोष्टींचा निषेध याचाच उपदेश आपल्या लेखातून सातत्याने केला. सर्व धर्मीयात परस्पराविषयी प्रेमभाव असावा, परस्परांच्या पंथाविषयी आदर बुद्धी असावी, अशीच अशोकाची इच्छा होती, परधर्म श्रेष्ठता सर्वधर्म विषयी आदर बुद्धी आणि सर्व धर्माविषयी प्रेम व समान भाव हे गुण स्वतः अशोकाच्या ठाई उत्कट पणे दिसतात. सर्वधर्म पंथांची मूलतत्त्वे एकच असतात, ही मूलतत्वे सत्याकडे व आत्मोनीतिकडे नेणारी असल्यामुळे त्यांच्याविषयी योग्य आदर दाखविण्याचा उद्देश त्यांनी केला आहे.

धर्म यात्रेच्या निमित्ताने दानधर्म करण्याच्या उद्देशाने तपसव्यांची व ब्राह्मणांची भेट घडते, ज्ञानी व्यक्तींशी धर्मचर्चा घडतात, राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील लोकांच्या भेटी होतात, इत्यादी फायदे होतात असे सम्राट अशोक सांगतो. अशोकाचे धर्म प्रचारक सीरिया, इराण, इजिप्त, इटली, तुर्की सायरीन, मेसीडोनिया, एपीरस येथेही पोहोचले होते. बौद्ध तीर्थक्षेत्रांच्या पूजेचे महत्व, बौद्ध त्रिरत्नावर श्रद्धा व्यक्त करण्याची आवश्यकता, बौद्ध भिक्षूंच्या संघाशी निकटचा संपर्क ठेवून त्यातील शिस्त व त्यांची एकात्मता राखणे या बुद्धाच्या शिकवणीची जाणीव, तसेच स्वतःच्या अधिकारांच्या व्यापकतेची संपूर्ण जाणीव असूनही अशोकाने आपली सांप्रदायिक श्रद्धा इतरांवर लादण्याचा प्रयत्न केला नाही. अशोकाच्या मते धर्मविजय हा सर्वश्रेष्ठ विजय होय. त्याचा धर्म हा सत्य धर्म होता. माणुसकीचा व मानवतावादी धर्म होता. अशोकाने स्वतःच्या वर्तनाने प्रजेला सदाचाराचे उत्तम उदाहरण घालून दिले. अशोकाचा धर्म खऱ्या अर्थाने मानवतावादी होता.

**अशोकाच्या धार्मिक धोरणाचे परिणाम :** बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अनेक उपाययोजना केल्या. दिग्विजयाच्या धोरणाचा त्याग केला. अधिकाऱ्यांचे धर्मप्रचारकांत रूपांतर केले. सीमेवरील असस्कृत व बंडखोर जमातींना उदारपणाची वागणूक दिली. याच बरोबर सैनिकांना युद्धाच्या बाबतीत अननुभवी ठेवले. शस्त्रास्त्रांचा वापर केला नाही. इत्यादी गोष्टी धर्मविजय मिळवण्याच्या उत्साहात अशोकाकडून घडल्या. वस्तुतः धर्म संस्कृती कला आधी जीवनातील अत्यंत मूल्यवान गोष्टींच्या रक्षणार्थ या जगात कठोर व्हावे लागते. सैन्याची जय्यत तयारी, कुटीलनीतीचा अवलंब व जागरूकता ठेवावी लागते. पण सम्राट अशोकाच्या वेळी या गोष्टी शिथिल झाल्या. मौर्य सेनेच्या व साम्राज्याचा दरारा राहिला नाही. सैन्य शक्ती दुर्बल झाली. राज्यकारभाराकडे दुर्लक्ष झाले. अधिकारी जुलमी झाले. साम्राज्याचे उत्पन्न धर्मप्रसारार्थ खर्च झाले. शा क्षात्रवृत्तीचा ऱ्हास झाला. अहिंसेला महत्त्व मिळाले. बौद्ध धर्म विश्व धर्म बनला. अशोकाच्या मृत्यूनंतर संरक्षणाच्या दृष्टीने दुबळ्या व राजनीतीच्या व कुटनीतीच्या बाबतीत सावधान नसलेल्या भारतावर पश्चिम आशियातील रक्तपिपासूनची आक्रमणे होण्यास प्रारंभ झाला. चंद्रगुप्ताने स्थापन केलेल्या मौर्य साम्राज्याच्या लोकप्रियतेचा कळस अशोकाच्या कारकिर्दीत गाठला गेला. हिंदुकुश पासून आसाम पर्यंत आणि काश्मीर पासून तुंगभद्रेपर्यंत साम्राज्यविस्तार करणारा सम्राट अशोक कोणी आक्रमक युद्धे करणारा सत्तापीपासू सम्राट नव्हता, तर केवळ आपल्या सहिष्णु धर्म वृत्तीने जनमानसात श्रेष्ठ स्थान मिळवणारा राजा होता. सहिष्णुता, जेष्टाचा आदर, प्राणीमात्रावर दया इत्यादी मानवतावादी तत्त्वावर आधारित अशोकाचा धर्म हा एका अर्थाने विश्वधर्म झाला होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

रिकाम्या जागा भरा.

१. ................ विजयानंतर सम्राट अशोक अहिंसावादी बौद्ध धर्माकडे वळला.

अ) काश्मीर ब) कलिंग क) चंपा ड) सारनाथ

२. 'देवानाम प्रियदर्शनी' अशी बिरुदावली ................ याने धारण केली होती.

अ) चंद्रगुप्त ब) बिंदुसार क) सम्राट अशोक ड) महेंद्र

३. कलिंग युद्धानंतर अशोकाने ................ या धोरणाचा अवलंब केला.

अ) युध्द ब) साम्राज्य विस्तार क) शांतता ड) वानप्रस्थाश्रम

४. कलिंग युद्धोत्तर दृश्यामुळे अशोकाचे ................ परिवर्तन झाले.

अ) ध्येय ब) हृदय क) धोरण ड) वागणूक

५. कलिंग युद्धाबाबत ................ या शिलालेखात माहिती मिळते.

अ) ५व्या ब) ८व्या क) १०व्या ड) १३व्या

### ४.२.३ मौर्यांचे प्रशासन

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये मौर्यांचे साम्राज्य विस्ताराने सर्वात मोठे होते .चंद्रगुप्ताने आपल्या शौर्याने राजनैतिक डावपेचांनी आणि अंगभूत प्रशासकीय कौशल्याने नंद घराण्याचा नाश करून मगच सत्ताधीश झाल्यानंतर मगधाच्या छोट्या राज्यांचे रूपांतर मोठ्या विस्ताराच्या मौर्य साम्राज्यात केले. साम्राज्यस स्थैर्य देण्यासाठी तितकीच बळकट शिस्तबद्ध प्रशासन व्यवस्था चंद्रगुप्ताने आपला प्रधानमंत्री आर्य चाणक्य याच्या मार्गदर्शनाखाली उभी केली. नंतर सत्तेवर आलेल्या बिंदुसार, अशोक यांनी प्रशासन व्यवस्थेत कोणताही हस्तक्षेप न करता चालू ठेवली. अशोकाने चंद्रगुप्ताच्या प्रशासन व्यवस्थेत जोडून धर्म विभाग चालू केला. मौर्य प्रशासन व्यवस्था ही मूलता चंद्रगुप्ताचीच व्यवस्था होती असे दिसते. मौर्यांची शासन व्यवस्था प्रारंभ पासूनच अनुशासनबद्ध व विकासवर्धक असल्यामुळे त्यात काही सुधारणा करण्याची अशोकाला आवश्यकता भासली नाही.

मौर्यकाळात सत्तेचे विकेंद्रीकरण केले गेले. स्थानिक जनतेला अंतर्गत कारभारात स्वायत्तता होती परिणामी मौर्य सत्तेस लोकसत्तेचे अधिष्ठान प्राप्त झाले होते. इंडिका व अर्थशास्त्र या ग्रंथावरून मौर्यकालीन राज्यव्यवस्थेची माहिती मिळते. चंद्रगुप्त स्वतः उत्तम प्रशासक होता. त्याने कौटिल्याने वर्णन केलेल्या दंडनितीच्या आधारे राज्यकारभार चालविला. साम्राज्याचे अनेक विभाग केले व त्यावर कर्तव्यदक्ष कार्यक्षम विश्वासू अशा व्यक्तींची निवड कौशल्याने केली. मौर्यकाळात पुढील प्रमाणे सूत्रबद्ध अशी शासन प्रणाली रूढ होती .

**केंद्रीय प्रशासन:** राजाच राज्याचा सर्वेसर्वा होता तात्विक दृष्ट्या साम्राज्याचे सर्वसामर्थ्य त्याच्याच नियंत्रण झाली होते राजधानी पाटलीपुत्र येथून साम्राज्याची सत्ता सूत्रे हलविण्यात येत असत.

**राजा** : राजा हा साम्राज्यातील सर्वश्रेष्ठ अधिपती होय. सर्व लष्करी व मुलकी सत्ता त्याच्या हाती केंद्रित झाली होती. साम्राज्यास आवश्यक विधी नियम बनवणे, त्याची अंमलबजावणी करणे व कायदेभंग करणारा शासन करणे, याबाबत सर्वोच्च सत्ता सम्राटाच्या हाती होती. राजपद वंशपरंपरेने असल्याने तो अनियंत्रित होता. तरीही त्याच्यावर नैतिक बंधने होती. अर्थशास्त्रात दिल्याप्रमाणे राजा प्रजा संबंध

परस्परावलंबी होते. प्रजेचे सुख तेच राजाचे सुख, राजाचे वेगळे हित असू शकत नाही, अशी धारणा राजाच्या अधिकारासंबंधी होती. त्याचप्रमाणे राजाचे कुल उच्च असावे, निरोगी, सशक्त, शूर, सत्यप्रिय आणि त्याच मातीतला (स्थानिक) असावा असे कौटिल्य सांगतो.

साम्राज्यातील विविध विभाग खाती व अधिकारी यांचे निरीक्षण नियमन व नियंत्रण करण्याचे महत्त्वाचे कार्य सम्राटाला करावे लागत होते. उच्च अधिकाऱ्यांच्या बदल्या, बढत्या, नियुक्त्या करण्याचे अधिकार राजास होता.प्रजेच्या तक्रारी व गाऱ्हाणी यांचा अंतिम निर्णय देण्याचा अधिकार राजाला होता. मेग्यस्थेनीस चंद्रगुप्त मौर्याविषयी म्हणतो, 'राजा दिवसभर न्यायालयात बसत असे, राजकर्तव्य पार पाडण्यासाठी तो आपले सुख व स्वार्थ यावरही पाणी सोडत असे. देशाच्या संरक्षणाची जबाबदारी ही त्याच्यावर असेल, तसेच परराष्ट्र संबंध तो पहात असे. थोडक्यात राज्यात शांतता व सुरक्षितता व समृद्धी यांच्या वृद्धीसाठी आवश्यक ती सर्व कर्तव्ये पार पडण्याची राजाची जबाबदारी असे. अशा प्रकारे मौर्य सम्राटावर कर्तव्य व जबाबदारीचे भयंकर ओझे होते.

**राजाचा अधिकारी वर्ग :** राजा हा सर्व प्रशासन व्यवस्थेचा केंद्रबिंदू व त्याच्या हाती सर्व सत्ता व अधिकार केंद्रित झाले होते. अर्थात राजा साम्राज्याचा प्रचंड कारभार एकटा करू शकत नसे, म्हणून त्याच्या मदतीला सल्लागार मंडळ व कार्याची अंमलबजावणीसाठी सुसूत्र अशी नोकरशाहीची रचना होती.

**अ) मंत्रीपरिषद :** अर्थशास्त्रात सांगितल्याप्रमाणे राजाला मंत्री परिषद आवश्यक होती .ही परिषद राजाला कारभारात सल्ला देण्याचे काम करीत असे. मंत्री परिषदेतील मंत्र्यांच्या संख्येवर बंधन नव्हते. साधारणता १२ ते २० मंत्री असत. यात राजपुरोहित, सेनापती, युवराज यांचा समावेश होता. आणि दहा ते बारा मंत्र्यांचा समावेश असे. परिषदेच्या सचिवास परिषदा अध्यक्ष असा हुद्दा होता याशिवाय दैनंदिन काम व्यवस्थित चालावे म्हणून राजा तीन किंवा चार मंत्र्यांची एक समिती नियुक्ती करत, यास मंत्रीण किंवा मंत्रीपरिषद असे म्हणत. शासन विषयक कामकाज पाहताना व निर्णय घेताना राजा या समितीचा सल्ला विचारीत असे. अमात्य या अधिकाऱ्याकडे प्रशासनातील विविध खात्यांचा कारभार सोपविला असे. समाजातील विद्वान, प्रतिष्ठित, स्वामीनिष्ठ, कार्यक्षम व्यक्ती अधिकार पदे भूषवीत अर्थशास्त्रानुसार महामंत्री हा मंत्री परिषदेतील सर्वोच्च कार्यकारी मंत्री होता.

केंद्रीय सचिवालय : राज्यकारभाराच्या सोयीसाठी व कार्यक्षम प्रशासनासाठी विविध खात्यात विभागणी केली होती. तीच खाती असल्याचा कौटिल्याच्या अर्थशास्त्रात उल्लेख आहे प्रत्येक खात्याच्या प्रमुखास सचिव म्हणत. त्याच्या हाताखाली श्रेणीबद्ध अधिकारी वर्ग असे. केंद्रीय प्रशासनाची खाती पुढील प्रमाणे–

**अ) लष्कार :** चंद्रगुप्त मौर्य हा शूर सैनिक असल्याने सुसज्ज सैन्याचे महत्त्व ओळखून होता. मौर्याजवळ विशाल शक्तिशाली सैन्य होते. सम्राट( राजा ) हा सैन्याचा सर्वोच्च सत्ताधीश असे. त्याला मदत करण्यासाठी ३० सदस्यांचे एक युद्ध मंडळ होते. या मंडळाच्या सहा समित्या पाडण्यात येऊन प्रत्येक समितीत पाच सदस्य होते. लष्कराचे विविध विभाग पुढील प्रमाणे –

**१) पायदळ :** चंद्रगुप्ताजवळ सहा लक्ष पायदळ होते. प्रत्येक सैनिकाजवळ धनुष्यबाण, ढाल, तलवार, भाला, बरचा ही आयुधे असत सैनिकांना रोख रकमेच्या स्वरूपात पगार दिला जात. सरकारमार्फत शस्त्रास्त्रे पुरविली जात युद्धकलेचे प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तींनाच लष्करात भरती करून घेतले जात.

**२) घोडदळ :** सैन्यात घोडदळाला विशेष महत्त्वाचे स्थान होते. घोडदळात सैनिकांची भरती, घोड्यांची खरेदी, देखभाल, घोडेस्वाराचे प्रशिक्षण, त्यांचा शस्त्रपुरवठा इत्यादी बाबत काळजी घेतली जात घोडदळ प्रमुखाला अश्वाध्यक्ष म्हटले जात. मौर्याजवळ ३०००० घोडदळ होते.

**३) हत्तीदळ :** मौर्य काळात ९००० हत्ती होते. हत्तींना युद्धाचे प्रशिक्षण दिले जात. सैन्याच्या व्यूहरचनेट हत्तीदळाचे स्वतंत्र महत्त्व होते. शत्रूची अभेद्य फळी फोडण्यासाठी व शत्रूचे दुर्ग काबीज करण्यासाठी हत्तीदळाचा विशेष उपयोग होत असे. हत्तीवर माहुता खेरीज तीन तिरंदाज योध्ये असत. प्रमुखाला हस्ताध्यक्ष म्हणत.

**४) रथदळ :** मौर्यांजवळ ८०००० रथ होते. हे सैन्याचे एक महत्त्वपूर्ण अंग होते. युध्द रथांना घोडे किंवा बैल जुंपित. या युद्धरथामध्ये दोन योध्ये व एक सारथी असे. रथ दळातील सैन्य भरती, सारथ्यांची भरती आणि त्यांचा शस्त्र पुरवठा या गोष्टी महत्त्वाच्या होत्या. रथदळ प्रमुखाला रथाध्यक्ष असे म्हणत.

**५) आरमार :** मौर्याजवळील आरमारात नौका व जहाजे होती. युद्धप्रसंगी नद्या ओलडण्यासाठी नौकांचे पूल बनवीत. राज्याच्या समुद्रकिनाऱ्याचे रक्षण, सागरी व्यापाऱ्याकडून कर वसूल करणे इत्यादी बाबी या खात्याच्या अखत्यारीत होत्या. आरमार प्रमुखाला नावाध्यक्ष असे म्हणत.

**६) रसद वाहतूक व शिबंदी :** प्रत्यक्ष लढणाऱ्या सैनिकांना व घोड्यांना अन्नधान्याचा पुरवठा करणे, त्यांच्या वाहतुकीच्या साधनांची व्यवस्था करणे, सैनिकांची सुश्रुषा, युद्ध साहित्य इत्यादी विविध बाबींकडे लक्ष पुरवण्याचे काम या विभागाकडे असे. या विभागात वैद्यकीय पथक, सैनिकी वाद्यवृंद, यंत्रज्ञ, इत्यादी बिन लढाऊ लोकांचा व वाहनांचा समावेश असे.

सैन्यात निष्णात अशा क्षत्रिय सैनिकांची भरती होत असे. चंद्रगुप्ताने प्रशिक्षित खड्या सैन्याचे महत्त्व ओळखले होते शक्तिशाली खडे सैन्य उभारून अनेक मोहिमा यशस्वी केल्या. सैनिकांना नियमितपणे रोग पगार देण्यात येई. राजा स्वतः युद्धाचे नेतृत्व करीत.

**ब) हेरखाते :** राज्यकारभारावर राजाची सदैव नजर असे. राज्यातील नोकर कसे वागतात, राज्याचा कारभार कसा चालतो, शासकीय कर्मचाऱ्यांचे वर्तन कसे आहे, प्रजेची स्थिती, परराज्याच्या हालचाली, शत्रू राज्यात फितुरी कशी करता येईल, इत्यादी गोष्टींची माहिती हेरखात्याकडून राजास मिळत असे. हुशार, कार्यक्षम, स्वामिनिष्ठ, गुप्तहेरांच्या नेमणुका राजा करीत असे. स्थिर व फिरते हे असे त्याचे दोन प्रकार होते. गुप्त भाषा, सांकेतिक भाषा, परवलीचे शब्द आणि कबुतरांचा उपयोग हेरगीरी साठी केला जात. हेर म्हणजे राजाचे कान डोळे समजले जात. गुप्तहेरांच्या कार्यक्षम कामगिरीवर राज्याची व राजाची सुरक्षितता अवलंबून असल्याने गुप्तहेरखाते महत्त्वाचे समजले जात.

**क) परराष्ट्र खाते :** परराष्ट्र धोरण ठरवण्याचे कार्य या खात्याकडे होते. हे धोरण आक्रमक, साम्राज्यवादी व विस्तारवादी स्वरूपाचे असे. परराष्ट्र धोरण साम-दाम भेद या तत्त्वावर आधारित होते. शेजारची राज्ये शत्रू समजण्यात येत. दूरच्या राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध असत. परकीय आक्रमणाच्या प्रतिकारार्थ सैन्याची सिद्धता करण्यात येत असे.

**ड) न्याय खाते :** हा सर्वोच्च न्यायाधीश असे. त्याच्या हाताखाली अनेक न्यायाधीश व न्यायालय होती. अर्थशास्त्रात सांगितल्याप्रमाणे फौजदारी व दिवाणी न्यायालय होती. फौजदारी न्यायालयात गुन्हेगारांच्या अपराधांची चौकशी आणि शिक्षा यासंबंधी काम चाले. दिवाणी न्यायालयात कर्ज, संपत्ती, वारसा विवाह इत्यादी बाबत न्यायदान होत असे. गुन्ह्यांच्या स्वरूपाप्रमाणे शिक्षा देण्यात येत होत्या. दंड, फटके, कैद, जप्ती, प्राणदंड इत्यादी शिक्षा असत. कर चुकवेगिरी, खोटी साक्ष, साधी चोरी इत्यादी गुन्ह्यासाठी शरीराचे अवयव तोडण्याची शिक्षा होती. मेग्यास्थेनिस ने मौर्य काळातील न्यायव्यवस्थेची प्रशंसा केली आहे.

**इ) महसूल खाते :** मीन महसूल ही उत्पन्नाची प्रमुख बाब होती. महसुलाची आकारणी जमिनीच्या मगदूराप्रमाणे उत्पन्नाच्या एक चतुर्थांश ते एक अष्टमांश अशा पद्धतीने केली जात. जमिनीची व पिकांची मोजणी होऊन शेतसारा ठरविला जात.

महसुलाप्रमाणे विक्रीकर, आयात निर्यात कर, जकात कर, परवाना फी, पाणीपट्टी, पूलपट्टी, खंडणी, नजराने इत्यादी राज्याच्या उत्पन्नाच्या बाबी होत्या राजाचा खाजगी खर्च, सरकारी नोकरांचे पगार, सैन्य व संरक्षण यावरील खर्च, सरकारी उद्योगधंदे, पाटबंधारे, दवाखाने, कलावंतांना आश्रयासाठी होणारा खर्च इत्यादी राज्याच्या खर्चाच्या बाबी होत्या.

**सार्वजनिक आरोग्य** : मौर्य राज्यांनी माणसे व पशुपक्षी यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी इस्पितळे उभारली होती. त्यात वैद्य, शल्यचिकित्सक, परिचारिका, दाया इत्यादींची नियुक्ती करून त्यांना सर्व प्रकारचे औषधे व वैद्यकीय साधने उपलब्ध करून देण्यात आली होती. उपचार बव्हंशी निशुल्क होते. संशयित मृतांचे शवविच्छेदन करून मृत्यूचे कारण शोधलेत जात. भेसळ हा गंभीर गुन्हा समजून गंभीर शिक्षा दिल्या जात.

**पाटबंधारे विभाग** : शेतजमिनी ओलिताखाली आणण्यासाठी प्रथम जमिनीची मोजणी करण्यात येऊन योग्य अशा शेतीला पाणी देण्यासाठी स्वतंत्र पाटबंधारे विभाग मौर्यांनी सुरू केला होता विहिरी, तलाव, धरणे इत्यादी मधून उत्तम प्रकारे खोदून बांधलेल्या कालव्याद्वारे शेतीला पाणीपुरवठा केला जात होता. त्याचं आदर्श उदाहरण म्हणजे पुष्यमित्राने गिरनार जवळ बांधलेला सुदर्शन तलाव होय.

**प्रांतीक प्रशासन** : मौर्य साम्राज्याचा विस्तार खूप मोठा असल्याने राज्यकारभाराच्या सोयीसाठी साम्राज्याचे सहा विभाग केल्याचे दिसते .प्रत्येक विभागावर प्रांताधिकारी म्हणून राजपुत्रांची नेमणूक केली जात. प्रमुख सहा विभाग पुढील प्रमाणे.

**१) गृहराज्य :** राजाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील, राजधानी पाटलीपुत्र, मगध व आसपासचा प्रदेश समाविष्ट होता.

**२) उत्तरपथ :** राजधानी तक्षशिला होती. पंजाब, सीमांत सिंध, काश्मीर वगैरेचा प्रदेश समाविष्ट होता.

**३) पश्चिम पथ :** राजधानी उज्जैनी, या विभागात काठेवाड, गुजरात, माळवा इत्यादी प्रदेश समाविष्ट होते.

**४) सेल्युकस जीत प्रदेश :** राजधानी कपिशा, यात सेल्युकस निकेटर याच्याकडून जिंकून घेतलेला प्रदेश होता.

**५) सुराष्ट्र** : राजधानी गिरनार होती. सौराष्ट्र, जुनागड इत्यादी प्रदेशाचा समावेश होता.

**६) दक्षिणापथ :** राजधानी सुवर्णगिरी होती. यात विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेश समाविष्ट होता.

प्रांतांचे जिल्हा, नगर, ग्राम असे अनेक विभाग होते. प्रांतिक प्रशासनाचे अधिकारी वर्ग, हिशोब तपासणीस, हेर, यांची नियुक्ती केली होती.

**जिल्हा प्रशासन :** प्रत्येक प्रांताचे जिल्हे पाडले होते. त्यांना प्रदेश म्हणत. प्रदेश प्रमुखास प्रादेशिक असे संबोधले जात. प्रदेशांतर्गत राज्यकारभार सांभाळण्याचे कार्य प्रादेशिकाकडे असे. त्याच्या हाताखाली रज्जुक नावाचा अधिकारी असे. प्रादेशिक अधिकारी दर पाच वर्षांनी संपूर्ण जिल्ह्याच्या भागात तपासणीसाठी भेटी देत असे. रज्जूक हा भूमापन अधिकारी आणि युक्त हा मुख्यत: जिल्ह्याचा पत्रव्यवहार व हिशोब ठेवण्याचे काम करीत असे. जिल्हा व ग्राम प्रशासन यांच्या दरम्यान गोप अधिकारी होता. पाच ते दहा ग्रामांचा एका गटावर प्रमुख म्हणून स्थानिक या अधिकाऱ्याकडे कर गोळा करण्याची जबाबदारी असे.

**नगर प्रशासन :** मोठ्या नगराचा कारभार चालविण्यासाठी नगर प्रशासनाची तरतूद करण्यात आली होती. अशोकाच्या शिलालेखात पाटलीपुत्र, तक्षशिला, उज्जयिनी, तोषाली, स्वर्णगिरी, सामप, ईशीला, कोशामबी इत्यादी नगरांचा उल्लेख आला आहे. अर्थशास्त्राच्या दुसऱ्या भागात नगर प्रशासनाची तपशीलवार नोंद आहे तर, मेगास्थेनिसने पाटलीपुत्र या राजधानीच्या नगर प्रशासना ची माहिती दिली आहे. नगर प्रशासनात बरीच स्वायत्तता होती. नगराची व्यवस्था तीस नगर सदस्यांच्या सहा समित्याद्वारे पाहिली जात होती. कर समिती, परदेशीय साठी समिती, जनगणना समिती, वाणिज्य समिती, उद्योग समिती व शिल्पकला समिती इत्यादी. नगर प्रशासनात अन्नछत्रे, तुरुंग, मनोरंजन, आरोग्य, स्थापत्य, शिक्षण, संरक्षण इत्यादी कामांचा समावेश होता. नगराच्या प्रमुखास नगरक म्हणत. मौर्यकालीन नगर प्रशासन तत्कालीन ग्रीक नगर राज्याप्रमाणे सरस असावे असा संशोधकांचा दावा आहे.

**ग्राम प्रशासन :** ग्राम हा राज्यातील सर्वात लहान प्रशासकीय घटक होता. ग्राम स्वयंपूर्ण- स्वायत्त होती. ग्राम प्रमुखास ग्रामीण अशी संज्ञा होती. त्याची निवड लोकांकडून केली जात होती. त्याच्या मदतीसाठी गावातील जेष्ठ नागरिकांची ग्रामसभा होती. गावातील तंटे या सभे कडून मिटविले जात. गुन्हेगारांना सजा देण्याचा अधिकार या ग्रामसभेला होता. ग्रामसभेचे सभासद गावातील अनुभवी व वृद्ध लोकांकडून निवडले जात. ग्रामसभेकडे भरपूर अधिकार असत. ग्रामविकांवर गोप हा पाच ते दहा ग्रामवर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकारी होता. गोपावर स्थानिक हा अधिकारी सुमारे १०० गावांवर नियंत्रण ठेवीत असे.

तत्कालीन कोणत्याही राज्यामध्ये मौर्यांच्या तोडीची प्रशासन व्यवस्था अस्तित्वात नव्हती शेती व्यापार उद्योग शिक्षण आरोग्य संरक्षण सार्वजनिक कल्याण इत्यादी क्षेत्रात अत्यंत सुसंगतीत व जबाबदार अशी आदर्श प्रशासन व्यवस्था उभी केली होती मोरया नंतर त्यांचे साम्राज्य नष्ट झाले तरी त्यानंतर आलेल्या सर्व राज्यांनी मौर्यांच्या शासन व्यवस्थेचे अनुकरण केले आजही लोककल्याण हा केंद्रबिंदू समजून उभ्या केलेल्या प्रशासन व्यवस्थेचे मूळ मौर्य प्रशासन व्यवस्थेत दिसते असे म्हणण्यास चुकीचे ठरणार नाही.

**स्वयंअध्ययन प्रश्न–३**

प्रश्न : रिकाम्या जागा भरा.

१. सर्व प्रजाजन माझी लेकरे आहेत या भावनेने सम्राट ................ प्रजेशी वागत असे.

अ) चंद्रगुप्त ब) बिंदुसार क)अशोक ड) हर्षवर्धन

२. मौर्य काळातील हत्ती दलाच्या प्रमुखास ................ असे म्हणत.

अ) अश्वध्यक्ष ब) रथाध्यक्ष क) हस्ताध्यक्ष ड) बलाध्यक्ष

३. मोरयांच्या प्रांतिक प्रशासनातील उत्तरापथ या विभागाची ................ राजधानी होती.

अ) तक्षशिला ब) सुवर्णगिरी क) पाटलीपुत्र ड) गिरनार

४. मौर्य काळातील रथदळ प्रमुखाला ................ पदनाम होते.

अ) रथाध्यक्ष ब) माहूत क) अश्वाध्यक्ष ड) सेनापती

५. मौर्य काळातील प्रांतिक प्रशासनात ................ या विभागाची राजधानी सुवर्णगिरी होती.

अ) उत्तरापथ ब) दक्षिणपथ क) सुराष्ट् ड) पुर्वपथ

## ४.३ सारांश :

प्राचीन भारताच्या इतिहासात मौर्य काळाचे महत्व असाधारण आहे. मौर्य काळापासून भारतात क्रमबद्ध इतिहासाला सुरुवात झाली. नंद वंशा नंतर मगधावर मौर्य वंशाची सत्ता आली व भारताच्या इतिहासात महत्त्वाचा अध्याय सुरू झाला. चंद्रगुप्त मौर्याने भारतात बलाढ्य साम्राज्य निर्माण केले. त्याच्या काळात संपूर्ण उत्तर भारत व दक्षिण भारतातील बराच प्रदेश त्याच्या अमलाखाली होता. लहान लहान राज्यात असलेल्या अराजकतेचा फायदा घेऊन चंद्रगुप्ताने एकछत्री अंमल प्रस्थापित केला आणि भारतात मौर्य घराण्याचे प्रबळ प्रशासन निर्माण केले. मौर्याचे प्रभावशाली साम्राज्य निर्माण केले. सम्राट चंद्रगुप्त महान विजेता, उत्कृष्ट प्रशासक, उत्तम सुधारक, न्याय प्रेमी, राजनीतिकुशल, विद्येचा आश्रयदाता होता. चंद्रगुप्ताने आपल्या कारकिर्दीत सुसंघटित व कार्यक्षम अशी शासन पद्धतीने निर्माण केली होती. कौटिल्य उर्फ चाणक्य याचा सल्लानेच त्याने आपल्या राज्यकारभार केला. कौटिल्याकडी ल अजोड बुद्धिमत्ता व चंद्रगुप्ताचे प्रचंड सामर्थ्य यामुळे चंद्रगुप्ताची प्रशासन व्यवस्था कार्यक्षम व यशस्वी झाली. चंद्रगुप्ताच्या कामगिरीमुळे भारताच्या

इतिहासातील एक महत्त्वाच्या पर्वाला सुरुवात झाली, म्हणून त्याला एक महान शासक असे स्थान इतिहासात आहे.

कौटिल्य हा फक्त चंद्रगुप्ताचा प्रधान अमातच नव्हे तर त्याचा एक मार्गदर्शक ही होता. चंद्रगुप्ताच्या शिक्षणापासून त्याच्या उत्कर्षा पर्यंतचा मार्ग चाणक्याने आखला होता. चाणक्य अत्यंत मुत्सद्दी, विचारवंत, राजकारणी होता. नंदांचा नाश करण्यासाठी त्याने चंद्रगुप्त मौर्यास हाताशी धरले व नंदाचा निपात करून चंद्रगुप्ताच्या हाती मगध साम्राज्य सोपविले. कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथाची रचना केली. त्या इतकी भारतीय वाङ्मयातील दुसऱ्या कोणत्याही ग्रंथात राज्य शासन व आर्थिक स्थिती यासंबंधी प्राचीन काळाची अत्यंत मोलाची व विवेचन पूर्ण माहिती सापडणार नाही.

सम्राट अशोकाने सत्तेवर येतात साम्राज्यविस्तारास प्रारंभ केला. कलिंग युद्धातील संहार पाहून अशोकाचे मतपरिवर्तन झाले. लोक कल्याणाचा ध्यास घेऊन पुढे युद्ध करायचे नाही, असा निश्चय त्याने केला. बौद्ध धर्म व धर्म संघ याबद्दल त्याला आदर वाटू लागला. नैतिक आचरणावर भर देऊन पाटलीपुत्र येथे तिसरी बौद्ध धर्म सभा बोलविली. सदाचार व उच्च नैतिक आचरण यावर अशोकाच्या धर्माचे सिद्धांत आधारित होते. बौद्ध धर्माला राजश्रय देऊन धर्माच्या प्रचारासाठी आपली शासन यंत्रणा राबविली. बौद्ध धर्मास राष्ट्रधर्म बनविले. देशोदेशी धर्मप्रचारक पाठवून स्तंभ, शिलालेखाद्वारे बौद्ध तत्त्वांचा प्रसार केला. अशोकाचा धर्म मानवतावादी होता.

चंद्रगुप्ताच्या काळातील प्रशासन व्यवस्था अशोकाच्या काळातही होती. ही व्यवस्था सुव्यवस्थित, कार्यक्षम असल्यामुळे समाजाच्या आर्थिक, धार्मिक व सामाजिक जीवनात स्थैर्य लाभले होते. त्या काळातील शांतता, सुबत्ता यामुळे भारतात विविध कला स्थापत्य व शिल्प या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भरभराट झाली. साम्राज्याच्या बळकटीसाठी मौर्यानी तितकीच प्रबळ व शिस्तबद्ध प्रशासन व्यवस्था निर्माण केली व आदर्श निर्माण केला. चंद्रगुप्ताच्या राज्यव्यवस्थेवरून त्याच्या ठिकाणी असणारे संघटन कौशल्य, राज्यकारभारातील मुत्सद्दीपणा चातुर्य दिसून येते. मौर्यांचे प्रशासन केंद्रीय, प्रांतिक, जिल्हा, नगर, ग्राम असे विभाजित केलेले होते. त्यात कार्यक्षम अधिकारी वर्ग नेमला होता. प्रशासन यंत्रणाच्या माध्यमातून लोकाभिमुख राज्यकारभार त्यांनी केला. समाजात सदाचार, नीतिमत्ता, आदर्श तत्त्वे, परधर्म सहिष्णुता यांचे पालन केले गेले.

## ४.४ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

हेर – गुप्तदूत

अश्वाध्यक्ष – घोडदळाचा प्रमुख

पायदळ – खडे सैन्य

रथाध्यक्ष – रथ दळाचा प्रमुख

महसूल – शेतसारा

स्तूप – गौतम बुद्धाच्या किंवा बौद्ध साधूंच्या अस्थी किंवा रक्षा यांच्या अवशेषावर बांधलेले स्मारक

ग्रामिक – ग्राम प्रमुख

गोप – ग्राम प्रमुखावरील अधिकारी

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे-१

१. धनानंद २. ३२१ ३. मेग्यास्थेनिस ४. राज्यशास्त्र ५. १८०

स्वयंअध्यान प्रश्नांची उत्तरे-२

१. कलिंग २. सम्राट अशोक ३. शांतता ४. हृदय ५. १३ व्या

स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे-३

१. अशोक २. हस्ताध्यक्ष ३. तक्षशिला ४. रथाध्यक्ष ५. दक्षिणापथ

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

लघुत्तरी प्रश्न

१. मौर्य साम्राज्याच्या स्थापनेची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२. चंद्रगुप्त मौर्यांचा साम्राज्य विस्तार थोडक्यात लिहा.

३. कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथाविषयी माहिती द्या.

४. अशोकचा धर्म ही संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

५. अशोकाने धर्मप्रसारासाठी काय उपाययोजना केल्या ते लिहा.

६. तिसऱ्या बौद्ध धर्म परिषदेविषयी थोडक्यात माहिती द्या.

७. मौर्य काळातील राजाची प्रमुख कर्तव्ये थोडक्यात स्पष्ट करा.

८. मौर्य काळातील केंद्रीय प्रशासन व्यवस्था याविषयी थोडक्यात माहिती लिहा.

९. मौर्य काळातील जिल्हा व नगर प्रशासनाची माहिती द्या.

दीर्घोत्तरी प्रश्न

१. चंद्रगुप्त मौर्यांची कामगिरी सविस्तर लिहा.

२. कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथाविषयी सविस्तर माहिती द्या.

३. सम्राट अशोकाच्या धर्मप्रसाराबाबत सविस्तर माहिती द्या.

४. सम्राट अशोकाच्या धार्मिक धोरणाचे महत्त्व स्पष्ट करा.

५. मौर्य काळातील प्रशासन यंत्रणेची सविस्तर माहिती लिहा.

६. मोरयांच्या प्रांतिक प्रशासनाची व जिल्हा प्रशासनाची सविस्तर माहिती लिहा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. दीक्षित नी.सी. प्राचीन भारताचा इतिहास, पिंपळापुरे अँड कंपनी प्रकाशन, नागपूर.

२. डॉक्टर जयंत हुकुमचंद, भारतीय इतिहास एवं संस्कृती इनसायक्लोपीडिया, जैन प्रकाशन मंदिर, जयपुर, २००८.

३. डॉक्टर कुलकर्णी अ.रा. प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००७.

४. थापर रोमिला, (अनु.शरावती शिगावकर), अशोका आणी मौर्यांचा ऱ्हास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००७ .

५. गायधनी र.ना. राहुरकर व .ग. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६०.

६. दांडेकर विश्वास, चाणक्य, रविराज प्रकाशन, पुणे, १९९१.

७. डॉक्टर कळंबे चित्रलेखा, कळंबे शालिनी, प्राचीन भारताचा संक्षिप्त इतिहास आणि प्रियदर्शी अशोक, भाग एक, स्वयं प्रकाशन, मुंबई, २०१७.

८. डॉक्टर कोलारकर श. गो. प्राचीन भारताचा राजकीय सामाजिक सांस्कृतिक इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, २००३.

९. देशमुख मा. म. प्राचीन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९९८.

१०. Sharma S.R. (E.D.) Arthashastra of Koutilya, १९५६.


❑❑❑